सहामाही ,, २ ,, ८
साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास.................... ०४

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस ......... ०१ ०६
दुसरे खेपेस ......... ०१

Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ......... ,, 8 as
Single copy ......... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ...3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 3 MAY 1897 NO 17

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख ३ माहे मे सन १८९७ इ० अंक १७

जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातांत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवाअधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

NOTICE

There are 2 Cornish and one Lancashire Boilers and one Gin Engine belonging to The Akola Native Cotton G. F. & S. Company for sale. Those who wish to buy are requested to have a look at the articles. Prices will be settled after the approval of the articls.

Deorao Vinayak
Chairman
Board of Directors.

नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, वी अकोलें नेटिव्ह, कॉटन, जिनिंग प्रेसिंग आणि स्पीनिंग कंपनीतील कर्नीश बॉयलर नग २, ल्यांकेशायर बॉयलर नग व जिन इंजिन नग १ असें एकंदर ४ नग विकावयाचे आहेत. तर ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू कारखान्यांत स्वतः येऊन माल पाहून पसंत करावा. पसंत पडल्यास योग्य किंमत ठरविण्यात येईल.

देवराव विनायक
चेअरमन बोर्ड आफ डायरेक्टर्स.

## सामाजिक सुधारणा

( मा. अं. पुढें चालूं )

दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें कीं, आह्मांस राजकीय बाबतींत सुधारणा जरूर पाहिजे पण सामाजिक सुधारणेचीही जरूर आह्मांस तितक्याच मानाची आहे. जीवनक्रम सुखावह होण्यास शारीरिक सुधारणा व मानसिक सुधारणा सारख्या मानानें झाल्या पाहिजेत. एकीकडे सर्व लक्ष देऊन दुसरीकडे अगदीं दुर्लक्ष करणें हें चालणार नाहीं. यापासून इष्ट परिणाम घडून येणें शक्य नाहीं. असाच प्रकार देशोन्नतीचाही आहे. राजकीय सुधारणा हें तिचें बाह्यांग होय आणि सामाजिक सुधारणा हें तिचें अंतरंग होय. यामुळें एकाच आंगाची वृद्धि करूं इच्छिणें हा दूरदर्शीपणा नव्हे.

सध्याचा काळच अशा प्रकारचा आहे कीं तो आह्मांस एके ठिकाणीं निश्चळ कधींही राहू देणार नाहीं तो आपल्या बरोबरच आह्मांला पुढें पुढें ओढून घेऊन जाईल या आक्षेपास सुधारणाप्रिय पक्षाचें ह्मणणें आहे कीं काळ हा स्वतः कांहीं एक करूं शकणार नाहीं Time is not force हें वाक्य आपण लक्षांत वागविलें पाहिजे काळ, ही, एक स्वतंत्र शक्ति नव्हे तिला जर शक्तिच ह्मणावयाची असेल तर ती इतर शक्तीवर अवलंबून राहणारी अशी एक अप्रधान शक्ति आहे असें पाहिजेल तर ह्मणा. काळ आपणास एके ठिकाणीं निश्चळ राहू देणार नाहीं ही गोष्ट घटकाभर कबूल केली तरी आपल्या बरोबर आह्मास तो पुढेंच ओढून नेईल याला प्रमाण काय? मागें राहत राहत काळा मधील अंतर आणि आमच्यातील अंतर "हरक्यूलीस" व "पृथ्वी" इतक्या अंतरा प्रमाणें कां राहूं शकणार नाहीं? काळ हा जर नेहमीं प्रत्येकांस आपल्या बरोबर पुढेंच ओढून नेणारा असतां तर आज "इंडियना" सारखें जे लोक नामशेष राहिले आहेत अथवा "कार्थेज" सारखीं एक वेळ प्रचंड सत्तेचा उपभोग घेतलेलीं राष्ट्रें जीं फक्त इतिहासांत मात्र दृष्टीस पडतात त्यांची निव्वळ काळ ह्या शक्तीनें अशी स्थिती होऊं दिली नसती. मग ह्या शक्तीनें आपल्या बरोबर त्याना अधिक पुढें पुढें सुधारणेच्या पर्वतावर कां ओढून नेलें नाहीं? पृथ्वी वरील एकंदर सर्व राष्ट्रें व लोक यांचा सामान्यत्वें करून विचार केला असतां त्यांची दिवसेंदिवस प्रगती होत चालली आहे असें सामान्य अनुमान प्रमाण मानावें लागेल. परंतु प्रत्येक राष्ट्रही सुधारणेचाच मार्ग आक्रमण करीत आहे असें वरील सामान्य अनुमानावरून विवक्षित अनुमान काढणें निभ्रांतपणें चुकीचें होईल. ही गोष्ट स्वयंसिद्ध असल्यानें ती शाबीत करण्यास दुसरीं प्रमाणें देणें नको; ह्मणून आह्मी सामाजिक बाबतींत जर कांहीं हालचाल केली नाहीं तर आमची सुधारणा या दिशेनें किमपीही होणार नाहीं, पण दुर्लक्ष केल्यानें हानीप्रद परिणाम मात्र आपल्यास भोगावे लागतील सुधारणाप्रतीकूलविद्वान लोकांचें जर time is force असें ह्मणणें आहे, तर ह्या वचनागा प्रमाणें मिष्ट लागणाऱ्या तत्वाचा उपयोग ते राजकीय बाबतींत कां करीत नाहींत, ब्रह्मास्त्रा प्रमाणें जाज्वल शब्दांचा वर्षाव राष्ट्रीय सभे सारखीं हिंदुस्थानच्या एका टोका पासून तों दुसऱ्या टोका पर्यंत सर्वांस खळबळून टाकणारी संस्था, व जगांतील अत्यंत सुधारलेल्या देशास देखील भूषणीभूत होतील अशा तऱ्हेचे दांडगे श्रम, हीं व अशाच प्रकारची जाज्वल्य शस्त्रास्त्रें घेऊन हिंदुस्थानास राजकीय हक्क मिळावे ह्मणून ही रथी महारथी मंडळी दंड ठोकून समरांगणीं कीं उभी राहिली आहे? time is forec अथवा 'असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' ह्या मंत्राचा जप करीत राजकीय बाबती संबंधानें ही मंडळी हरी हरी करीत स्वस्थ कां बसत नाहीं? आपल्याला जेव्हडें गोड तेव्हडें घ्यावें व दुसऱ्याला कडू तेव्हडे द्यावे हा कोठला न्याय! सुधारणा प्रतीकूलविद्वान लोकांचे प्रस्तुतचे वर्तनच ढळढळीत सिद्ध करून दाखवीत आहे कीं काळ ही स्वतंत्र एजन्सी नव्हे; "टाईम" ही 'फोर्स' नव्हे.

पहिल्या पक्षाचा दुसरा आक्षेप कीं सामाजिक बाबतींत चर्चा करणें ह्मणजे साक्षात आपल्या धर्मांत ढवळाढवळ करण्या सारखें आहे हा आक्षेप प्रथम दर्शनीं जबरदस्त दिसतो खरा परंतु विचारा अंतीं लक्षांत येते कीं, आपल्यांत धर्म ह्या शब्दाची अगोदर बिनचूक व्याख्याच करितां येत नाहीं वैदिककाळाचा धर्म घेऊन हल्लींच्या प्रचलीत धर्माशी तुलना केली असतां ह्या दोहोंत मोठा विरोध आणि अंतर दिसून येईल वैदिक काळीं गत झालेला एखादा ऋषी आज पुन्हां अवतीर्ण झाल्यास आपलां रूढधर्म पाहून हा देश आपलाच आहे किंवा दुसऱ्य कोणाचा आहे अशी त्यास भ्रांति झाल्या शिवाय राहणार नाहीं. ज्या चालीस अथवा रीतीस धर्म ही संज्ञा आली आहे अशांचा विचार करितां, आपल्यालाला आढळून येईल कीं, अशा धर्मांत अनंत काळा पासोन एकसारखे फेरफार होत आले आहेत, आणि ते तसें न होणें हें अनिवार्य आहे. असा जर वास्तविक प्रकार आहे तर प्रचलीत असलेल्या कांहीं चालीरीतींत बदल झाला असतां, आमचा आर्यधर्म ठार बुडेल असा गवगवा करणें गर्हणीय होय. एकपक्षीं पाहिलें असतां पूर्वकाळीं ज्या कांहीं चाली रीति सुरू असून पुढें कांहीं अपरिहार्य कारणानें बंद झाल्या त्याच पैकीं कांहीं चालीरिती प्रस्तुतच्या कालावर दृष्टी देतां आपल्यांत सुरू करणें अवश्य झालें आहे असें असतां पूर्वींच्याच कांहीं चालीचें अनुकरण केलें असतां धर्म बुडेल असें वेडगळा शिवाय इतरास वाटणार नाहीं.

सुधारणाप्रीय लोकांचे आणखी एका आक्षेपा संबंधानें ह्मणणें आहे कीं, हिंदुस्थानांत धर्मवैचित्र्य, आचारवैचित्र्य लोकवैचित्र्य नाहीं, असें आह्मी ह्मणत नाहीं हे वैचित्र्यत्रयी गृहीत घेऊन चालले तरी त्यातल्या त्यांत कोणत्याच बाबतींत आमचे एकमेकांशीं सादृश्य असूं शकणार नाहीं, असें नाहीं. ह्या संबंधानें स्वतंत्र विचार करण्यास अग्रगण्य अशा एका महान् विद्वानाचें ह्मणणें आहे कीं,–

"I do not wish to be understood as if there are no common features in our social organization. If that had been the case we should never have come together. We are in a sense as strictly national socially as we are politically. Though the differences are great for purposes of immediate and practical reform yet there is a back ground of common traditions, common religion, common laws, and institions and customs and perversions of each customs which make it possible for us to deliberate together in spite of our differences."

अशा रीतीनें सुधारणा प्रतीकूल लोकांच्या एका मोठ्या अक्षेपाचे पुष्कळअंशी सुधारणाप्रीय मंडळी खंडण करिते यांत समंजसपणाचा अंश कोणत्या पक्षाकडे जास्त आहे, याचा विचार प्रत्येकानें करावा. मला दुसऱ्या पक्षाचें ह्मणणें अधिक सयुक्तिक वाटतें, ह्मणून मी मोठ्या आनंदानें त्या पक्षास सामील झालों आहे.

मालाकाराच्या तालमींत शिकून केसरीचें कातडें पांघरलेली मंडळी कांहीं वेळ असेंही कबूल करितात कीं, सामाजिक बाबतींत आह्मास सुधारणा नको आहे, असें नाहीं. पण ही सुधारणा ज्याची त्यानें आपल्या पुरती आपल्या कुटुंबांत घडवून आणावी. देशास उन्नती आणण्याचे जे मार्ग आहेत त्या पैकीं आह्मी मुख्य राजकीय भाग उचलला आहे आणि ह्या भागाकडे आह्मी आपली संपूर्ण शक्ति व हुशारी खर्च केली असतां कोणी सुज्ञ या आमच्या करणीस नांवें ठेवणार नाहीं कारण आह्मी एक भाग उचलला आहे आणि तदर्थ सर्व आयुष्य आह्मी अर्पण केलें आहे; इतरांनीं सुधारणेचे इतर भाग उचलावे व त्यांनीं तिकडे प्रयत्न करावे. होय ही गोष्ट आह्मासही कबूल आहे श्रम विभागाचें तत्व आह्मीही पण मान्य करितों, पण ह्या वरील मंडळीच्या बोलण्यांत आणि वागण्यांत जमीन अस्मानचें अंतर आहे इकडे तोंडानें ह्मणावयाचें कीं आह्मी सुधारणेचे द्वेष्टे नाहीं आणि दुसरीकडे सुधारणे संबंधीं चळवळ चालू झाली असतां तिचा समूळ उच्छेद होईल अशा तऱ्हेचें कुत्सित वर्तन लेखनद्वारें व क्रियाद्वारें करावयाचें. सामाजिक सुधारणा व ती करणारी मंडळी यांची टर उडविण्याचा भलाबुरा कोणताही प्रसंग वाया जाऊं द्यावयाचा नाहीं, आणि सुधारणाप्रीय लोकांच्या लेखांतील अथवा भाषणांतील एखादें अप्रधान वाक्य फार काय पण एखादे वेळीं नुसता एक शब्द देखील, अकांड तांडव करून आपलें पांडित्य दर्शविण्यास ह्या सुधारणाप्रतिकूलविद्वानास पुरेसा होतो आणि अखेरीस ह्मणतात काय कीं, अहो सुधारणा आह्माला पाहिजे पण तुमच्या सुधारणेच्या दिशेंत व आमच्या

डिग्रींत शुन्यांश आणि १३२ डिग्री इतकें अंतर आहे व तुमचे मार्ग आह्मास पसंत नाहींत. ठीक आहे. एखादी गोष्ट आपल्याला पाहिजे अशा बद्दल सर्वांचा एकवाक्यता झाल्यावर नुसतें अमुक नाहीं, अमुक वाईट, असें निषेधार्थी ह्मणून चालणार नाहीं. अमुक बरें असें विधेयार्थी दाखविलें पाहिजे आणि असें होत नाहीं तर नुसतें नाक मुरडणें ह्मणजे तुह्मी सुधारणेस निव्वळ प्रतिकूल आहां असेच झालें पाहिजे. दुसरी तोड नाहीं. सुधारणा–प्रतिकुल मंडळी मध्यें अशा प्रकारचा विरोध दिसून येतो, म्हणून त्यांच्या लेखांचा, भाषणांचा, अथवा कृतीचा आपण कांहीं विचार करूं नये. तिकडे लक्ष देऊन आपला कांहीं विशेष मोठा फायदा होणार नाहीं.

सामाजिक परिषदेचा मुख्य उद्देश असा आहे कीं, निरनिराळ्या जातींतील सुधारणाप्रिय लोक आपल्या जातींसंबंधानें काय काय सुधारणा करण्याची खटपट करितात ह्याची माहिती मिळून जास्त इर्षेनें आणि जोमानें स्वीकृत कामें व्हावींत. इतर प्रांतांत सुधारणा कोणत्या दिशेनें होत आहे आणि ती किती झाली आहे; आपल्यांत कोणत्या दिशेनें सुधारणा केली पाहिजे व तिची हल्लींची स्थिति काय आहे ह्या गोष्टी कळल्या जाऊन सुधारणेच्या कामीं परस्परांची मदत मिळावी व सर्व मिळून जी एक इष्ट दिशा ठरावली जाईल त्या दिशेकडे आस्ते आस्ते सर्व जातींतील सुधारणेचें सुकाणू फिरविलें जावें असा आहे.

( पुढें चालू )

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध २ शके १८१९

दुष्काळा करितां ह्मणून राखून ठेवलेल्या पैशा पैकीं गेल्या पंधरा वर्षांत निवळ दुष्काळ निवारणार्थ असा काय तो ३० लाख खर्च झाला. व यावरून सरकारानें गेल्या वर्षी ताळा करून असा विचार केला कीं दर वर्षी दीड कोट रुपये राखून ठेवण्यांत अर्थ नाहीं. व शेवट दीड कोट न ठेवतां एक कोट रुपयेच ठेवावेत असें ठरलें. आमच्या दूरदर्शी मुत्सद्यास एवढा पैसा बस आहेसें वाटलें खरें, पण सध्यां तर अगदीं विलक्षण वेळ येऊन बेतली आहे त्याच्या ताळ्यास ह्या वेळीं निदान मेळ जमत नाहीं. हल्लीं सारखे विकट दिवस इकडे इंग्रजी झाल्यापासून कधीं ओढवले नव्हते. इतक्यांतच नाहीं तरी तीस लाख लोक दुष्काळ कामावर आले आहेत व त्यांच्या करितां रोज तीन लाख रुपये खर्च होत आहे. व असेंच अगदीं कमींत कमी आणखी सहा सात महिने चालणार. बजटांत, २ कोट आधींच खर्च झाला आहे पण या एका वर्षींच दुष्काळा साठीं साडेतीन कोटीच्या वर खर्च लागेल. आमच्या कडील पैशा संबंधाची कितपत दूरवर नजर देऊन व्यवस्था होत असते याचें हें ढळढळींत उदाहरण आहे. आमच्या प्रांतांत तरी दुष्काळ कांहीं आपला अचानक आला असें नाहीं. पूर्व चिन्हावरून त्याचें भविष्य उघडच दिसत होतें. व तें आतां खरोखरीच ठेपलें तर आतां तरी खर्च कमी करणें वाजवी होणार नाहीं आणि ह्मणूनच १॥ कोटीचे पूर्वींचें संवशन कायम करण्या बद्दल सरकारानें पुन्हां एकदां विचार करावा.

गेल्या ४० वर्षांच्या अवधींत या पूर्वी दोन वेळां मोठा दुष्काळ पडला होता. त्या वेळीं त्याचीं कारणें व निवारणार्थ उपाय या संबंधीं दोन्ही वेळां सरकारी रिपोर्टांतून लिहून आलें होतें. पण त्या गोष्टी कागदांतल्या कागदांतच आनपावेतों राहिल्या.

रिपोर्टांत लिहिल्या प्रमाणें दुष्काळाचें एक मुख्य कारण असें आहे कीं, हिंदुस्थानातील शेंकडा ८० लोकांना शेतकी शिवाय दुसरा चरितार्थाचा मार्गच उरलेला नाहीं. शेतकीचें काम बोलून चालून पाऊस पाण्यावर अवलंबून. केव्हां कसा काय प्रसंग गुजरेल याचा नेमच नाहीं. तर अशा अनिश्चित बेभरंवशाच्या धंद्यावर जीवापाड श्रम करून कसा तरी दिवस काढावा लागतो. तर ही या अनाथ लोकांची दैना, दुसऱ्या कलाकौशल्याच्या धंद्यास उत्तेजन देऊन, सरकारनें दूर करावी. तसेंच सर्व प्रांतांत, बंगाल प्रमाणें, जमिनींचा धारा कायमचाच ठेवावा.

सध्यांच्या भयंकर दुष्काळामुळें आतां चांगले डोळे उघडले आहेत. व या पुढें तरी ते आतां मिटून जाऊं नयेत. रेल्वे वगैरेच्या कामांनीं धान्य आणणें नेणें सुलभ जाते पण त्यानें दुष्काळ कांहीं रहात नाहीं. धान्यच कमी आहे असें नाहीं, तर मुख्य गोष्ट ही आहे कीं लोकांना कामधंदा कोठें लागत नाहीं. ह्मणून पैसे मिळत नाहींत आणि मग अन्नअन्न करीत मरावें लागतें.

या इतक्या दिवसांच्या अनुभवावरून काय करायला पाहिजे व काय नको हें उघड दिसतें तर याचा योग्य उपयोग सरकारानें करावा व आग लागली कीं, विहीर खणायची व विझली कीं ती बुजवायची असा व्यर्थ उपद्व्याप करूं नये व वेळींच सावध राहून काय करणें हें ठाम करावें. ह्मणजे या पुढें तरी दुष्काळांत लोकांचे अन्नपाण्यासाठीं जीव जाणार नाहींत.

## राष्ट्रीय सभा

( इंग्लंडांत पुढील बैठक )

नामदार सुरेंद्रनाथ बानर्जी, रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर व मोरो विश्वनाथ जोशी यांनीं सन १८९० मध्यें विलायतेस राष्ट्रीय सभेची चळवळ उठवून दिली आणि नामदार सुरेंद्रनाथ यांच्या अलौकिक वक्तृत्वामुळें जी यशश्री आपल्या राष्ट्रकार्याला तेव्हां पासून आली आहे ती आमच्या मनांत वारंवार इंग्लंडांत राष्ट्रीय सभा भरविण्या विषयीं प्रेरणा करिते. हल्लीं चालू असलेल्या रायल कमिशन पुढें साक्षी निमित्त विलायात राष्ट्रभक्त वाचा, बानरजी, गोखले सुब्रमणी अय्यर इत्यादि भट विलायतेस गेले आहेत. शरीर प्रकृतीच्या दुरुस्ती साठीं नामदार फेरोजशहा मेथा हे लवकरच जाणार आहेत आणि महाराणी सरकारच्या जुबिलीच्या समारंभा प्रित्यर्थ कांहीं अधिक गृहस्थ या देशांतून जातील. सर्व राष्ट्राचा एक विचार ठरल्यास आणखी कांहीं गृहस्थ राष्ट्रीय सभे साठीं विलायतेस जाण्यास प्रवृत्त होतील. या शिवाय इंग्लडची दादाभाई प्रभृती मंडळी आपली विलायतेंत आहेच. अशा या समयाला चालू सालची राष्ट्रीय सभा लंडन येथें भरवावी ही उत्तम गोष्ट होय. डायमंड जुबिलीचे उत्सव सर्वत्र चालले आहेत अशा वेळीं महाराणी सरकार विशेष उदार व सदय बुद्धीनें आपल्या देशाची याचना तृप्त करितील. हल्लीं दुष्काळ व तापाची सांथ या मुळें ब्रिटिश राज्यकारभारांतील सर्व व्यंग्यें उजेडांत फार स्पष्टतेनें आलीं आहेत आणि सध्यांची आपली ओरड विशेष तत्परतेनें ऐकण्यांत येईल अशी सर्व राष्ट्रास आशा वाटते. ही अशी उत्तम संधी व्यर्थ जाऊं नये ह्मणूत "चांपियन" पत्राचे प्रकाशक मि. चेंबर्स हे मोठ्या आग्रहानें सर्व राष्ट्रास सुचवीत आहेत. आह्मास ही सूचना फार नामी वाटते. उमरावतीस भरणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या फंडांतून जरूरी लागल्यास खर्च करण्यास परवानगी देण्यात यावी आणि ही वेळ साधून घ्यावी. वेल्बी कमिशना पुढील झालेल्या साक्षींनीं सर्व ग्रेटब्रिटनभर चळवळ उडालेलीच आहे. अशा वेळीं राष्ट्रीय सभेची मोहिम अत्यंत लाभप्रद होईल असें आह्मांस वाटतें.

आह्मास लिहिण्यास अतिशय दुःख वाटतें कीं रा. रा. विष्णु वासुदेव खरे, स्टेशन मास्तर, आकोला यांस गेल्या शुक्रवारीं रात्रौ देवाज्ञा झाली! आमच्या शहरचा एक उत्कृष्ट मोहरा गेला. राजश्री विष्णुपंता सारखा रत्नमाणुस हरपला हें आमचें दुर्दैव होय. अंगाचा बांधा धिप्पाड, शरीरसंपत्ती उत्तम, आणि राहणी बाळबोध व आरोग्यवर्धक अशी सर्व प्रकारची अनुकूळता होती ह्मणून असा पुरुष दीर्घायु निघेल आणि खऱ्या वार्धक्याचा काल पाऊणशे वर्षां नंतरचा असतो असें आमच्या अनुभवास आणील असा आमचा पक्का ग्रह होता. पण मानवी गोष्टी खरोखर लटक्या! तीन दिवसांच्या अवधींत हाताच्या बोटाला पेर ह्मणून व्यथा जडली, ताप फार चढला आणि अखेरीस संनिपाताच्या किंवा मधुमेहाच्या आजारांत त्यांचा अंत झाला. ग्रेट इंडियन पेनिनशुला रेलवे कंपनीच्या अगदीं जुन्या मंडळी पैकीं हे एक होते. नेटीव स्टेशन मास्तरांमध्यें यांचा पगार मोठा व हुद्दा मोठा होता. कंपनीच्या अनुभवी, वजनदार, व विश्वासू अधिकाऱ्यापैकीं हे एक होते. यांची कार्यनिष्ठा फार विलक्षण असे. कर्तव्याची खरी मातबरी यांच्या पासून शिकून घेण्यासारखी असे, हाता खालील अधिकारी यांच्या वरिष्ठपणाला माना डोलवीत असत. हे वर्तनानें करारी असून बाणेदार व लौकिकसंपन्न होते. अंमल दराऱ्याचा पण अती सौम्यतेचा, व गोडीगुलाबीचा असे. यांचें खानगी वर्तन अगदीं निर्मळ असून धर्मावर मोठी निष्ठा असे. अलिकडे यांस योगाभ्यासाचा नाद लागला होता. याचीं मतें जुन्या पद्धतींचीं होतीं तथापि खऱ्या सुधारणे विषयीं यांचे विचार पक्या आग्रहाचे व निश्चयाचे असत. त्यांच्या मागें त्यांची वृद्ध मातोश्री व धाकटा बंधु कोंकणात गुहागरास असून त्यांची येथें द्वितीय पत्नी व पाच सहा मुलें आहेत. मरण समयीं यांचें वय ५४।५५ वर्षांचें होतें. सर्व घराण्याचा खंबीर खांब खचला आणि इतर आप्तमित्रांचा एक शहाजोग दोस्त जमीनदोस्त झाला अशा वेळीं 'ईश्वराची इच्छा' या मंत्रावर मनाचें शांतवन केलें पाहिजे.

राधनपूर संस्थानाला कोणी वाली नाहीं असें झालें आहे. महाराणीला काडीची सत्ता नाहीं. तिची दशा गरिबा पेक्षांही वाईट आहे गुप्त खजिना काढण्याच्या कामांत पोलिटिकल एजंट मेजर लाइड हे दंग आहेत. एक गोष्ट यांच्या डोळ्या समोर दिसते. गुप्त धनाची बातमी लागली कीं साहेब बहादुरांचा मोर्चा वाटेल त्या रीतीनें सर्वत्र फिरतो. महाराणीचा झाडा देखील घेतला जातो. अपमानाची शितीच राहिली नाहीं. सुवर्णाचे दागिने, जवाहिर वगैरे मिळून ४ ½ पासून पांच कोट रुपये किंमतीचें सांपडलें आहे. गुप्त धन असलें ह्मणजे तें चोरलेल्या मालाच्या स्वरूपांत जातें असा सर्व झोंक दाखवितात. ईश्वर करो आणि राधनपूरच्या संस्थानावरील इडापिडा टळो!

## The Berar Samachar

MONDAY MAY 3 1897

The feasibility of a National Congress in London is the absorbing idea before our mind. There are no two opinions about the high utility of a session of the Indian National Congress in the very centre of Great Britain. Such a public declaration of the grievances of our people is most necessary. A meeting like that will evoke sympathy and a righteous feeling in the hearts of the British people. It is no longer a question of the necessity or desirability of holding the Indian National Congress in England but it is merely a matter of time and distance, and expense. Mr. W. A. Chambers, Editor of the Champion makes a purpcsal to hold the next Congress in London. The proposal is most opportune and is not so difficult as it appears at first sight. We approve of it with a willing heart and would endorse it will full emphasis. In connection with the Welby Commission some of our best men—we mean Mr. D. E. Wacha, Professer G. K. Gokhale the Hon'able Surrendra Nath Bannerji, and the Hon'ble Subramanya Ayer—are now in England. The Hon'ble Mr. P. M. Mehta will shortly proceed to England to recruit his health. Some more are expected to go to England to be present at the grand rejoicings and festivities of the Diamond Jubilee in the latter half of June. If we make it a point some forty or fifty gentlemen will gladly come forth to serve their country. Thus a modest number of delegates will be available. One Congress in Enland is worth a dozen in India. The funds that will be raised for the next Congress at Amraoti may with benefit be utitized towards the travelling and other expenses wherever such a measure will be imperative. We give

below Mr. Chamber's view in this eloquent terms and request that we must not let slip an occasion like this. "Whilst famine and starvation, death and misery are stalking the land, the Congress cry for self—representation, financial economy, and administrative improvements might not go forth in vain, and a more appropriate time could not be found for a telling condemnation of our financial system; a system which suffers a fund intended for saving people from the dire effects of famine, to be diverted over and over again for other purposes—wasteful and unproductive. We feel that such an occasion may never arise again; and there should, therefore, be no delay in settling the point. The sitting should take place not later than July; that is, the Congress arguments and remonstrances might be made before the Royal Commission writes its report and submits it to Parliament. The matter, we accentuate, is urgent; for the situation is critical; tens of thousands are dying from famine, and it is a most opportune time for demanding redress from the burden some taxation which we suffer, and for economy, retrenchment and administrative reforms. It, too, will be an historical event worthy of the year of the Diamond Jubilee of the Queen—Empress, to carry the Congress banner right into the very heart of the Empire and there to unfurl it; under its shadow to gather the collected wisdom of the educated and enlightened of her Majesty's subjects of all castes, colors and creeds who hail from the largest of her dependencies—the Kohinoor of her Imperial Crown. What an impressive sight it would make!"

Now is the time for us to move in this direction and let us see how we succeed in it.

---

We are glad to see that our local Government has taken into consideration our remarks in connection with the off-hand dispensation of the services of Messrs C. Shamrao and Hyder Alli Attaches to the Resident. We learn that until further orders their services are retained and that a due and considerate view of the matter weighs so much with the Resident that a remodelling of his first peremptory orders will soon settle the question in the right direction.

---

An excellent gentleman has fallen from our midst. We regret to announce the sudden death of Mr. Vishnu Wasudev Khare, Station Master, Akola on Friday last. The death was due to fever brought on by the swelling of a finger and to an unforeseen development of diabetes. Mr. Vishnupant was a trusted and influential officer of the Company and the record of his meritorious services will speak volumes in his favour. As a Station—Master, he was decidedly a favourite of the people at large. He was held in high estimation by his superiers and was revered in a tangible manner by his subordinates. The central point in his successful career is his extreme devotion duty, his dignified life either private or public and his general good—will towards all. He inspired awe and confidence in all who came in contact with him. In all human calculations he was not destined to die at the beginning of his 55th year. He looked a big, stout and well—built man and none could foresee his sudden removal. In the short run of some three days his health sank tremendously and he had at last to yield. A large family and still a much larger circle of his friends will mourn his loss and they all look expectantly to the principal officers of the G. I. P. Railway for the provision of a competency of income to his family as a reward for his noble services and as a tribute to his honored memory.

---

The Hon'ble Mr. Balwantrao Bhuskute has thus summarized the principal reforms he suggests in the numerous items of the annual budget:—

" (I) That the Famine Insurance Grant should be raised to 1¼ crore.

(II) That after the famine is over the Government should institute an inquiry to determine how far effect has been given to the two previous Commissions; and to suggest means for preventing, as far as possible, the helplessness of people in time of famine.

(III) That the restrictions placed upon the responsibility of the Government should be reconsidered.

(IV) That as far as possible, further borrowings should be restricted to rupee loans, in place of sterling obligations.

(V) That the enormous proportion of permanent establishment charges in State public works, should be reduced.

(VI) That, as the famine is the principal factor in this year's Budget, it is desirable in every way for the Government not to embark on any large scheme of railway expansion directed towards mere improvement."

## वऱ्हाड

हवामान—उष्णतेचें मान ११४ अंशाव र जातें, रिते मेघ आकाश व्यापतात व सर्व वृक्षादि निश्चल होतात, तेव्हां तलखी फार होते प्रखर उन्हा मुळें पटकीचा उपद्रव कांहीं कांहीं ठिकाणीं उद्भवला आहे. पाण्याचें दुर्भिक्ष्य व दुष्काळाच्या यातना यामुळें लोकांचा धीर सुटत चालला आहे.

दहिहांडा येथील दुष्काळाच्या कामावरील लोक हवेच्या उपद्रवा मुळें सैरावैरा काम सोडून पळून गेले आणि त्या मुळें हें काम बंद झाल्यांतच जमा आहे.

मेसर्स सी. शामराव व हैदरअली या उभतां अऱ्याचींस गेल्या १ले तारखे पासून जबरीची रजा देणार होते पण तो हुकूम रद्द करण्यांत आला आहे हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो.

वऱ्हाड प्रांतांत दुष्काळाच्या कामावर असलेल्या लोकांच्या संख्येचे मान तारीख २० रोजीं येणें प्रमाणें होतें:—

अकोला जिल्हा.

| स्थळ | मजुरदारांची संख्या |
|---|---|
| कान्हेरी | ५५५ |
| बारशी टाकळी | ६०० |
| बाळापूर | ५९४ |
| जळगांव | ५८६ |
| दहिहांडा | २५१४ |
| तेल्हारा | ९५१ |
| जनुना | १४७६ |
| येरंडा | ५०८ |
| अकोला | ७३५ |
| पातूर | २५० |
| खडकी | २५० |
| **उमरावती जिल्हा** | |
| कालापाणी | १३०७ |
| वडाळी | २७१७ |
| कारंजा | १६३८५ |
| नांज्री | २५९५ |
| बोरखेरी | ३४१ |
| **वाशिम जिल्हा** | |
| वाशिम | २५२ |
| मालेगांव | १३ |
| चांदस | ९११ |
| मुंग्ला | २९७ |
| अंजेनखर | ४६८ |
| कोंडाला | ३२२ |
| अनासिंग | ४५८ |
| सिलोना | ६७९ |
| शेंदुरजन | ३८२ |
| दुब्बडी | ४६४ |
| **बुलडाणा जिल्हा** | |
| मलकापूर | ८८० |
| मेहकर | ६११ |
| देऊळगांव | २८२ |
| **इलिचपूर जिल्हा.** | |
| खटकाली | ३६५ |
| भवाई | ३०५ |
| झिरी | ५२३ |
| धूलघाट | २१ |
| तेरबंदा | ४३ |
| तीतू | ९२ |
| देवगांव | ५२८ |
| **वणी जिल्हा** | |
| दारव्हा | १३१९ |
| लोहारा | ४१६ |
| एकूण | ३३४२४ |

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९० रुपये |
| जवारी | ९४ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२० रु० |
| ,,( बनशी ) | १३० रु० |
| चणे | ११० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ७। मण |
| सोनें | २६॥। तोळा |
| चांदी | ८५ |

### नोटीस

तीर्थस्वरूप रा० रा० चिमणाजी नारायण कुळकर्णी मौजे कदमापूर ता० खामगांव यांस नोटीशीनें विज्ञापतीनें मी खाली सही करणार असें कळवितो कीं आपण ता० १३।४।९७ नोटीस दिली ती पावली सर्व मजकूर समजला याचे उत्तर सालमजकूरी ।सिंहस्थ ४ महिनें राहिला आहे तो निघाल्या नंतर याजबद्दल विचार केला जाईल. मात्र आमच्या परवानगी शिवाय तुह्मांस कांहीं हालचाल करतां येणार नाहीं केल्याल त्या बद्दलचे भाऊ बंदकीचे संबधानें उत्पन्ना बद्दल तुमच्या अशा करण्यानें आमचे नुकसान होईल त्याजबद्दल जबाबदार धरलें जाल. कळावें. हे विज्ञापना तारीख २ माहे मे सन १८९७ इ०

सही

बाळकृष्ण देवराव कुळकर्णी बोनगांवकर हल्लीं मुकाम मनजगांव

दस्तुर खु०

### नोटीस

कृष्णाजी वल्लद रावजी डेरे राहणार मौजे खरबाडी तालुके मलकापूर जिल्हे बुलडाणें यास नोटीस देणार अहिली मर्द कृष्णाजी डेरे राहणार बाखराबाद तालुके अकोलें जिल्हा मजकूर-कारणें नोटीस देते कीं मी तुझी लग्नाची बायको असून तूं मजला न वागवितां हांकून दिले त्यास सुमारे ५ वर्षे झाली. आणि तूं दुसरी बायको पाटाची केली मी वर लिहिलेले गांवी मोल मजूरी करून पोट भरीत आहे तुमच्या पोटच्या मजला दोन मुली असोन एकीचे लग्न कर्ज काढून मी केले. व एक मुलगी आजमास ४॥ वर्षांची आहे हल्लीं दुष्काळाचे दिवस असल्यामुळें मोल मजुरी मिळत नाहीं आह्मी तिघी जणी अन्न अन्न करीत आहो. यास्तव तुजला कळविते कीं ही नोटीस तुजला पावल्या पासोन तूं मजला मुली सुद्धां आठ दिवसांनीं घेऊन जाऊन जन सिरस्ते प्रमाणें वागवावें. तसें न करशील तर मजला तूं फारकती द्यावी या प्रमाणें वर्तन न केल्यास कायदेशीर रितीनें तुजवर अन्न वस्त्राचा दावा करून मजला मुलीचे लग्ना सुद्धां व खाण्याचे खर्चा सुद्धां ५०० रुपये कर्ज देणें आहे त्याचे व्याजा-सुद्धां व या नोटिशीचे खर्चा सुद्धां फिर्याद करून हुकूम नामा करावा लागेल. यास्तव वर लिहिल्या प्रमाणें माझी पोट पाण्याची व कर्जाची तजवीज करून देणें कळावे ता. ३० माहे एप्रिल सन १८९७ इसवी.

( सही )

अहिली मर्द कृष्णाजी डेरे

निशाणी खुद्द बांगडी.

### नोटीस

हैबती वल्लद महादु आंधळे वंजारी राहणार खेलडी तालुके वाशीम जिल्हा वाशीम यास.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे पाटसूल प्रगणे पातूर शेखबाबू साहेब तालुके बाळापूर जिल्हे अकोले येथील शेत सर्वे नंबर १० पैकीं याचे खरीदीखत तुह्मी मजपासून ता० ८ माहे एप्रिल सन १८९७ इसवी रोजी रजिष्टर नंबर १५४ चा तुह्मी मजपासून रुपये १०० यांत करून घेऊन रुपये न देतां गांवीं जाऊन देतों ह्मणून करार करून रजिस्टर करून घेतले व गांवी गेल्यावर रुपये मागितले असतां दिले नाहीं. मजशी तुह्मी दगाबाजीनें दस्ताऐवज करून घेतला करितां तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं आठ दिवसाचे आंत तुह्मी दस्ताऐवज आणून देऊन विक्री परत करावी अगर आठ दिवसांचे आंत दस्तैवज विक्री परत न करून न दिल्यास मी तुमचेवर कायदेशीर व्यवस्था करीन याजबद्दल जें कांहीं नफा नुकसान होईल त्याजबद्दलचे जबाबदार तुह्मांस धरले जाईल. याजबद्दल नोटीस वगैरेस जो खर्च लागेल तो तुह्मांवर आहे. करितां अगाऊ नोटिशीनें कळविलें आहे कळावें तारीख १।५।९७ इ०

( सही )

चांगुबाई मर्द रामजी सानफ राहणार जवळ प्रगणें अनासिंग तालुके जिल्हे वाशीम निशानी खुद्द हातची बांगडी असे.

---

## वर्तमानसार.

लाख रुपयांचा उपदेशः— दिल्लीपती ग्यासुदिन बलवान याची माहिती इतिहास वाचकांस सांगावयास नको. यानें आपल्या पुत्राला केलेला उपदेश फेरिस्तानें आपल्या पुस्तकांत उतरून घेतला आहे, त्याचा सारांश महाराष्ट्र वाचकांसाठीं येथें सादर करितों.

"तख्तनशीन झालास ह्मणजे मी ईश्वराचा प्रतिनिधी आहे असें समजून वागत जा. आपणांवर जबाबदारी आहे ती केवढी तें अगोदर चांगलें ओळखून ठेव. स्वतःच्या वर्तनांतील हलकेपणानें तुझ्या थोरपदास कींलिमा लागूं देऊं नको इतकेंच नव्हे तर हलकट व लोभी माणसावर तुझी मोहबत होतां कामा नये व त्यांचा राज्यकारभारांत कोठेंच शिरकाव कदापि होऊं नये हें पक्कें ध्यानात असूं दे."

"आपल्या मनोविकारांस विचाराच्या लगामी ठेव; क्रोधाच्या तावडींत सांपडावयाचें नाहीं ही खबरदारी बाळग, क्रोध हा मनुष्यमात्रांचा दुष्मन आणि त्यांतून राजांच्या घाताचें कारण होय" "सारासार विचारशक्ति आणि कल्याण होईल असेंच वागण्याकडे सदा प्रवृत्ती असणारें तुझें मन या उभयतांच्या सल्याप्रमाणें तर खरें पण शहाणपणाच्या काटकसरीनें युक्त अशी परोपकारी औदार्याच्या कामीं तूं आपल्या खजिन्याचा व्यय करीत जा."

तुझ्या आचरणांवरून ईश्वर भजनांचा ठसा लोकांवर उठीव. दुर्गुण आणि नास्तीकपणा याचें योग्य शासन दिल्या शिवाय राहूं नको. "चांगलें लक्ष घालून दरबारचें काम पहात जा. ह्मणजे खटपटी व उलाढाली कारभाऱ्यांची तुजपुढें डाळ शिजावयाची नाहीं व त्यांची मात्रा तुजवर चालणें कठीण"

"तूं राज्यकारभार चालविणार तो तुझ्या कामदारां मार्फत. ह्मणून यत्किंचित ही हयगय किंवा कसूर न होतां तुझ्या हुकुमाची तामिली बजाविली जातें किंवा नाहीं हें तूं मोठ्या काळजीनें पहात जा."

"आपले न्यायाधीश तूं निवडशील ते स्वधर्मशील, सद्गुणी आणि लायक असे असूं देत जा. न्यायाच्या प्रकाशानें तुझें राज्य शोभायमान दिसूं लागेल."

"राजपुरुष या थोरपणाला हीनत्व आणणारें कोणतेंही खानगी किंवा दरबारी कृत्य तुझ्या हातून घडणार नाहीं अशी खबरदारी ठेव; तुझी सर्व व्यवस्था इतकी चोख व नियमित असूं दे कीं, तेणेंकरून तुजसंबंधानें पूज्यबुद्धी व दरारा प्रजेमध्यें आपोआप उत्पन्न झाला पाहिजे. तुझ्या संबंधानें प्रजेंत पूज्यबुद्धी आणि दरारा असेल तरच तुझी थोरवी वाटून तुझ्या हुकुमाची तारीफ करीत अम्मल बजावणी होत जाईल."

"बुद्धी, विद्वत्ता आणि धैर्य यांहीं युक्त अशीं माणसें शोधून काढण्याच्या कामीं तूं बिलकूल कसर करूं नको हलक्या माणसाला एकदम थोरपणाला चढवूं नये, कारण तेणेंकरून तो स्वतःला विसरतो आणि श्रेष्ठ योग्यतेच्या माणसांच्या डोळ्यांत हा माणूस सारखा सलत असतो.

"अगदीं अडेंच असें असल्याशिवाय कोणत्याही कामाला हात घालूं नको, त्याच प्रमाणें हातून अखेर पर्यंत मजल मारवेल त्याच कामास हात घाल, अमूक एक काम हातीं घ्यावयाचें असें ठरलें ह्मणजे मग तुझा निश्चय बिलकूल डळमळूं देऊं नको. किंवा त्यांतून मन काढून घेतां कामा नये; राजानें हट्टी असणे चांगलें, पण त्यानें कुजक्या मनाचें आणि चंचळ व धरसोडी असतां कामा नये. एखाद्या गोष्टीचा हट्ट धरण्यांत कदाचित चांगलेंपणा असूं शकतो आणि त्यांत कल्याण असण्याचा संभव शक्य आहे, पण धरसोडीत मात्र हटकून सारें उलट. त्यांत चूक ही असावयाचीच; चंचळपणाच्या किंवा धरसोडी वर्तनाच्या योगानें राजाच्या दुर्बल मनाची प्रजेला खास खात्री पटते तशी दुसरी कशाच्या योगानें पटत नाहीं.

या उपदेशाची योग्यता व्यक्त करून दाखविण्याची आवश्यकता नाहीं, पण हा उतारा पुरा करण्यापूर्वी, बंगाल्याच्या सुभ्यावर जाणाऱ्या आपल्या नबाबास दुसऱ्या एका पातशहानें केलेला उपदेश कोठेंसा वाचल्याचें स्मरतें त्यांतून एक वाक्य उतरून घेतों.

"याद राख तूं परक्या प्रजेवर अम्मल गाजविण्यास जात आहेस, तुझे आप्त, इष्ट, सोयरे, धायरे किंवा तुझे इतर स्वकीय यांच्यावर मोहबत दाखवावी असें तुला वाटलें तर त्यांची तरतूद तूं आपल्या घरीं वाटेल ती कर. राज्यकारभारांत नालायक माणसें आणि ती केवळ स्वकीय किंवा स्वधर्मीची व स्वजातीचीं असल्या कुत्सित विचारानें नेमणें यांत आपली आपण किम्मत कमी करून घेणें आहे. सुभेदार हा उच्च ठिकाणांवरील अधिकारी, त्याच्यापाशीं इतर साधारण माणसांस अनुरूप अशा भिडाभिड आणि वाशिले चालतात अशी प्रजेची समजूत होऊं देणें ह्मणजे आपल्या इमारतीच्या पायाला आपण होऊन सुरुंग लावणें होय. स्वजातीयाचा तुला कळवळा आहे ही गोष्ट बिलकूल बाहेर पडूं देऊं नकोस; मग तो दाखविण्याची गोष्ट कशाला! गुणांचा व लायकीचा कळवळा धर. जातीच्या कळवळ्याचा राज्यकारभारांत शिरकाव झाला ह्मणजे तूं आपण होऊन स्वकीयांस फूस दिलीस आणि चांगल्या माणसास दुखविल्यानें त्यांची दुस्मनगिरी संपादलीस असें होतें व आपल्या दोन्ही अस्तन्यांत अग्नि ठेविल्या सारखी तुझी दशा होईल, पण तुझा धर्म आणि तुझे लोक यांचा दरारा बसेल असें करण्याला विसरूं नको. त्या संबंधानें काफर प्रजेला तिरस्कार वाटूं देणें चांगलें नाहीं." स.वि.

हल्लीं ग्रीसबरोबर चाललेल्या लढाईकरता टर्की आपली ८०,००० फौज अथेन्सच्या सरहद्दीवर सहज पाठवूं शकेल असें सांगतात यावरून टर्की कमकुवत आहे असें होत नाहीं टर्कीची फौज फार तरबेजही आहे व सुलतानाची राजसत्ता कायम राखण्याकरतां मरेपर्यंत लढणारी अशी टर्कीची पुष्कळ फौज आहे ही बाणीदार फौज बहुत्येक एशिया मायनरपैकींच आहे तसेंच इकडून तिकडे जाण्यास लागणाऱ्या गाड्या वगैरेही भरपूर असून इतर सामान सुमानही सज्ज आहे इंग्लंडचा एकही माणूस शिलक नाहीं असें होईपर्यंत हिंदुस्थान इंग्लंडच्या ताब्यांतून जाऊं नये असा यत्न करण्यांत येईल ही जशी इंग्रजांची प्रतिज्ञा आहे त्याचप्रमाणें युरोपांतली टर्कीच्या सुलतानाची राजगादी कायम राखण्या करता आमच्यांतला प्रत्येक मुसलमान मरण्यास तयार होईल असें जगांतल्या सगळ्या मुसलमानांचें ह्मणणें आहे असें ही सांगतात; आणि तें खरें असण्याचा संभवही आहे. सुलतानाची गादी गेली कीं जगांत मुसलमानाचें कांहीं राहिलें नाहीं असें होणार आहे.

या दोघांच्या दरम्यान क्रीट बेटाबदल रीतिप्रमाणें ता. १८ पासून लढाई सुरू झाली. टर्कीनें ग्रीसच्या दरबारच्या आपल्या राजकीय वकिलास परत बलावलें, आपल्या दरबारच्या ग्रीसच्या वकिलास निघून जाण्यास सांगितलें व ग्रीसच्या फौजेवर चाल करून जाण्याचा आपल्या फौजेस हुकूम दिला.

ग्रीसच्या हद्दीवर असलेल्या टर्कीश कमांडरानें लढाई सुरू करण्याची पूर्वीच परवानगी मागितली होती.

क्रीट बेटांत ग्रीसचा जो व्यवहार चालला आहे तो सहन करण्यासारखा नाहीं ह्मणून एकदा रक्तपात होण्याची सुरवात झाली ह्मणजे मुसलमानलोक खवळून जातील असें टर्कीच्या सुलतानानें बड्याराजास आगाऊ कळवून टाकलें

ग्रीक सरकारानें या लढाईच्या खर्चास लागणारी बरीच मोठी रकम मंजूर करून टाकली.

लढाई करण्याचें ठरतांच ग्रीसच्या हद्दीवर जागोजाग लढाया सुरू झाल्या.

टर्कीनें ग्रीसचें एक लढाऊ गलबत बुडविलें. ग्रीसच्या गलबतानें प्रेवेसा ठिकाणावर गोळे सुरू केले—मेनेक्स हें तटबंदीचें ठिकाण ग्रीसनें घेतलें.

शुक्रवारीं एका दरींत लढाई सुरू होऊन ३० तास चालली होती. २०,००० शिपाई लढत होते. टर्कीचा जय झाला. ग्रीसनें प्रेवेसा ओसाड करून किल्ला बंद पाडला—टर्कीचे दोन तोफखाने बंद पाडले शनवारीं कडक लढाई झाली त्यांत ग्रीस हटला नाहीं.

मनुला खिंड टर्कीनें ताब्यांत घेतली—प्रेवेसा किल्ल्यावरील किल्लेदारानें ग्रीसची आक्शन छावणी उध्वस्त केली. पुष्कळ शिपायी ठार झाले.

पुन्हां लढाई जुपली. टर्कीचे २२,००० शिपाई होते, पण त्यांस ग्रीसनें पुढें सरू दिलें नाहीं. ग्रीक प्रथम मागें हटले, पण मदतीस दुसरी फौज आल्यावर पुन्हां पुढें सरले. रेवनी खिंडींत कडक लढाई होऊन टर्कीची पिच्छेहट झाली व पुष्कळ नुकसानही झालें.—मलु खिंडितल्या लढाईत टर्कीचे २०० मेले व ग्रीसचे एक हजार मेले—ग्रीस फौज एपिरसमध्यें शिरली—राजपुत्र ड्युक आफ स्पार्टा व प्रिन्स निकोलास लढाईच्या कामावर गेले—टर्कींतल्या ग्रीक लोकांच्या रक्षणाची हमी फ्रान्सानें घेतली आहे—रशियाच्या सूचनेवरून सर्विया, बलगेरिया व मांटेनिग्रो या संस्थानांनीं या लढाईत पडावयाचें नाहीं असें कबूल केलें आहे.

तिरनव्होच्या पश्चिमची तटबंदी छावणी ग्रीसने सोडली व ती आपल्या कबजांत घेण्याचा उद्योग टर्कीचा सुरू आहे.—टर्कीचा तोफखाना फार छान काम करतो.— तिरनव्होच्या नैरृत्येच्या शारफोज ठिकाणावर टर्कीच्या एका फौजेनें हल्ला केला. कडक लढाई करून ग्रीसेन टर्कीचे दामसी गांव घेतलें. मध्यें पडा असें दोघां पैकीं कोणी तरी एकानें झटल्यावांचून कोणा राजानें आंत पडूं नये असें रशियाचें ह्मणणें असून तें बहुतेकांस कबूल दिसतें. आजपर्यंत टर्कीचा जय आहे ग्रीकनें आपल्या देशांतल्या पोलिसासही लढाईवर बोलाविलें व गांवकऱ्यांनीं पोलिसाचें काम करावें असा हुकूम केला. ग्रीसची कांहीं फौज मोहरबंद लखोटा घेऊन अथेन्सहून निघाली. सालोनिका व कानस्टांटिनोपल यांच्या दरम्यानचा रेल्वे रस्ता तोडण्याचा ग्रीक बंडखोरांनीं यत्न केला पण त्यांस हाकून लावण्यांत आलें.

ग्रीस व टर्की यांच्यांत कोणास हात घालणें असल्यास तो सर्वांनीं मिळूनच घातला पाहिजे असें रशियाचें ह्मणणें आहे. व त्याबद्दल इंग्लंडाच्या कांहीं हरकती आहेत—ग्रीस व टर्की एकमेकांवर तोफा सोडीत आहेत—ग्रीसची नवी फौज येत आहे—दोन्ही पक्षाचे सरदार जास्त फौज मागत आहेत—रविवारच्या आंत मासेडोनिया येथें पाद्याच्या नव्या पांच नेमणुका न केल्यास बलगेरिया आपली फौज सज्ज करील असें बलगेरियाच्या वकिलानें टर्कीच्या सुलतानास कळविलें व सुलतानानें रस्थानीपणाचें उत्तर दिलें आहे.

माटी ठिकाण सोडण्याचें कडक लढाई झाल्यावर ग्रीसला भाग झालें. त्याचप्रमाणें नेझरो ठिकाणही सोडावें लागलें—रायनी टर्कीनें घेतलें ग्रीसनें तोफा सोडून टर्कीच्या सामानाचा नाश केला. या लढाईवर एदम पाशा हा टर्कीचा मुख्य सरदार असून त्यास सामानाची अडचण पडली आहे. तीरनव्हो येथें ग्रीसनें हल्ला केला, पण मार खाऊन परत यावें लागलें.— इंग्रजांचीं ८ गलबतें डेलिगोवाबे येथें आलीं व फ्रेंचांचें एक आलें.

नायगर हिंटरलांड येथें फ्रेंचलोक जी चळवळ करीत आहेत त्यांस जर्मन हरकत करीत आहेत आणि फ्रेंचांनीं बोमा घेतलें ह्मणून इंग्रज हरकत करीत आहेत.

गेल्या एका वर्षांत इंग्लंडांतला विलायती कोळसा ४०,००,००० टण बाह्य देशी खपला!

केप येथें संरक्षणाकरतां जास्त फौजेची गरज असल्यामुळें ११,००० फौज पाहिजे आणि तेथें राहाणाऱ्या सर्व गोऱ्या पुरुषांस सक्तीनें शिपायी करण्याचा नियम करावा अशी नेमलेल्या कमिशनाने विलायतसरकारास सूचना केली आहे.

हरिद्वारच्या शेजारी साथीनें कांहीं माणसें लागलीं ह्मणून हरिद्वार येथें फार कडक बंदोबस्त केला.

कलकत्ता शहरांत एके ठिकाणीं खणण्याचें काम चालू असतां भुयारांतून जाण्याचा एक चोररस्ता सांपडला आहे. हा रस्ता ह्मणजे पाणी वगैरे जाण्याचा नसून माणसांस जाण्यायेण्या करतांच बांधलेला आहे असें ह्मणणें आहे ठा० अ०

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास.............................. ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ......... ०१ ०६
दुसरे खेपेस ......... ०१

Six monthly......... 3 ...... ... ...,, 8
Single copy ..................... 4

Advertisement.
Below 10 lines ... 1 R
Per line over 10 ... 4 a
Repetition Per line ... 3 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI AKOLA MONDAY 10 MAY 1897 NO 18

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख १० माहे मे सन १८९७ इ० अंक १८

## जाहिरात

मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्ये खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातात, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवाअधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

## NOTICE

There are 2 Cornish and one Lancashire Boilers and one Gin Engine belonging to The Akola Native Cotton G. P. & S. Company for sale. Those who wish to buy are requested to have a look at the articles. Prices will be settled after the approval of the articls.

Deorao Vinayak
Chairman
Board of Directors.

## नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, धी अकोलें नेटिव्ह, कॉटन, जिनिंग प्रेसिंग आणि स्पीनिंग कंपनीतील कर्नीश बॉयलर नग २, ल्यांकेशायर बॉयलर नग व जिन इंजिन नग १ असे एकंदर ४ नग विकावयाचे आहेत. तर ज्यास घेण्याची इच्छा असेल त्यांनी सदर्हू कारखान्यांत स्वतः येऊन माल पाहून पसंत करावा. पसंत पडल्यास योग्य किंमत ठरविण्यात येईल.

देवराव विनायक
चेअरमन बोर्ड आफ डायरेक्टर्स.

## सामाजिक सुधारणा

( मा. अं. पुढें चालूं. )

रानडे साहेबांनीं सुधारणेचे निरनिराळे मार्ग आपल्या देशांत प्रचलित आहेत त्यांचा नामनिर्देश करून त्यांच्या बऱ्या वाईटपणा बद्दल एका भाषणांत साधारणपणें विवरण केलें आहे. जाती जातींनें आपले वेगळे समाज बनवून तेवढ्यापुरता विचार करावयाचा हा सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा एक मार्ग आहे. या मार्गा संबंधानें रानडे साहेबांचें म्हणणें पडतें कीं, "हा मार्ग आहे ठीक, पण सहानुभूति (sympathy) म्हणून जो आपल्या मनाचा एक अत्युत्तम धर्म आहे त्याची वाट अशा संस्थेपासून कुंठते, निदान मर्यादित तरी होते. आपल्यापुरतें तेवढें पाहण्याची सवय लागते आपल्यापेक्षा पाठण्याकडे अशा संस्थेपासून अप्रत्यक्ष मदत होते, आणि व्यापक दृष्टी अथवा सम दृष्टी नाहीशी होऊन जाते." मला वाटतें ह्या संस्थेच्या अंगीं वरील प्रकारचे दोष काढण्यापूर्वी सभोंतालच्या इतर कांहीं गोष्टी कडे म्हणजे परिस्थितीकडे लक्ष दिलें पाहिजे. आपल्यांत म्युनिसिपालिटी, क्लब्स, लायब्ररी, वगैरे अनेक संस्था आहेत या कारणानें चळवळ करणाऱ्या मंडळीस भिन्न जातीच्या गाणसाशीं खांद्याशी खांदा भिडवून काम करण्याचे अथवा एकमेकांचे हातांत हात घालून वागण्याचे अनेक प्रसंग येतच आहेत. निव्वळ जातीची एक संस्था असल्या कारणानें इतर सार्वजनिक संस्थांशीं विवक्षित जातींतील एखाद्या इसमाचा संबंध तुटतो असें नाहीं; आजपर्यंत जें आपणास उदार शिक्षण मिळालें आहे त्यावरून जातीभेद-बंधांत कितपत अर्थ आहे अथवा तिची मर्यादा राखावी, हें निदान पक्षीं साधारणतः तरी आपल्यास खास समजतें. देशाचें स्वरूप कोणतें ह्याची आपल्यास ओळख आहे आणि देशोन्नति ह्मणजे काय हें पण आपल्यास माहीत आहे, जर आपणास ब्राह्मो सारखा नवीन समाज बनवून अलग तुटून पडावयाचें नसेल तर सध्याच्या काळीं निव्वळ एकपक्षीं आपल्या पुरता विचार करणें आतां शक्य राहिलें नाहीं. जातीच्या संस्थांनीं आपला अधिकार आणि देशकाल यांवर दृष्टी ठेऊन दूर दृष्टीनें अशा जातीसंस्थेतील पुढारी लोकांनीं आपल्या संस्थेचें नियमन केलें तर अशा संस्थेपासून निःसंशय सर्वतोपरी फायदाच घडून येईल असें माझें मत आहे.

हा अफाट हिंदुस्थान देश अनेक जाती, अनेक धर्म, आणि अनेक पंथ ह्याच्या मिश्रणानें बनलेला असल्यामुळें सर्व राष्ट्राची एकसमयावच्छेदेंकरून सुधारणा करूं ह्मटल्यास आकाशाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करूं ह्मणण्यासारखें आहे हें सर्वांशीं जरी मला कबूल नाहीं तरी कांहीं अंशीं तें कबूल आहे. ज्या त्या जातीतील दोष त्या त्या जातीस कळणें जितकें संभवनीय आहे तितकें इतरांस वस्तुतः कळणार नाहीं. त्या त्या जातींतील स्थिति सुधारणेचीं कोणतीं अंगें स्वीकारण्यास समर्थ आहे हें समजून घेऊन तीं सुधारणेचीं अंगें आपल्या जातींत सुरु करणें हें अधिक सोईवार आहे असें मलाही कबूल आहे परंतु अशा जाती संस्थांनीं नेहमीं आपल्या समोर राष्ट्रीय सामाजिक परिषदेचे हेतू व मतें लक्षांत आणून तदनुसार प्रयत्न केले पाहिजेत. ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष केलें असतां खचित हित होणार नाहीं. ह्या धोरणानें ज्या जाती संस्था चालविल्या जातील त्या मला मान्य आहेत इतर मला मान्य नाहींत.

राष्ट्रीय सामाजिक परिषदे पासून आपला फायदा झाला आहे हें ज्याची बुद्धि विकार वशांनें दुषित झाली नसेल त्याला ढळढळीत दिसून आल्या वाचून राहणार नाहीं. अशा विकारवश झालेल्या इसमानें आजपर्यंत झालेल्या सभेचे नुसते रिपोर्ट वाचले असता देखील ह्या शंकेखोरांच्या अंतःकरणांत कांहीं उजेड पडेल अशी खात्री वाटते. चांद्रसेनीय कायस्थ प्रभू जातीची जी संस्था कोकणांत स्थापना झाली आहे तिची कल्पना आमच्या लोकांच्या डोक्यांत येण्याला ही महा परिषद्च कारण असें वाटतें. माझ्या जातीच्या ह्या संस्थेनें अथवा जातीतील इतर इसमांनीं सामाजिक सुधारणा करण्याचे जे प्रयत्न केले ते आज आपल्या पुढें संक्षिप्त रीतीनें सांगण्याचा प्रसंग आल्यानें मला फार आनंद होत आहे आणि थोडक्यांत ते आपल्या पुढें आतां सांगतो.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभुजाती ही एक वेळ आपल्या आर्यावर्तीचें स्वामीत्व भोगलेली आहे. तिनें मराठी राज्याची प्राणप्रतिष्ठा करण्यांत जी मदत केली ती, जाती मत्सर पिशाच्चानें, न वेरलेल्या प्रत्येक इसमास मान्य आहे. देशी संस्थानांतून ह्या जातीनें केलेलीं कर्त्यें काढून टाका ह्मणजे तितक्या मानानें ती दाजू लंगडी पडल्या शिवाय राहणार नाहीं मराठी इतिहास कायम राखण्यास हीच जात कारण झाली आहे अशा प्रकारें प्रसिद्धीस आलेल्या ह्या जातीची स्थिती हल्लीं फार शोचनीय आहे. आतांचा काळ असा आहे कीं जो हातपाय हालवील तोच टिका-धरूं शकेल पण इकडे आमच्या लोकांनीं बऱ्याच दिवसा पासून दुर्लक्ष्य केलें होतें. इतर जातींत बालविवाह, पुनर्विवाह इत्यादि सामाजिक बाबतींत कडाक्याचे वादाविवाद सुरूं असता तिकडे सर्वांशीं दुर्लक्ष्य करून आमची जात त्रयस्थ राहिली होती. ह्या चैतन्यशून्यतेचा परिणाम तिला भोगावा लागल्या वाचून तिची सुटका झाली नाहीं. इतर वेग हां हां ह्मणता सरसावून पुढें निघून गेला आणि आमच्या वर्गास तसेंच मागें रहावें लागलें. हा अनिष्ट परिणाम ढळढळीत निदर्शनास येऊं लागला तेंव्हां कांहीं मंडळी जागी झाली, आणि आपणही कांहीं हातपाय हालविले पाहिजेत, असें त्यांचें त्यांसच वाटू लागलें आज बऱ्याच वर्षा पासून. राजकीय, सामाजिक आणि धार्मिक बाबतीत तिचें कोणत्याही प्रकारें अंग नव्हतें, अगर असल्यास फारच अल्प प्रमाणाचें होतें. ज्या राजाचे निमक खातील त्याशी कल्पांतींही बेइमान व्हावयाचे नाहींत अशी पूर्वीपासून या जातीस सरटीफिकिटें मिळालीं आहेत आणि ह्याचा सत्यता आतां जरी पहाण्याचें कोणी मनांत आणाल तरी राजकीय चळवळींत हल्लीं आमचे कितीशे लोक पडले आहेत इकडे नजर दावी लागते त्यांच्या कडकडीत स्वामीभक्तीची पाहिजेल तर औदार्याची अथवा देशाभिमानशून्यतेची ह्मणा साक्ष आपल्यास मिळेल.

वायव्ये कडील प्रांत आणि आयोध्या प्रांत ह्यांत जातीतत्वावर सुधारणा सुरू आहे. त्याच तत्वास अनुसरून आमच्या जातीची हल्लींची संस्था "चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाजोन्नती परिषद" या नामाभिधानानें नुकतीच अवतीर्ण झाली आहे. कायस्थ, माथीव, आगरवाला, जैन जाठ, ह्यांची वरील प्रांतात प्रतिवार्षिक सभा भरून ज्या विषयांची चर्चा होते अथवा जी सुधारणा करण्याचे त्यांनीं हातीं घेतलें आहे तेच विषय व तीच सुधारणा अगदीं हुबेहुब आमच्या वरील समाजानें घेतलीं आहेत. यावरून ही प्रतिकृति होय असें माझें मत आहे असें कोणी समजू नये. "सोशियल कॉनफरन्स" चा गत वर्षाचा रिपोर्ट वाचीत असतां त्यांत वायव्य व अयोध्याप्रांत या संबंधाची हकीकत वाचण्यांत आली आणि चालू साली कल्याण येथें भरलेल्या आमच्या सभेचा रिपोर्ट आतां नुकताच वाचण्यांत आला त्यावरून ह्या दोहोंत मला पुष्कळ सादृश्य दिसून आलें आणि अशीं सादृश्यें मग तीं भाषेसंबंधीं असोत, गाथ्यांसंबंधीं असोत अथवा जनस्थिती विषयीं असोत ह्यापासून किंबहुनांच्या कल्पनाशक्तीस जो विलक्षण आनंद होत असतो त्याच मासल्याची माझी कल्पनाशक्ति असल्यानें मला आनंद होऊन हें सादृश्य येथें द्यावेंसें वाटलें. आपण सर्वच जण काळाच्या निर्घृण सपाट्यांत सांपडल्यानें आपली स्थिति बहुतेक अंशीं सारखी झालेली आहे यामुळें एका जातींत ज्या गोष्टीची प्रथम जरूर आहे त्याच गोष्टीची प्रथम जरूर दुसऱ्या जातींत असूं शकेल आणि ती आहे ही पण, एव ह्याच वरून एकीनें दुसरीचा कित्ता गिरविला असें ह्मणावयास नको, त्यांतूनही चांगल्या गोष्टीचा कित्ता गिरविण्यांत मला तर कांहीं नामोशी दिसत नाहीं.

आपल्या वऱ्हाडांत आमच्या जातींतील रा० रा० मल्हार खंडेराव चिटणीस, B. A., LL. B. उमरावती यांही जातींतील बालविधवांस दुःखमुक्त करण्याच्या हेतूनें एक विनंती पत्र काढलें होतें. ही वऱ्हाडांतील पुनर्विवाहाची चळवळ १८९४ साली सुरू झाली. यांनीं अशा आशयानें एक पत्र प्रसिद्ध केलें होतें कीं "आपल्या जातींत एखाद्या सुशील बालविधवेचा तरुण व योग्य गृहस्थाशीं पुनर्विवाह झाल्यास त्याजबरोबर पान पत्यास, शे दोनशे किंवा अमूकच कुटुंबें अथवा गृहस्थ मिळाले असतां वगैरे कोणत्याही प्रकारची अ... न घालतां जाती अव्यवहार व शरीरसंबं...

करण्यास तयार आहों अशी ज्यांची इच्छा असेल त्यांही आपली अनुमति प्रदर्शित करावी." सदहु विनंतीपत्र गवेिगांव व प्रांतोप्रांतीं जातीतील गृहस्थाकडे पाठविलें होतें व त्याप्रमाणें बऱ्याच प्रसिद्ध व पुढारी लोकांच्या अनुकूलतादर्शक सह्या मिळाल्या आहेत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. जातींतल्या पुष्कळ बालविधवा वैधव्यानलानें होरपळत असतां अझून एकही पुनर्विवाह घडून आला नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. परंतु त्यांतल्या त्यांत आनंद मानण्या सारखी ही गोष्ट आहे कीं, जे लोक ह्या विषयाचा नुसता विचार करणें ह्मणजे पाप मानीत, त्या लोकांत अशा विवाहास अनुकूल असें मत तयार होत चाललें आहे आणि मला पूर्ण आशा आहे कीं, लवकरच अशा प्रकारचा सुदीन प्राप्त होईल आणि अशी आशा बाळगण्यास अभिनंदनीय चिन्हेंही पण जातींत दृश्यमान होत आहेत.

ज्या जातींत पुनर्विवाह रूढ नाहीं अशा जातींत तो शास्त्रसंमत नाहीं असें बहुजनसमाजाचें ह्मणणें ज्या प्रमाणें आहे त्याच प्रमाणें आमच्याही पण जातींत मोठा जबरस्त आक्षेप घेण्यांत आला होता. सदहू आक्षपाचें मुद्देसूद खंडण आमच्या जातींतील वयोवृद्ध, बहुश्रुत व शास्त्रज्ञ असे जे रा. रा. अमृतराव अबाजी कार्णिक त्यांनीं शास्त्राधार देऊन ही गोष्ट शास्त्रसंमत आहे असें सिद्ध करून दाखविलें आहे.

पुढें चालूं.

---

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख शुद्ध ९ शके १८१९

---

वऱ्हाड प्रांतांत वहितींत आलेली व सरकारी सारा बसलेली जमीन एकंदर ७७,७९,०३८ एकर आहे आणि सारा बसलेली पण वहितींत येण्यासारखी जमीन ३,०७,९०९ एकर आहे. दोन्ही प्रकारच्या जमिनी मिळून ८०,८२,९६७ एकर आहेत. या प्रातांतील बहुतेक शेतांचें उत्पन्न पावसाच्या पाण्यावरील आहे. विहिरी, कालवे वगैरे प्रांताच्या विस्ताराच्या मानानें फार थोडे आहेत आणि ही उणीव सांप्रतच्या दुष्काळाच्या वर्षीं विशेष वाईट प्रकारें दृष्टीस पडते. पाटाच्या पाण्याची किंवा अशाच तऱ्हेची सोय उपलब्ध असती तर खात्रीनें या दुष्काळाचें स्वरूप बऱ्याकडे बदललें असतें. इतर प्रांतापेक्षां या प्रांताची जमीन चांगली सुपीक असून तिला पाणी थोडें पुरतें व कष्टमशागत देखील फारशी पडत नाहीं. कालवे काढणें, विहिरी खोदणें, किंवा पाण्याचे पाट चालू करणें ही गोष्ट खर्चाची आहे तथापि लोकांच्या जवळ हा खर्च करण्याचें सामर्थ्य नसतें असाही सर्वत्र प्रकार नाहीं. खरोखर या प्रांतीं शेतीला धंद्याचें स्वरूप आलेलें नाहीं. सालोसाल पीक कसें तरी काढून घ्यावें हा मुख्य हेतु बहुतजणांचा असतो. शेतीच्या धंद्यांत पैसा घालण्या इतकें सामर्थ्य शेतीवरच निर्वाह चालविणाऱ्या प्रांपचिक शेतकऱ्यास नसतें. ज्या शेतीवाल्यांस ह्मणजे शेतीच्या मालकांस धनबल आहे त्यांस शेतीचा धंदा व्याजबट्ट्याच्या धंद्यापेक्षां विशेष किफायतवार वाटत नाहीं आणि ह्मणूनच असे श्रीमान लोक शेतीच्या उद्योगाकडे आपली पुंजी खर्चित नाहींत. सारांश, शेतीचा धंदा ऱ्हास पावत चालला आहे. शेतीवर सर्व प्रांताची जीवधारणा व धनाढ्यता अवलंबून आहे तथापि त्या शेतीची स्थिति अत्यंत शोचनीय होत चालली आहे.

वऱ्हाडच्या शेतीची अगदीं निकृष्टावस्था व साऱ्याची चंचळ व भारी वाढ या दोन्ही गोष्टी एकदम प्राप्त झाल्यामुळें जमीनदारांचें लक्ष्य जमीनीच्या सुधारणेकडे लागत नाहीं व रयत आबाद न होतां दिवसें दिवस पोटाला देखील महाग होत आहे. कृत्रिम उपायांनीं पाणी पुरवून शेतीचें उत्पन्न काढण्याची सोय या प्रांतीं लवकर होईल तर शेतीच्या धंद्याला तेजी येईल आणि सरकारी सारा वाढला तरी देखील त्यांची भिती हल्लीं प्रमाणें वाटणार नाहीं. शेतीची सुधारणा करावी असा सरकारचाही मुख्य हेतु आहे आणि तो सफळ व्हावा ह्मणून सरकारांतून जमीनवाल्या प्रजेला थोड्या व्याजावर कर्ज देण्याविषयीं कायदेकानू झाले आहेत आणि प्रस्तुत त्यांची अंमलबारीही चालू आहे. परंतु सरकारची सावकारी प्रजेला व्हावी तितकी हितावह होत नाहीं कांकीं सरकारांतून कर्ज मिळण्यापूर्वीं प्रजेला मोठी यातायात पडते, नियम कडक आहेत आणि शेतकऱ्यांच्या वस्तुस्थितीला अनुरूप अशा सवलती नाहींत.

मुंबई इलाख्याकडे व पंजाबांत हे नियम अलिकडे सुधारले आहेत तेव्हां पासून तिकडे शेतीची सुधारणा होऊं लागल्याचीं चिन्हें दिसतात. या प्रांताला देखील सरकारी कर्जाची मोटी गरज आहे ती भागविण्या साठीं कर्ज मिळण्याची सुलभता होईल तर प्रजेचा मोठा फायदा होईल. कृत्रिम रितीनें पाणी पुरविण्याच्या योजना वऱ्हाडांत अवश्य जारीनें चालूं झाल्या पाहिजेत. तशा पाण्याच्या सोयी यंदा असत्या तर निदान कांहीं शेतें अगदीं नापेऱ्यांत निघालीं नसतीं आणि कित्येकांतील उभी असलेलीं पिकें लोकांच्या तोंडांतून हिरावून घेतलीं गेलीं नसतीं. यंदा तगाईचा पैसा पुष्कळांनीं घेतला आहे आणि हाच तगाईचा पैसा गोरगरीब शेतीवाल्यांमध्यें सरकारानें फैलावला तर प्रस्तुतच्या काळीं इष्ट दिशेनें शेतीच्या सुधारणेची आशा बाळगण्यास जागा होईल.

सरकारी सारा अतोनात वाढल्यामुळें शेतीची सुधारणा कुंठल्या प्रमाणें झाली आहे. पण आमच्या निर्दैवानें साऱ्या विषयींचा सरकारी ठराव बदलण्या सारखा नाहीं असा लोकांचा समज आहे आणि तो कधीं खोटा होईल अशी आह्मांसही भावी उमेद नाहीं. तेव्हां या प्राप्त कालांत तोड ह्मटली ह्मणजे सरकारी तगाईच्या पैशाची मदत घेऊन शेतीवाल्या जमीनदारांनीं शेतीच्या धंद्यांत तनुमनधनें खपावें आणि दुष्काळापासून शेती सुधारण्याचा उपदेश घेतला असें जगास कृतीनें कळवावें. या सूचनेच्या मार्गानें कांहीं लोक तरी पुढें सरसावतील अशी आह्मी आशा बाळगतों.

---

चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या कारकिर्दीला ६० वर्षें पूर्ण झालीं ह्मणून सर्व राज्यभर जयोत्सव येत्या जूनच्या २०।२१ तारखेला होणार आहेत. या उत्सवोत्सवाला " हिरादाणी आनंदोत्सव " अशी इंग्रजी संज्ञा आहे. या आनंदोल्हासाचें प्रदर्शन कसें करावें या विषयीं सरकारांत व लोकांत चर्चा चालू आहेत. अशा सुसमयाचा काल आमच्या देशाला! लाभला हें खरोखर आमच्या लोकांचें व ब्रिटीश राज्याचें भाग्य होय. असें भाग्यपर्व सुप्राप्त झालें हें खरोखर सर्व प्रजेचें व महाराणी सरकारचें पुण्य फळास आलें असें आह्मी मानतों. आनंदाचा दिवस सर्व साजरा होईलच आणि धन्यवाददर्शक जयध्वज घरोघर प्रजाजन उभारतील हें उघड आहे. प्रजाधर्माची ही गोष्ट झाली. महाराणी सरकारच्या कारकीर्दीच्या कपिलाषष्ठीचा सुयोग संस्मरणीय, कल्याणवर्धक व वैभवशाली असा ह्मणून गाजला पाहिजे. आणि ही व्यवस्था घडून येईल तर व्हिक्टोरियाचा बाहुटा सर्व पृथ्वीवर फडकत राहील. सर्व पृथ्वीवर ब्रिटिश राज्य आहे आणि ह्मणूनच सूर्य कधींच या राज्यावर मावळत नाहीं तेव्हां अशा अफाट राज्याचें प्रभुत्व चिरस्थायी करण्यासाठीं त्या राज्याचें मुख्यांगावर ह्मणजे या इंडिया देशावर उदार राजनीतीचा सूर्य उगवला पाहिजे ह्मणजे अर्थातच त्याच्या दीप्तीनें सर्व जगभर अजरामर सुकीर्ती कायमची होईल. हिंदुस्थानदेशावर अशी अभंग व मंगलदात्री उपकृती व्हिक्टोरिया सरकारच्या हातून कोणती घडावी असें लोकमत विचारण्या इतकें या देशाचें प्रालब्ध उदयास येईल तर आह्मी मार्गदर्शक स्तंभा वरील हस्तचिन्हा प्रमाणें राष्ट्रीय सभेच्या ठरावाकडे बोट आनंदानें दाखवूं. पण आमचें हें मनोराज्य निदर्शनास येईल काय अशा शंकेनें मन द्विधा व सभय होतें. ईश्वरी प्रेरणा काय होईल ती खरी!

---

# The Berar Samachar

MONDAY MAY 10 1897

---

The present famine has brought two facts into striking prominence:—the extreme poverty of the people and the nability of the Government to check ts growth. People are getting poorer and poorer and are gradually sinking into the worst depths of poverty and starvation. This is the accumulated grand total of the continual drain of the life— blood and the last resources of the masses from year to year. The British rule has been a blessing to India but in the exceptional decline of her material position the British rule has brought to this country the unforeseen evils of a *foreign* government. This is a year of a dire famine and accentuates the miseries of people that developed into large proportions from all quarters. In the hard struggle for bread, India will probably lose the race because she is incompetent to cope with the keen competition of the ruling people and with the growing disadvantages of a foreign rule extending over more than a century. There is no staying power in the people. They are utter strangers to the ordinary comforts of a good standard of life and have no competency of income to live upon. India is an agricultural country. The main industry of its people is agriculture pure, simple and stereotyped. It has come to a stand—still and knows no further progress because the agriculturists as a class are immersed in debts. The indebtedness of the peasantry is an imminent danger of the time and it knows no limit as to when it will assume a critical turn. The distress due to indebtedness is more horrible than that of the famine. The latter lasts for the year of the famine and a few years to come. While the former distress is gone very deep as it is the outcome of a long period of adverse circumstances. It is this evil which it is necessary to avert. To make a provision against its growth is to introduce a salutary check against the disasters of a recurring scarcity and famine.

The financial position of the Go—vernment of India is very deplorable. Its chief strength lies not in its capital but in its large borrowing powers. The so-called credit of India is a mystefying and unsafe element in calculation and we do not know how the Government will pull on unless and until they curtail the expenditure to such an extent as will make both the ends meet. The drain of admini—strative expenses dries up all the sap and juice of the nation. This must be done away with before we could think of a better prospect in this direction. The burden of taxation is daily in—creasing to meet new liabilities and the people are crushed under its heavy weight. This heavy taxation has immensely crippled the best profits of agriculture and people are left to work without a hope of obtaining a fair livelihood when they have to face the large demands of the Sirkar and those of their Sawakars. Both of them have become Indian Shylocks, and it is a grave problem to get out of their clutches. The Government is a *benevolent* Shylock and we can hope therefore that some real good will come out if the Government adopt the best policy advocated by the National Congress.

---

On Wednesday, last, the Provincial Working Standing Committee of 13th National Congress has communicated to other Standing Congress-Committees that the proposal of holding a National Congress in London in the next June or July have their full approval. It is a pleasure to note that the Diamond Jubilee of the Victorian reign will mark a new era in the programme of the National Congress. It is well and good that the funds to be subscribed to for the 13th sessions will have to be spent in England. Let it not be misunderstood that our responsibility of collecting sufficient funds ends here. We are to play our part in another country altogether and it is therefore in—cumbent upon us that it should be a complete success. Success in this direction means no child's play. It requires an ample supply of men and money. It is the more necessary for us that our collections should be large and timely enough. We hope that all Congresswallas will do their best to collect funds.

---

The slavery of the Indians in South Africa is the stirring topic of the day. In this connection, the Bombay Presidency Accociation has received the following disappointing reply:—

" I am at the same time to inform you that the Secretary of State is unable to accept the view stated on

page 4 that the State of the Indian immigrants is one of "perpetual indenture" which "comes perilously near to slavery." The conditions were settled between the Government of India and two delegates who were deputed from Natal for the purpose. The protection and fair treatment of the emigrants are assured and there is no reason to suppose that any of the indentured Indians are not treated in accordance with the stipulations upon which they have been engaged. It is true that the revised contracts require all labourers to return to India on the termination of their indenture, but they are under no obligation to accept service on that condition; they are not allowed to re-engage for a longer period than two years and whenever their engagement or re-engagement comes to an end they are provided with a free passage back to their country."

The above reply will sufficiently explain the unfair, selfish and despotic treatment by the colonists of Natal of the British Indian subjects of Her Majesty. The Times of India has also declaimed the policy of the Britishers in Natal. It reflects disgrace on the good name of Her Majesty the Queen Empress and the conduct of the Natal is a flagrant insult to Great Britain. We hope that a new beginning will be made in recognition of the rights and privileges of the Indians as British subjects.

---

The Hon'ble Rai Bahadur P Anandacharlu has refuted the modern idea of the material prosperity of India in a very sarcastic manner. The country is on the brink of poverty and extinction. He observes:—

"It is in respect of the enquiry 'where is the history which records the India of gold?' No such written history exists; but there are facts to prove it. If great parts of the country were jungle, the rest of the country was, suppose, peopled, and these, not fenced round by artificial limitations must have lived in an undoubted plenty. Next, there is the phrase—'the Indian pagoda tree' which was invented and put in circulation by Englishmen themselves. Was that a baseless invention? Again, my Lord, there is the name—'The Indian Nabob,' invariably applied to the retired Civilian of former days a name given to him not so much for his airs of Bahadurism as for the great wealth he carried with him from India. Did he gather that wealth in the jungles and from famished inhabitants of deserts? Then again, did the English and other European nations vie with one another and struggle with one another, to acquire possession of a country, barren of all money and wealth? An inference seriously drawn from these and other data cannot be summarily dismissed, as has been attempted."

---

## वऱ्हाड

हवामान—मधून मधून वारा तुफानाचा सूटतो. उष्णतेचें मान अती प्रखर आहे. हवेचा उपद्रव तुरळक तुरळक फैलावत आहे. उन्हामुळें दुष्काळाचीं दुःखें बहुगुणित झालीं आहेत. पाण्याची हाकाटी पुष्कळ ठिकाणीं उडाली आहे. जमिनी पुढील पेरणी साठीं अगदीं तयार आहेत.

आकोला जिल्हा व मलकापूर तालुका यां साठीं देशी दारू सरकारी दारूखान्यांत यंदा तयार होऊं लागल्या पासून असा नियम ठरला आहे कीं एका मनुष्याला एका दिवसांत एका ग्यालना पेक्षां अधीक दारू विकूं नये. आकोल्याच्या डिपुटी कमिशनराच्या परवानगी शिवाय वरील हद्दींतल्या हद्दींतच एका ग्यालना पेक्षां अधीक दारू नेऊं किंवा आणूं देणार नाहींत आणि तसेंच वरील हद्दींच्या बहेर ½ पिंट दारू पेक्षां अधीक दारू नेतां यणार नाहीं.

गेल्या जानेवारी ३० तारखे पासून एप्रिल २४ वे तारखे पर्यंत वऱ्हाडांत बाह्य प्रांतांतून रेल्वे मार्गानें ७६४०० मण धान्य आलें ही शोचनीय स्थिती होय! पूर्वीचें वैभव इतिहासविषय बनलें!

दुष्काळाच्या कामावर गेल्या महिन्याचे २४ वे तारखे पर्यंत या प्रांतीं ३२१०० मजूर होते. ही संख्या वऱ्हाडाच्या धनधान्यासमृद्धीला लाजविणारी आहे!

उमरावती जिल्हा बोर्डाचे माजी ओव्हरसिअर मि. मरो, सब ओव्हरसिअर मि. रामप्रसाद व कंत्राटदार मि. अबदूलअल्ली यांजवर बोर्डाच्या कामांत लबाडी केल्याच्या संशयावर फौजदारी खटले चालू आहेत

रा० रा० मार्तंड पंढरीनाथ पोलीस इनस्पेक्टर परतवाडा यांस देवाज्ञा झाली हें कळविण्यात अत्यंत दुःख वाटतें.

वाशिमचा एक बातमीदार लिहितो कीं त्या जिल्ह्यांत दुष्काळ विशेष आहे तथापि मि० रुस्तुमजी फर्दूनजी डिपुटी कमिशनर यांच्या अव्याहत श्रमामुळें दुष्काळाचीं कामें व कंगालखाने फार सुयंत्र चालले आहेत.

रा० रा० गिरराव रामचंद्र तहशीलदार चांदूर यांस पेनशन मिळाल्यामुळें त्यांच्या जागीं सध्यां रा० रा० पांडुरंग वासुदेव भगत डेपुटी क्लार्क आफ कोर्ट यांस चांदुरास पाठविलें आहे.

सिव्हिल आणि सेशन जज्ज मि० इलियट साहेब हे सहा महिन्यांच्या रजेवर जाणार आहेत.

एरंडा येथील तलावाच्या कामावरील मजूरांनीं संप केला होता ह्मणून तिकडील व्यवस्था लावण्या साठीं मि० अजिजुद्दीन साहेब असि० कमिशनर हे गेले होते आणि त्यांनीं आंपल्या दराऱ्यानें व तात्त्डतोब बंदोबस्तानें सर्वत्र शांतता केली. आणि काल रोजीं खुद डिपुटी कमिशनर मि० प्रीडो हेही तेथें गेले.

अंदुरा येथील पोलीस ठाण्यांत जमादार रा. रा. रावजी हे निजले असतांना त्यांच्या डोक्यावर अकस्मात् कुऱ्हाडीचा घाव घातल्यामुळें ते मरण पावले. हा प्रकार फार शोचनीय होय.

महान येथें एक नवीन कंगालखाना सुरूं करण्या विषयीं हुकूम झाला आहे.

आकोट तालुक्यांतील पुंड व देवार्डे येथें तलावाच्या दुरुस्तीचीं लहान लहान कामें नवीन काढण्यांत येत आहेत.

मि. आर. डी. हेअर, डिपुटी कमिशनर वर्ग १ यांची फर्लो रजा येत्या आक्टोबर अखेर पर्यंत संपणार होती पण ती त्यांनीं आणखी सहा महिने वाढवून घेतली आहे.

तेल्हारा—अडसूळ रस्त्याचें काम पुरें झाल्या मुळें तिकडील लोक रिकामे झाले आहेत. यांची लवकर दुसरीकडे सोय झाली पाहिजे.

मेहकर गांव तेथील कांहीं गृहस्थांच्या सार्वजनिक खटपटीमुळें लोकादरास विशेष पात्र होतो. गेल्या सोमवारीं त्या गांवीं शिवजयन्तीचा उत्सव मोठा नामी झाला. सर्व गांवभर चळवळ होती आणि सभेच्या स्थळीं जमलेल्या लोकांच्या आनंदमुद्रा त्या शिवराया विषयीं भक्ती व निष्ठा दर्शवीत होत्या. सभास्थळ अत्यंत रमणीय मंगलधाम बनलें होतें. रा० रा० शिवरामसा, नागो बळवंत व लक्ष्मणसा यांचीं समयोचित आवेशाचीं भाषणें झालीं, कांहीं नवीन रचलेल्या कविता ह्मणण्यांत आल्या, तरुण मंडळीचा कसरतीचा खेळ अप्रतिम झाला, वे० रा० रा० जानकीराम भटजी यांचें पुराण झालें आणि अध्यक्षांनीं सभेची समाप्ती केली. अध्यक्षांचे कांहीं उद्गार व्यक्तिविषयक व गुणग्रहणा विषयीं अप्रशस्त होते असें एक बातमीदार कळवितो.

यवतमाळचे 'हितेच्छु'— आपले कवीवर्य 'प्रमोदसिंधूंत झळकतात तेव्हां आपल्या टीकेनें धांव तिकडेच घ्यावी हें बरें.

---

बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ९१ रुपये |
| जवारी | ९० रु० |
| गहूं ( कांठे ) | १३० रु० |
| ,, ( बनशी ) | १४० रु० |
| चणे | ११० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ७॥ मण |
| सोनें | २६॥। तोळ |
| चांदी | ८० |

---

नोटीस

नोटीस बनाम नागोजी वलद भिकाजी चांदुरे राहणार राहडगांव तालुके उमरावती जिल्हा उमरावती यांसः—

खाली सही करणार कमळजी उर्फ देऊ मर्द मय्येत कृष्णाजी वलद अंबुजी गनोरकर राहणार राहाडगांव याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आमचे तर्फे मुखत्यार पत्र घेतलें आहे. ह्या मुखत्यारपत्रा वरून आज तारखे पर्यंत देण्या घेण्याचें काम व शेतीची सर्व वहिवाट तुह्मी स्वतां केली असून मजला आज तारखे पर्यंत हिशोब वगैरे कांहीं दाखविला नाहीं. करितां या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास दिलेलें मुखत्यारपत्र आज तारखें पासून रद्द केले आहे. या पुढें सदरहू मुखत्यार पत्राचे आधारानें तुह्मी कोणतेही काम केल्यास तें मला मान्य नाहीं. तसेंच या नोटीसीचे द्वारे तुह्मास आणखी असे ही कळविण्यांत येते कीं तारीख २० माहे मे सन १८९७ चे आंत तुह्मी आमचे सर्व कागदपत्र दस्ताऐवज गाहाणखतें पुर्जे रोखे पट्टे कबुलायती किंवा इतर कोणतेही दस्तैवज आणि वहिखाते व हिशबाच्या वह्या आहेत त्या व शिलक रुपये दागदागीने शेतीचें धान्य वगैरे आमची जी जी इस्टेट किंवा माल वगैरे जे तुमच्या जवळ आहेत ते सर्व आमचे वकील मि. गोविंद नारायण काणे वकील राहणार उमरावती यांचे स्वाधीन करावें आणि तुमच्या पाशी असलेले सदरहू प्रकारचे सर्व कागदपत्र आणि माझ्या मालकीची सर्व रोकड आणि स्थावर जंगम जिनगी वगैरे सर्व सदरहू मिस्तर गोविंद नारायण काणे यांचे स्वाधीन करावे तसें न केल्यास तुमचेवर दिवाणी आणि फौजदारी काम जसजसें आह्मास योग्य वाटेल त्या प्रमाणें चालविलें जाईल. कळावें तारीख ६ माहे मे सन १८९७ इ.

( सही )

कमळजी उर्फ देऊ मर्द मेत कृष्णाजी वलद आंबुजी हिचे हातची बांगडी निशानी खुद केला असे.

दस्तुर— रंगराव यशवंत.

---

नोटीस

रा. रा. सखाराम वलद तुकाराम वठी राहणार नांदुरें लक्ष्मणें तालुके मलकापूर यांजवर नोटीस देणार मानकी मर्द सखाराम वठीन राहणार बाळापूर जिल्हा अकोलें मी नोटिशीनें कळवितें कीं, मी तुमची लग्नाची बायको आहे. लग्न झाल्यापासून तों शहाणी होईपर्यंत सासरी माहेरी जाणें येणें आजपर्यंत होतें. हल्लीं ह्या आता मी शहाणी होण्यास आजमासें दोन वर्षे झालीं त्यांत संसारामध्यें नवऱ्यापासून बायकोस व बायकोपासून नवऱ्यास जें कांहीं सुख मिळावयाचें तें मजला ह्या दोन वर्षांत तुमच्यापासून कांहीं मिळालें नाहीं व शेवटीं तुमची व माझी चार पंचा समक्ष पंचाईत दोन वेळां झाली त्यांत तुह्मी पंचाचे समक्ष माझ्याशीं संसार करण्या बद्दल खातरी कांहींच एक दिली नाहीं उलटें पंचासमक्ष असें सांगितलें कीं, मी नांदवीत नाहीं. व फारकतीही देत नाहीं. मजला १०० रुपये द्यावे मी फारकती देतों. असें पंचासमक्ष मागूं लागला ही पहिली पंचाईत. व त्यानंतर पुनः माझा बाप चार पंच जातभाई व पाटील पांडे जमवून त्यांचे समक्ष तुजला विचारलें तर फारकती दिली नाहीं याज करितां माझा संसार व्यर्थ जाऊं नये ह्मणून तुजला ह्या नोटीसीनें असें कळविते कीं ही नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत तूं माझ्याशीं संसार करण्याबद्दल माझ्या जीवाभावास कांहीं धक्का बसू नये अशाबद्दल चार जातभाईची खात्री करून द्यावी व साहा महिन्याचे पोटगीचे रु० ३० देऊन घेऊन जावें. मी नांदण्यास तयार आहे. असें केलें नाहीं तर चार जातभाई पंचाच्या सल्यानें हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करीन कळावें.

सही

सहीची नि॥ मानकी मर्द सखाराम वठीन राहणार बाळापूर इच्या हातची बांगडी असे

---

## वर्तमानसार.

पारिस शहरांत आगीनें प्रलय करून सोडला आहे. एक बाजार जळून फस्त झाला. विजेच्या दिव्याच्या तारा एकत्र केल्या मुळें अग्नी पेटला असें कळतें. मोठमोठे उमराव देखील कांहीं जळून मेले!

हिंदुस्थानातले पुढारी असे बरेच लोक इतक्यांत विलायतेस एकत्र जमण्याचे असल्यामुळें यंदाची कानग्रेस वऱ्हाडांत न करतां विलायतेस करण्याचें ठरवावें हे चांपेनचें ह्मणणें गैर नाहीं. तुर्स्तीं तोंड वेंगाडलीं ह्मणजे राजकीय हक्क मिळतील अशा समजुतीनेंच जर आमचें वर्तन चालू आहे तर तोंड वेंगाडण्याच्या आमच्या कृतीचें एक प्रदर्शन विलायतच्या लोकांस एकदां दाखवावें यांत कांहीं गैर माहीं. या रडण्याच्या प्रदर्शनाच्या निमित्तानें हिंदुस्थानची बरीचशी रक्कम गोऱ्या आगबोटवाल्यास मिळाली असें पाहून तरी विलायतच्या लोकांस आमची कांहीं दया आली तर पाहावी.

निजामाच्या राज्यांत खाणी लावण्याची एक गोरी कंपनी निघाली आहे. तिला निझामाच्या राज्यांतील कांहीं जमीन पाहिजे आहे. निझाम ती जमीन लिलांव करून देणार आहेत. लिलाव न करतां कांहीं मुदतीनें द्यावी असें कंपनीचें ह्मणणें आहे. कंपनी गोरी आहे तेव्हां कसें होतें हें पाहाणें आहे.

ज्युबिलीच्या वेळीं राणीसाहेबांस मानपत्रें देण्याच्या बाबतींत महू व नागपूर येथील लोकांच्या सभा झाल्या. मुंबईसही एक मानपत्र देण्याचें ठरून मसुदाही कायम झाला.

उज्जनीस यात्रेकरूं साधु आल्या मुळें अधिकाऱ्यांनीं त्यांस घालवून देण्याचा यत्न केला व त्यांत कित्येक अधिकारी यास दगड व सोटे यांचा मार मिळाला. दोघा गोसाव्यांस तेथून निघून जाण्याचा पोलीस अधिकाऱ्यांनें हुकूम केला. हा आमचा चिमटा ठेवाल तेथें आह्मी जाऊं असें गोसावी ह्मणाले. अधिकाऱ्यांनें चिमटा उचलण्याचा यत्न केला पण पुष्कळ माणसें लाऊनही तो उचलला नाहींच. नंतर रात्रीं गोसावी नाहींसे झाले असें ही सांगतात.

मुंबईस आणखी एक जर्मन डाक्टर सांथीच्या रोग्यास काय उपचार करतात हें पाहून अनुभव घेण्या करितां आला आहे. आतां मुंबईस पांच जर्मन डाक्टर झाले.

बंगालच्या मेडिकल कालेजांत स्त्रिया हासपिटल असिस्टंटच्या परिक्षेंत पास व्हाव्या अशा बद्दल तजवीज चालू आहे.

कलकत्याचे प्रसिद्ध गृहस्थ सुरेंद्रनाथ बानर्जी हे फिरून कायदे कौंसलर होण्यास उमेदवार आहेत.

९०,००० हजार राडीफ जातीचे शिपाई भरतीसाठीं टर्कीनें गोळा केले आहेत.

सरांटा येथें ग्रीक आले असून त्यांनीं टर्की फौजेचा दाणागोटा जाळून टाकला.

ग्रीक लोक कांडिया बेटास गराडा घालीत आहेत.

टर्नव्हास ठिकाण टर्कींनीं सर केलें.

आर्टा आणि जेनीना यांच्या दरम्यान टर्क व ग्रीक यांचें ४ तास युद्ध झालें.

टर्क लोकांनीं लारिसा ग्रीक लोकांपासून घेतलें. या ठिकाणीं ग्रीकांचा बराच दारूगोळा सांपडला.

सहा दिवस सारखी लढाई होऊन सातवे दिवशीं ह्मणजे शुक्रवारीं लढाई संपली व त्यांत ग्रीक लोकांचा पराभव झाला. टर्क लोकांची संख्या फार होती. ही शुक्रवारची लढाई मटी येथें झाली. टर्क लोकांनीं ग्रीक लोकांचा चांगला पाठलाग करून त्यांची बरीच कत्तल उडविली तारा पाठविणाऱ्या रूटरचा बातमीदारही थोडक्यांत बचावला.

ग्रीक सेनापती ड्यूक ऑफ स्पार्टा यास लष्करासह परत बोलाविलें आहे मटी येथें जो पराभव झाला त्यावेळीं ग्रीक फौजेनें अयोग्य पूर्वकाळीं पळ काढला असल्यामुळें ग्रीक देशांतील लोक खवळून गेले आहेत.

ग्रीक देशाच्या राजकुलाची फार भयंकर स्थिती झाली आहे व फार थोड्या आवकाशांत पळ काढतां येईल अशी त्यांनीं तयारी करून ठेविली आहे.

अलबेनियनच्या ४ चार पलटणी बेदील होऊन ग्रीक लोकांस सामील झाल्या.

बलगेरियन लोक ग्रीसचे साह्यकारी झाले आहेत.

फ्रान्सच्या प्रेसिडेंटानें टर्कीच्या वकीलाची गांठ घेतली व कांहीं खलबत केलें. टर्की फौज अजून पुढें चाल करील तर ग्रीसचें रक्षण करण्यास फ्रान्स पुढें येईल असें फ्रान्सनें टर्किश वकिलास सांगितलें.

लहान सहान चकमका चालू आहेत व लवकरच मोठी लढाई होण्याचा रंग आहे. टा. अ.

दयेचा ठराव— प्लेगच्या बंदोबस्ताचे कामावर असलेल्या पोलिस लोकांपैकीं जे असामी त्या आजारानें मरण पावतील, त्यांचे कुटुंबांस पेन्शन देण्याबद्दल सरकारानें देयेचा ठराव केल्याचें समजतें.

मलबार कडील कित्येक प्रांतांत कॉलरा सुरू आहे.

अमेरिकेंत एकानें पतंगाच्या योगानें शेंकडों सैन्याची दाणादाण उडवण्याचा शोध केला आहे.

रूसच्या राजानें आपली रेलवे हिंदीमहासागरा पर्यंत चालू करण्याचा बेत केला आहे.

प्रायःश्चित्त—लाहोर येथील एका शुद्ध सभेनें तिकडील प्रांतांत ख्रिश्चन आणि मुसलमान झालेल्या ५३६ लोकांस प्रायश्चित्त देऊन पुनः हिंदुधर्मांत घेतलें आहे.

मडमेस शिक्षा—पोंडिचरी येथील एका मिलसस विलसन नांवाच्या एका मडमेनें मिस फ्रांकलिन नांवाच्या एका मुलीस ठार मारण्याचा प्रयत्न केला होता. त्याबद्दल त्या मडमेस १० वर्षांच्या कैदेची शिक्षा दिली गेली.

कोणी भामट्यानें जोशी या नांवानें अजन्याचे मामलेदार यांजकडून २४०० रुपये तोरेनें उपटले. म० मि०

कोणच्या शेतकऱ्याच्या जमिनींतील पीक चार आण्यांपेक्षां कमती आलें याची चौकशी चालली आहे. अखेर काय होतें पहा.

लंडन शहरांत फक्त रस्त्यावर रेती टाकण्यास दरसाल १० हजार पौंड खर्च लागतो.

लहान मुलांस फडकें चोखायाला दिलें ह्मणजे दांत येण्याच्या वेदना कमी होतात, व झोंप चांगली लागते.

गेल्या वर्षांत इंग्लंडास नुसत्या दारूवरील जकातीचें उत्पन्न पावणेतीन कोट पौंड मिळालें. मद्दीचा जोर विलक्षण आहे.

दुष्काळामुळें पोष्टाचे शिपायांपासून सहामाही आठ आण्यांचा फंड घेऊं नये असा ठराव झाला आहे.

अहमदनगर जिल्ह्यांत दुष्काळ कामावर ६३४३९ लोक काम करीत आहेत.

महत्वाच्या फौजदारी खटल्यांत सवड होईल तर माजिस्ट्रेटांनीं खुद्द तंट्याची जागा पाहण्यास जावें असा ना हायकोर्टानें ठराव करून तो सरकारी ग्याझेटांत प्रसिद्ध केला आहे. आ. व.

सांथीवरील भविष्य— धारवाड जिल्ह्यांतील हुबळी नामक गांवचे ज्योतिषी मु० कृष्णशास्त्री यांनीं असें भविष्य वर्तावलें आहे कीं, ही साथ तारीख १२ मे पासून कमी कमी होत जाईल, ती १३ जूनचे सुमारास अगदीं नाहींशी होईल. बिचाऱ्या जोशी बुवांचें भविष्य खरें ठरो. दी. बं.

पंजाब इलाख्यांत सुमारें दोन लक्ष गुरें चारा न मिळाल्यामुळें तरफडून मेलीं असें कर्नल मॉटगोमरी यांनीं बाहेर आणलें आहे

हांगकांग टेलिग्राफ नांवाच्या पत्रांत अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे कीं फोरमोसा बेटांत एक प्रकारच्या भयंकर रोगाची सांथ आली आहे व त्या योगानें रोज शेंकडेंशें मनुष्यें मरत आहेत. तेथील दाक्तरांचें ह्मणणें असें आहे कीं, हा रोग साधारण नसून ज्यास "ब्लयाक प्लेग" ह्मणतात, तो भयंकर विषारी प्लेग आहे. स. वि.

कोलरक्यांप (मद्रास) च्या जवळ मराकुपन ह्मणून एक गांव आहे. तेथें पांच फणांचा एक नाग आढळला. प्रथम तो मि. वून कोलरक्यांपचे सुपिन्टेंडेन्ट ह्यांच्या दृष्टीस पडला. मि. बुलन ह्यांच्या परवानगीनें गांवकऱ्यांनीं त्या नागावर एक छप्पर उभें केलें आहे. त्यांत तो असतो; याच्या दर्शनास बहुतकरून शुक्रवारीं मोठी यात्रा भरते. त्याचें दर्शन ज्यास होतें त्यांना लाभ होतो, अशी लोकांची समज झालेली आहे. ह्या नागाचा सामान्य देखावा इतर नागाप्रमाणेंच आहे. पण डोक्यापासून मानेपर्यंतचा भाग सामान्य जागेपेक्षां अगदींच वेगळा आहे तो भाग सोन्यासारखा सदांसर्वदां चमकत आहे. त्याच्या मानेवर दोन काळे पट्टे आहेत. तो दिवसां कधींही बाहेर पडत नाहीं. त्यांच्यावर पक्कें विटबंदी देऊळ बांधण्याचा गांवकऱ्यांचा बेत आहे.

म्याट्रिक्युलेशन परीक्षा पास होऊन जे विद्यार्थी ॲग्रिकलचरल कॉलेजामध्यें तीन वर्षें घालवीत असत, त्यांना आजपर्यंत तेथील परीक्षा पास झाल्यावर रेव्हिन्यू खात्यांतील इतर ग्रॅज्युएटाप्रमाणे हक्क मिळतील असा सरकारानें नुकताच एक संतोषकारक ठराव पास केला आहे.

बंगाली भविष्य—तारिणी प्रसाद नांवाच्या बंगाल्यांतील प्रसिद्ध ज्योतिषांनीं एप्रिल १८९८ अखेर पर्यंतचें अर्धे संवत्सरफळ वर्तविलें आहे कीं, इंग्लंड फार काळजींत राहील. प्रजेला सुखोपभोग होणार नाहीं. इंग्लंडचा व इतर युरोपियन राष्ट्रांचा स्नेहभाव कमी होईल. टर्की व ग्रीक यांच्या युद्धांत रक्ताचे पूर वाहतील; कलकत्याच्या टागोर लावण्यांत एक महान योगी निपजेल; पूर्व दिशेस एक शेंडे नक्षत्र उगवेल; संभावित चोरांची समृद्धि होईल. जुबिलीचा समारंभ झाल्यावर महाराणी साहेबांस ऐहिक वैभवाबद्दल उपरति होईल सुधारक मंडळींत भांडण सुरू होऊन कोर्टाचें काम वाढेल—लॉर्डएल्गिन साहेब प्लेगच्या संबधानें अप्रिय होतील. हिंदुस्थानाला ह्या वर्षी परचक्राची भीति नाहीं; पण देशांतील कायदेच पुरेवाट करतील; राजा व प्रजा कर्जबाजारी होईल, वर्षअखेरीस दुष्काळाचें संकट ओढवेल. यंदा पर्जन्य, वादळ आणि महापूर यांणीं लोक पीडित होतील. तथापि सुपीक होईल. प्लेग सर्वत्र पसरेल.

हिंदुस्थानचे राजे— आपण केव्हां तरी होणारे, असें रशियन सेनापति कोमेराफ हे ह्मणतात. ईश्वरेच्छा असेल तसें होईल. न्या. सिं.

यंदाची वकिलीची मुनसफीची परीक्षा प्लेगकारितां तहकुब ठेविली होती. ती येत्या जूनच्या १८ तारखेपासून मुंबईस घेतली जाईल असें ठरविण्यांत आलें आहे.

अमदाबादेस एका गिरणीला आग लागून सुमारें ९००००० लक्ष रुपयांचें नुकसान झालें. ही गिरणी विमा उतरलेली होती.

ब्रह्मदेश आमच्याप्रमाणें चौथा इलाखाच होणार व तेथील पहिले गव्हर्नर हल्लींचे तेथील कमिशनर सर फ्रेड्रिक विलियम रिचर्ड फ्रायर के. सी. एस. आय. हेच होतील. व त्यांचे हाताखालीं येथल्याप्रमाणेंच सर्व आठ कौन्सलदार वगैरे होणार. कायदेकानू येथलेच चालू होणार.

सांथीच्या तापावर औषध—कराची येथील एका फकीरानें या सांथीच्या तापावर औषध प्रसिद्ध केलें आहे, तें असें कीं, एक छटाक कांदे, एक छटाक मीठ, आणि अर्धा छटाक मोहऱ्या, या तीन जिनसा एकत्र वाटून त्यांचें पोटीस तयार करून त्या तापांत आलेल्या फोडावर बांधावें तें बांधल्या बरोबर फोड नरम पडतो व लागलीच ताप आपल्याआपण नाहींसा होऊन रोगी दुरुस्त होतो

सिलोन व हिंदुस्थान येथील राज्यव्यवस्था एक करण्याबद्दल इंग्लंडामध्ये कांहीं वाटाघाट चालली आहे.

कोंबडीचीं वगैरे पिलें कृतीनें उबविण्याचें जसें यंत्र निघालेलें आहे, तसें अशक्त मुलांस सशक्त करण्याचें यंत्र प्रो. टार्नर ह्यानीं काढिलें आहे. त्यांत मुलें सात दिवसपर्यंत, जेवणाखाणापुरतें बाहेर काढून, एकसारखें ठेवावें लागतें. ह्या यंत्राच्या योगानें पारिसांतील लहान मुलांचा मृत्युसंख्या निमेशा आली आहे.

इसलामपूर—येथील नाजूक कोम अचा सध्यदखान इनें आपलें पोर १॥ महिन्याचें निवडुंगाचे फड्यांत टाकून दिलें होतें पण तें सांपडून जिवंत आहे. त्याचे सर्वांगास कांटे बोचलेले होते. सदर्हू औरतेस हल्लीं पकडलें आहे व मूल टाकण्याचें कारण ती औरत असें सांगते कीं, आपला नवरा नुकाच मरण पावला आहे. यामुळें पोटास मिळेना, काम धंदा करावा तर दुसरीं २ मुलें संभाळून हें तान्हें पोर आपल्याच्यानें संभाळण्याचें होईना, ह्मणून जिवास त्रासून पोर फडांत फेंकून दिलें. क०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ०८
साल अखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास.............................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8
Single copy ................ ......... 4

Advertisement.
Below 10 lines ... 2 1
Per line over 10 ... 4
Repetition Per line ... 3

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI — AKOLA MONDAY 17 MAY 1897 — NO 19

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख १७ माहे मे सन १८९७ इ० — अंक १९

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

### नोटीस

रा. रा. येसु वल्लद माहिपती माळी राहणार मौंजे पार्डी प्रगणें पुसद तालुके पुसद जिल्हा वाशीम यांस खालीं सही करणार संभाजी वल्लद मोहनाजी जात जिरेमाळी रहाणार मौंजे पार्डी प्रगणें पुसद तालुके व जिल्हे मजकूर याजकडून नोटिसीचें उत्तर देण्यांत येतें कीं, तुह्मी आह्मास तारीख १४ माहे एप्रील सन १८९७ इ० ची नोटीस केली ती पावली त्यांत लिहिलेला सर्व मजकूर दंतकथेचा आहे. आपण असें लिहितां कीं गहाणखताचे रकमेंतून मुक्त झालों, तर असें होत नाहीं आणि लिहिलें कीं १२२५ रुपये ही वसूल दिला हेही गोष्ट खोटी आहे. आपण या दोन वर्षांत हिशेबास बोलाविलें असतांही आले नाहीं व पुन्हां आपणच आह्मावर नोटीस केली, परंतु असो. आपले नोटिशीचे तारखेचे आंत स्वतः जातीनें पांच पंचवीस मंडळी मिळवून आपणास दहा पंधरा वेळां बोलावणें पाठविलें कीं हिशेब करण्यांस यावें ह्मणून परंतु आपण आले नाहीं. व पुन्हा मी स्वतः जातीनें बोलविण्यास गेलों असतांही हिशेबास आला नाहीं. व पंचाचे ही जुमानीले नाहींतर सदरहु नोटीसीची हकीकत खोटी आहे. असें पंचास वाटलें परंतु तेही असो. आतां ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत खाते बाकी आपला हिशेब करून निकाल करून द्यावी. असें न केल्यास दिलेल्या मालाचा वसूल देऊन बाकी रुपये राहतील त्यास दरमाहा दर शेंकडा रुपये २ प्रमाणें व्याज लाऊन दिवाणींत दावा करून खर्चासुद्धां रक्कम तुमचे जवळून घेतली जाईल कळावें तारीख ७।५।९७ इ०

( सही )
सभाजी वा मोहेनाजी जिरे माळा
राहणार पारडी निशाणी रेघ
दस्तुर लक्ष्मण संभाजी जिरे माळी
दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

रा. सुकदेव चुनीलालजी दुकान तानजापेट आकोले वासी खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे कडेस तानजापेठेतील दुकानचे चाळे पैकीं दुकानें दोन तुमचे कडेस किरायाने आहेत त्याचा ठराव रुपयें २२५ व थोडा अल्यास रीति प्रमाणें द्यावे. त्यांत आगाऊ रुपये १२५ घेऊन आखेर सालस रुपये १०० द्यावे असे संमत १९५२ पावेतो चालत आले. सदरहु सालांत तुमचे कडेस आखेर आश्वीन मासी घेणें निघाले रुपये ६८।-॥। व चालू सालचे आगाऊ घेणे रुपये १२५ एकूण रुपये १९३।-॥। पैकीं तुमचे कडून वसूल आले रुपये ७५ बाकी घेणे रुपये ११८।-॥। बद्दल दररोज माझा मनुष्य तुमचे येथें रुपये मागण्यास येतो व आपण ह्मणतां कीं मुनीम आल्यास देऊ. रोकड्या आल्यास देऊ, असे चाळवितां परंतु रुपये देऊन निकाल करीत नाहीं. या सालास तुह्मी फार त्रास दिला करितां नोटीस देणे भाग आले ही नोटीस पावल्य पासून दोन दिवसाचे आंत वर लिहिलेले रुपये या नोटीसीचे खर्चासह देऊन पावती द्यावी असे न केल्यास सदरहू रुपयास व्याज दर शेकडा १ रुपया प्रमाणें लाऊन खर्चासह रुपये घेण्याची तजवीज केली जाईल हे आपणास कळावे तारीख ११ माहे ५ सन १८९७ इ.

( सही )
जोरावरमल गंगाधर या नावची दुकान
मालक ज्यानकीराम गंगाधर
आ. पा. करणार ल. जै. तर्फे मु.
जैराम बळवंत दुकान अकोले द. खु.

---

## देशमुख सभा

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस.
रामराम विनंती विशेष.

पुढें दिलेल्या गोष्टीची अंमलबावणी आज होईल उद्या होईल या आशेवर आजपर्यंत वाट पाहिली परंतु पुढारी ह्मणविणारी मंडळी अद्याप झोंपेंतच आहे असें आतां वाटल्यावरून त्यांना जागे करण्याच्या हेतूनें आपल्या भेटीला आलों आहे.

या वर्षाची देशमुख सभा गेल्या जानेवारी महिन्याचे १० वे तारखेस अकोला येथें लायब्ररींत भरली होती. सभेला वऱ्हाडांतील पुष्कळ देशमुख आल्यामुळें त्या दिवशीं शहराला एक प्रकारची विशेष शोभा आली होती.

ज्यांनीं अकोला शहर पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें व जे फार लांब लांबचे ह्मणजे ५० पासून १५० मैल पर्यंतचे अंतरावरून आले होते अशा लोकांचे थवेचे थवे, भर दोन प्रहरचा अंमल उतरल्यावर दुपारचे एक वाजण्याचे सुमारास, आगगाडींतून उतरल्या बरोबर सभेतर्फे कोणी माहितगार मनुष्य स्टेशनवर हजर नसल्यामुळें, रस्तोरस्तीं प्रथम सभेचें ठिकाण शोधीत फिरत होते. कित्येकांस सभेचें ठिकाण सांपडल्यावर तेथें उतरण्याची सोय नसल्यामुळें ती सोय करण्यासाठीं ते फिरत होते; व त्यापैकीं कोणी नदीचे पुलाचे छायेंत, कोणी झाडाखालीं व कोणी सराईंत असे ठिकठिकाणीं छाया आणि पाणी यांच्या आश्रयानें माध्यान्हाची वेळ चुकल्यामुळें, तहान भूकेनें व्याकूळ होऊन फुटाणे व इतर जें कांहीं मिळेल तें फळफळावळ वगैरे खाऊन व नदींतील दुर्गंधयुक्त पाणी पिऊन आपली कासाविशी शांत करण्याचा प्रयत्न करीत होते; आणि कित्येकांस मुळींच कोठें थारा न मिळाल्यामुळें ते नदीच्या विस्तीर्ण तटाकीं भर उन्हांत जगरीं पेटवून हात भाजीत असतांना दृष्टीस पडत होते. अशा प्रकारें त्या दिवशीं शहराला व त्यांतही विशेषेंकरून शहर आणि पेंठ यांच्या मधल्या खुल्या मैदानाला कांहीं निराळीच शोभा आली होती.

सभेचे कामाला सुमारें ४ वाजतां आरंभ झाला व सायंकाळीं काम आटोपलें. सभेंत गेल्या वर्षाचा वार्षिक रिपोर्ट वाचला जाण्या पलीकडे कांहीं विशेष काम झालें असें ह्मणतां येत नाहीं. या रिपोर्टांपैकीं पुढारी २।३ ( पुढें पुढें करणोरे ) मंडळीचे आत्मस्तुतीचा भाग वगळून टाकला ह्मणजे बाकीचे बहुतेक रिपोर्टांत, सभेनें केलेले ८-९ ठरावावर जिल्हा निहाय मेंबराकडून कांहींच माहिती आली नाहीं असें सांगून सेक्रेटरी साहेब मोकळे झाले असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. गुदस्त सालीं प्रत्येक जिल्ह्यांत व तालुक्यास मेंबर लोकांच्या नेमणुका झाल्या होत्या; त्यांच्याशीं सेक्रेटरीनें पत्रव्यवहार करून त्यांनां सर्व माहिती द्यावी व सभेचे ठरावाच्या कांहीं प्रती प्रत्येकाकडे पाठवून त्यांचे मार्फत ठरावांची प्रसिद्धी करावी व अशी प्रसिद्धी झाल्या नंतर त्या ठरावासंबंधानें ज्या अनुकूल अगर प्रतिकूल गोष्टी घडतील त्यांची माहिती त्या त्या तालुक्याचे मेंबरांनीं सेक्रेटरीला द्यावी असें गेले वर्षीं ठरलें होतें. त्या प्रमाणें सेक्रेटरी साहेबांनीं आपलें कर्तव्य बजाविलें काय ? या प्रश्नाचें उत्तर देतांनां सेक्रेटरी साहेबाला खाली पाहणेंच भाग पडेल असें विशेष खात्रीच्या माहिती वरून व स्वानुभवा वरून ह्मणणें भाग पडतें. फार तर काय परंतु प्रत्येक मेंबर लोकांकडून गेलेल्या पत्रांचीं उत्तरें सुद्धां मिळालीं नाहींत. वर्षभर झोपा घेऊन सभेचे अगोदर १-२ दिवस धांदल करणें व वडीवडर करून सभेची वेळ कशी तरी मारून नेणें इतकेंच काय तें कर्तव्यकर्म आहे अशी जर समजूत असेल तर मात्र तसें करणें रास्त झालें असें ह्मटलें पाहिजे.

सभेनें केलेले ठरावावर सह्या घेण्याकरितां व सभेचें कामाची अमलबजावणी व्यवस्थित रीतीनें करण्याकरितां या वर्षीं सुद्धां दोन नमुने एका गृहस्थानें सभेपुढें मांडले होते; आणि यंदाच्या प्रोसिडिंगच्या व सभेचे ठरावाच्या निदान १००० प्रती आह्मी छापवून वरील नमुन्या प्रमाणें होता होईल तितकी त्यांची जास्त प्रसिद्धी करण्याची आह्मी खटपट करूं असें एका सुशिक्षित व पुढारी ह्मणविणाऱ्या गृहस्थानें सभेंत कबूल केलें होतें. परंतु ज्या अर्थीं त्याला आज तीन चार महिने होऊन गेले तरी त्याची कांहींच अमलबजावणी झाल्याचें दिसत नाहीं. त्याअर्थीं तें बोलणें वृथा होतें असें आतां ह्मणणें भाग आहे.

सभेस येणारे लोकांची वर सांगितल्या प्रमाणें फार गैरसोय होते त्या करितां व सभेने केलेले ठराव छापून त्यांची प्रसिद्धी करण्याकरितां व सभेचे इतर कामाकरितां कांहीं फंड पाहिजे आहे सबब हायस्कूलचे ग्यादरिंगचे धर्तीवर वर्गणी संबंधाची कांहीं व्यवस्था करावी असे हजर असलेले बहुतेक मंडळींचें ह्मणणें होतें व त्या प्रमाणें ते वर्गणी देण्यास तयारही होते परंतु कांहीं थोड्याशा गृहस्थांचे मोठपणाचे आग्रहावरून त्याचा योग्य विचार झाला नाहीं. "सभेचा एक वर्षाचा भोजनखर्च वगैरे मी स्वतः देईन परंतु वर्गणीचा प्रश्न पुढें आणूं नये" असें गेल्या वर्षीचे सभेंत कांहींजण बोलून गेले पण कृतीच्या वेळीं ते कोठें लपले कोण जाणें ! अशा प्रकारें पुढारी ( पुढें पुढें करणाऱ्या ) गृहस्थांनीं "आई जेऊं घालीना आणि बाप भीक मागूं देईना" या ह्मणीचा अर्थ आपले आचरणानीं मंडळीला चांगला समजून दिला. त्यांच्या मोठपणाच्या शद्बावर मंडळीनें भरंवसा ठेविल्या मुळें सभेला आलेले चांगले संभावित लोकांचें वर सांगितल्या प्रमाणें प्रदर्शन झालें इतकेंच नाहीं तर सभेनें केलेले ठराव व त्या संबंधाच्या इतर गोष्टी छापण्यास अर्थात पैशाची अडचण आल्या मुळें त्या तशाच मागें पडल्या व अशा प्रकारें सभेंत घटकाभर गपा मारण्या पलीकडे आजपर्यंत सभेचें हातून कांहींच झालें नाहीं असें ह्मणणें भाग पडतें. या करितां अशा बेबंद व अस्थिर गोष्टीवर लोक किती दिवस भरंवसा ठेवतील व आपली ही वकूची इमारत किती दिवस टिकेल याचा विचार सेक्रेटरी आदीकरून पुढारी मंडळी करतील काय !

कोणतेंही सामाजिक काम अंगावर घेऊन चालणाऱ्यांच्या जवळ तीन प्रकारचीं साधनें असलीं पाहिजेत.

१ यापैकीं पहिलें आणि मोठें महत्वाचें साधन म्हटलें ह्मणजे समाजाचा विश्वास आपणावर बसवून घेणें हें होय.

२ ज्या वळणावर आपण सुधारणा करण्यास इच्छितों तेंच वळण स्वतः आपले आचरणांत असणें. आणि

३ तशा वळणाचें शुद्ध परिणाम समाजाचे नजरेस आणून देऊन त्याचा ठसा त्याचे अंतःकरणावर वठविणें.

परंतु विशेष दिलगिरीची गोष्ट ही कीं या सभेचे अंतर्बाह्य स्वरूपाची तपासणी डोळ्यांत तेल घालून केली तरी वरील तिन्ही गोष्टी पैकीं एकीचाही थांग लागेना. कदाचित् दृष्टीचा दोष असेल असें वाटल्यावरून दुर्बीण आणली व सूक्ष्मदर्शक यंत्रही आणिलें आणि त्यांतून डोळ्यांच्या शिरा ताणताणून पाहिलें तरी वरील गोष्टींचा अणुरेणु सुद्धां कोठें दृष्टीस पडला नाहीं. उलट पुढील गोष्टी मात्र मुळच्याच ठळक असल्यामुळें यंत्राच्या साह्यानें अगदीं स्पष्टपणें दृष्टीस पडल्या.

१ सभेचे पुढाऱ्यांची [ पुढें पुढें करणारांची ] वार्षिक रिपोर्टी। ( करून घेतलेली ) आत्मस्तुति.

२हजर असलेले सभासदांचे मतांची गोष्ट न करितां व सभेंत निघालेले एकादे प्रश्नासंबंधानें विशेष भवतिनभवति करून त्या संबंधानें सर्वांचीं मतें न पाहतां पूर्वींच २-३ इसमामध्यें ( अर्थात वरील पुढाऱ्यांमध्यें ) ठरवून ठेविल्या प्रमाणें एखादा ठराव करणें.

३ सभेस आलेले लोकांचा फजीता प्रत्यक्ष डोळ्यानें पहात असून व असे लोक आपल्या सोयीं करितां पैसे घ्या घ्या ह्मणून म्हणत असून सुद्धां केवळ आपला मोठेपणा मिरविण्या करितां त्याकडे कानाडोळा करणें व अशा प्रकारें लोकांचें मनांत असलेली सभेविषयींची प्रीति व सभेचे पुढाऱ्यावर असलेला लोकांचा थोडासा विश्वास हीं घालवून त्यांचे जागीं अप्रीति आणि अविश्वास यांचे ठाणें बसविणें.

अशा ह्या विपरीत गोष्टी दृष्टीस पडल्यामुळें सभेचे चिरायुत्वा बद्दल मोठीच काळजी वाटते. सभेला दरसाल लोक १००-१५० येतात व फक्त भाड्या बद्दल रेल्वे कंपनीला ३००-४०० रुपये दरसाल दिले जातात, त्याच्या व्याजाच्या किंमतीचे जरी ह्मांहीं काम सभेंत झालें तरी आपण कांहीं तरी केलें असें वाटून कालान्तरानें त्याचा कांहीं तरी चांगला बदला मिळेल. आतां तरी पुढारी मंडळी या कडे लक्ष पुरवितील काय ?

आतां या पुढें पुढारी मंडळीचे आचरणांत फरक पडेल या आशेनें कांहीं दिवस वाट पाहतों. तसें नच झाल्यास मनांत बोलत असलेल्या बाकींच्या गोष्टी घेऊन पुढें एखादे वेळेस आपले भेटीला येण्याच्या हेतूनें आतां आपली रजा घेतों. कळावें ही विनंती.

आपला
स्पष्ट वक्ता.

---

वऱ्हाडसमाचार

मिति वैशाख वद्य १ शके १८१९

## भावी पर्जन्यकाल

या दुष्काळानें लोकांच्या मनाचा धीर इतका सुटला आहे कीं भावी पर्जन्यकाला विषयीं अनुमानें ते सध्यां पासून बांधू लागले आहेत. सर्व आशा फक्त येत्या पावसाळ्यावर अवलंबून आहेत. या आशामृताच्या बलावरच मनुष्यें सांप्रतच्या दुष्काळांत कसे तरी दिवस कंठीत आहेत. सर्व इस्टेट गमावून देखील जीवधारणा करण्यास लोक या आगामी ईशकृपेच्या सुखसमृद्धीवर मनोराज्य करीत आहेत. येत्या पर्जन्य काला विषयीं जीं शास्त्रीय अनुमानें आहेत तीं लोकांच्या आशा तृप्त करण्या सारखीं आहेत.

दक्षिण आफ्रिकेंतील केप टाऊन येथील वायुचक्रशास्त्रज्ञ मि. हाचिन्स यांनीं तिकडील स्थिती वरून इंडियांतील पर्जन्यकाला विषयीं आपला अभिप्राय कळविला आहे. इंडियांत दुष्काळ पडेल असें गुदस्ता त्यांनीं भविष्य केलें होतें आणि तें अक्षरशः खरें ठरलें. व इंडियांतील वायुचक्रशास्त्रज्ञाचें भविष्य खोटें ठरलें. मि. हाचिन्स यांच्या मता प्रमाणें वातावरणाच्या स्वरूपांत १९ वर्षांनीं त्या त्या स्थितीचें पुनः पुनः परिवर्तन होत असतें. हें साधारण ठोंकळ अनुमान झालें. समुद्रांवरील नौकागमनाला अनुकूळ वारा, त्याचा वेग, हवेचा बदलणारा दाब, हवेंतील आद्रता इत्यादि सांप्रतच्या गोष्टी लक्ष्यांत घेतल्या आणि १९ वर्षांची परिपाटी तशीच हिशोबांत घेतली ह्मणजे असें अनुमान निघतें कीं सन १८९७ सालचा पर्जन्यकाल १८७८, १८८८ व १८९२ या तीन साला प्रमाणें होईल. पूर्वकालीन गोष्टी भाविष्यकालीन गोष्टींचा जो ठाकतोळा सूचवितात तो इतर वस्तुस्थितीच्या मानानें ताडून व तपासून घेतला पाहिजे.

सन १८७६ व १८७७ या दोन सालीं सर्व इंडियांत पाऊस कमी झाला होता. एकंदर देशाच्या सरासरीच्या मानानें पाऊस ४ इंच कमी पडला होता. १८९५ सालें पाऊस २.८ इंच कमी होता व १८९६ सालीं तो ४ $\frac{१}{२}$ इंच कमी झाला. या आंकड्यावरून १९ वर्षांची चक्रगती पुष्कळ अंशीं खरी आहे असें दिसतें. १८७८ सालीं पावसाला प्रारंभ उशिरानें झाला तथापि जूलै, आगष्ट, सप्तंबर वगैरे महिन्यांत सर्वत्र आबादानी झाली. १८८८ सालीं पाऊस मृग नक्षत्रावर सुरूं झाला आणि तें साल पीकपाण्या संबंधानें चांगलें गेलें. त्याच प्रमाणें १८९२ साल देखील चांगल्या सुबत्तेचें होतें. १८७८, १८८८ किंवा १८९२ या तिन्हीं साला पैकीं कोणत्याही साला प्रमाणें भावी पर्जन्यकाल होईल तर लोक ईश्वरी क्षोभ शमला ह्मणून त्याच्या कृपेची खरी किंमत जाणून त्यास अनन्यभावें शरण जातील.

---

चक्रवर्तिनी महाराणी सरकारचे मांडलिक निजाम सरकार आहेत आणि मांडलिकपणाच्या परतंत्रते मुळें निजाम सरकारास एखाद्या स्वतंत्र संस्थानाचा हक्क मागतां येत नाहीं अशा तत्वावर इंडिया सरकारानें एका गूढ प्रश्नाचा निकाल केला आहे. मूळचा प्रश्न असा उद्भवला होता कीं निजाम सरकारच्या राज्यांत युरोपियन लोकांस जमीन जुमला संपादून द्यावा किंवा देऊं नये; आणि स्थावर इस्टेट संपादण्याची परवानगी दिली तर त्या वसाहतींत येणाऱ्या युरोपिअन लोकांवर निजाम सरकारचा फौजदारी अंमल चालावा किंवा फक्त त्यांस इंग्रजीच फौजदारी अंमल लागूं करावा. खरोखर, फौजदारीचा अधिकार स्थळविशेषानें त्या त्या स्थळाच्या स्वामीस असतो परंतु युरोपियन लोकांस हा नियम लागू करण्याचा इंग्रज सरकारचा विचार नाहीं. इंग्रज सरकाराशीं निजाम सरकाराचें नातें बरोबरीचें किंवा समसमानतेचें नाहीं ह्मणून निजाम सरकारास आपल्या राज्यांतील युरोपियन लोकांवर फौजदारी अंमल नाहीं असा वरिष्ठ सरकारचा ठराव प्रसिद्ध झाला आहे. हा भेदाभेद युरोपियन लोकां विषयीं ज्या कायद्यानें प्रचारांत आणिला तो कायदाच अगोदर पुष्कळ राष्ट्रांस मान्य नाहीं, पण हा अन्याय आमच्या सरकाराच्या दृष्टीनें न्यायाचा आहे तेव्हां न्यायदेवतेच्या चित्रांत तिचे डोळे बांधलेले असतात हा कांहीं विचित्र प्रकार नाहीं. इंडियन क्रिमिनल प्रोसिजरांत असाच भयंकर अन्यायाचा प्रकार चालूं केला आहे. युरोपियन अपराध्याची चौकशी करण्याचा अधिकार काळ्या माजिस्ट्रेटास दिला नाहीं ही गोष्ट राजकीयदृष्ट्या मोठ्या चुकीची होय. ही अन्यायपरंपरा वरील ठरावांत पक्केपणीं कायम करून सोडली आहे.

---

## कंगालखाना

श्रीमती चक्रवर्तिणी महारानी सरकार आपल्या इंडियन प्रजेविषयीं मोठ्या दयाद्र व कृपाळू आहेत. दुष्काळाचें राक्षसीरूप दृष्टीस पडतांच त्यांनीं आपल्या अधिकारिवर्गास सर्व प्रजेचे प्राण या संकटांतून वांचविण्याविषयीं सक्तीचे हुकूम सोडले. सरकारी योजना अशी आहे कीं काम करण्याला ताकदवान आहे अशा इसमाला दुष्काळाच्या कामावर मोलमजूरीवर पाठवावें आणि जे पंगु, अल्पवयी किंवा कमताकद आहेत अशा आंधळ्या पांगळ्या थोट्यांस, मुलाबाळांस, आणि वयोवृद्धांस कंगालखान्यांत फुकट जेवूं घालावें. या दोन्ही व्यवस्था मोठ्या नामी आहेत परंतु अंमलांत आणण्याच्या वेळीं त्या कामांत संकटें, उपाधि व अडचणी नाना आहेत आणि त्यामुळें महाराणी सरकारच्या इच्छेची पूर्णता होण्या पूर्वीं सर्व बाजूनीं पराकाष्टा करावी लागते.

अकोल्यास कंगालखाना स्थापून महिनाभर होत आला पण त्याचा उपयोग करण्या साठीं अनाथ लोक पुरेसे मिळेनात. दुष्काळ कांहीं सामान्य नाहीं आणि अन्नान्न करणार अनाथ लोकही कांहीं कमी नाहींत; असा खरा प्रकार असून कंगालखाना रिकामा पडला आहे हें पाहून पुष्कळांस विस्मय वाटला. कंगालखान्यांत लोक येत नाहींत याला कारणें अनेक असल्याचें शोधांतीं आढळून आलें. लोकांचा पहिला गैरसमज असा कीं सरकारी कंगालखान्यांत सर्वांची जात भ्रष्ट होणार आहे. सर्वांच्या साठीं एकच खाना तयार होत असून तेथें महारमांग, कणबी मुसलमान, ब्राह्मण, रजपूत वगैरे सर्व अठरापगड जातींचा एकंकार होईल. दुसरी गैरसमजूत अशी कीं या कंगालखान्यांत जो कोणी थोडे दिवस राहता त्याला औषधाच्या द्वारानें विषप्रयोग करून मारून टाकतात. तिसरी गोष्ट ही कीं कंगालखान्यांत राहणाऱ्या लोकांस कैद्या प्रमाणें ठेवितात आणि त्यास इतरत्र फिरूं देत नाहींत. या व अशा बहुत गैरसमजामुळें कंगालखान्या वरून जाणेंयेणें देखील गोरगरीबांनीं वर्ज्य केलें होतें. मे. रिडो साहेब डिप्टी कामेशनर यांनीं येथील कंगालखान्या विषयीं फार काळजी घेतली आणि पुष्कळ सुखवस्तु गृहस्थांच्या साह्यानें त्याला आतांशा बरें स्वरूप आणिलें आहे. आमचे येथील तहशिलदार रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशपांडे हे आपल्या थोर घराण्याच्या नांवलौकिका प्रमाणें गोरगरीबा विषयीं फार कृपाळू आहेत. ते रस्तोरस्तीं फिरून लोकांच्या गैरसमजुती दूर करूं लागले. स्वयंपाक ब्राह्मणांदि श्रेष्ठ जातीच्या लोकांकडून करवितात, निराश व दीन झालेल्या लोकांस उपदेश करून त्यांस कंगालखान्यांत पाठवितात आणि तेथील व्यवस्थे विषयीं त्यांची देखरेख अगदीं कसोशीची व काळजीची आहे. राव सा. देवराव विनायक, दामोदर गणेश पटवर्धन, जयकृष्ण बगाजी, इत्यादि मंडळी मोठ्या मेहनतीनें आपल्या व्यवस्थेखालीं गोरगरीबांचा चांगला परामर्ष घेत आहेत.

---

## धर्मफंड

हा फंड सरकारी व्यवस्थेचा उपयोग करूं न शकणाऱ्या दुष्काळपीडिता साठीं उभारलेला आहे. सध्यां या फंडाचा उपयोग मोठ्या सत्कारणीं होत आहे. गुप्तदानाचा महिमा व थोरवी कांहीं विलक्षण आहे आणि या धर्मदायाची मोठी जरूरी सध्यां फार आहे. मे. महमद शेख इस्मायल आणि कांहीं व्यवस्थापक मंडळी या फंडाचा लाभ अगदीं नडलेल्या लोकांस फार चौकसपणानें करून देत असतात. संकटांत सापडलेल्या मानधन पुरुषाच्या जीवधारणेसाठीं हा फंड खर्च होत आहे हें पाहून फंडाच्या वर्गणीदारांस पराकाष्ठेचा आनंद व हर्ष वाटेल. या धर्मफंडाच्या स्थापनेमुळें अन्नदानाकडे लोकांच्या मनाची गती विशेष वाढत आहे. ज्यांस परमेश्वरानें अनुकूळ केलें आहे त्यांनीं ईश्वरी कृपे विषयीं कृतज्ञता ईश्वराच्या प्राण्यावर भूतदया ठेऊन दाखविली पाहिजे. आमच्या जिल्ह्यांतील या धर्मफंडाची व्यवस्था मोठी नामी आहे हें कळविण्यास परम संतोष वाटतो.

---

ग्रीस व टर्की यांच्या दरम्यान जी लढाई चालूं आहे तिचा निकाल सामोपचारानें

तहाच्या बोलण्या पर्यंत येऊन ठेपला आहे. ही लढाई लवकर मिटेल तर फार चांगलें. या लढाई मुळें दुसरें रण माजण्याची मोठी भिती होती पण ती सध्यां दूर झाली. टर्कींचे सुलतान तहाला कबूल आहेत पण ते लढाई-च्या खर्चा बद्दल नुकसानी ८० लाख पौंड मागत आहेत. बहुत करून लवकरच ही लढाई बंद होईल असा सुमारें आहे.

---

कलकत्ता मुनसिपल कारपोरेशन पुढें एक चमत्कारिक सूचना मि ट्रीमर्न यांनीं आणिली होती. कलकत्ता मुनसिपालिटीला आपल्या तर्फे बंगालच्या कायदे कौंसिलाला एक सभासद निवडून देण्याचा अधिकार आहे. या अधिकारा प्रमाणें सभासदाची जी निवड करावयाची ती आळीपाळीनें हिंदूची, मुसलमानाची किंवा इतर धर्मवाल्याची करावी ह्मणजे परस्पर जातीमध्यें कोणा कोणावर रागवण्याचें कारण नाहीं. मूळ ही सूचना पसार झाली असती तर एक वाईट तत्व चालूं झालें असतें. जातिभेद न मोडतां ते वाढले असते, आळीपाळी येई पर्यंत कित्येक चांगल्या श्रेष्ठ लोकांस रिकामें निवडतां आलें नसतें, आणि जाती भिन्नपणावर निवड होणार असल्यामुळें कायदे कौंसिलदाराच्या खऱ्या लायकीच्या गुणांला अप्राधान्यता येऊन जातीच्या आकस्मिक स्थितीला खोटें मोठें पण आलें असतें. मि. ट्रीमर्न यांच्या सूचनेच्या तत्वा प्रमाणें नामदार दादाभाई नवरोजी यांस सेंट्रल फिन्सबरीच्या लोकांनीं कधींच पार्लमेंटासाठीं निवडलें नसतें. आणि चांगली चांगली गुणसंपन्न मंडळी मागें पडली असती. कलकत्ता कारपोरेशन मध्यें शेवटीं शहाणपणाचा विजय होऊन वरील सूचना त्याज्य ठरली ही आनंदाची गोष्ट होय.

---

नामदार जव्हेरीलाल उमाशंकर याज्ञिक यांस गेल्या ८ वे तारखेस मुंबईस देवाज्ञा झाली हें कळविण्यास मोठें दुःख वाटतें. मुंबई इलाख्यांतलाच काय पण सर्व देशाचा एक निस्सीम राष्ट्रभक्त हरपला. ही हानी मोठी असून ती भरून येण्या सारखी नाहीं. ज्यांस या गृहस्थाच्या दर्शनाचा व परिचयाचा लाभ झाला असेल त्यांस त्यांची ती साधी मूर्ती, सोज्वळ वर्तन, थोर विद्वता, सौम्य, मनोहर व मनांत ठसणारी वादशैली, व माहितीचें भांडार हीं पाहून त्या पुरुषा विषयीं पूज्यभाव व अभिमान उत्पन्न होत असे. राष्ट्राचा एक खंबीर पुरुष नाहींसा झाला हें आपलें दुर्भाग्य होय. डाक्टर भंडारकर, नामदार न्यायमूर्ती रानडे, राजश्री वामनराव मोडक इत्यादिकांच्या बरोबरीचेच हे सहाध्यायी होते. हे मोठे बुद्धिमान व प्रचंड उद्योगी होते त्या मुळें त्यांच्या कार्याचा कांहीं विलक्षण प्रभाव पडत असे. युनिव्हरसिटी, मुंबईकारपोरेशन, कायदे कौंसिल, राष्ट्रीय सभा, इत्यादि सार्वजनिक संस्था त्यांच्या उत्तम कृतींची व लोकोपकाराची चिरकाल साक्ष देतील. यांच्याशी वादविवाद करितांना ह्यांच्या प्रतिपक्षांस देखील मोठा आल्हाद वाटत असे. असाच अप्रातिम विनय व भारदस्तपणा त्यांच्या बोलण्यांत असे. अबकारी खात्याची सुधारणा करण्याविषयीं यांनीं मोठी मेहनत केली आणि यशश्री संपादली. यांनीं एक इंग्रजी गुजराथी कोश रचिला असून इतर चालूं विषया वरील त्यांचे लेख राजमान्य आहेत. यांचीं धर्ममतें जुन्या चालीचीं होतीं पण हे सुधारणेला अनुकूळ असत. हे आपल्या वयाच्या ६२ वे वर्षी निवर्तले आणि आपल्या समाजांतील अशीं श्रेष्ट रत्नें अनुभवाच्या विकासाच्या व उपयुक्ततेच्या एन भरतीच्या वेळीं मृत्युंगत होतात ही मोठी शोचनीय गोष्ट होय !

---

The Berar Samachar

MONDAY MAY 17 1897

---

Litigation in Berar is very costly, dilatory and detrimental to the general welfare of the society. This phase of litigation is not peculiar to this province. It is the common objectionable ground all over India; but it is felt here in rather a palpable and prominent manner. The motto of a court of justice ought to be cheap and speedy justice; but the system which the Government have introduced on Western principles carries with it all its short—commings in India. The system of administering justice is most faulty in so far as it makes it a highly expensive institution. The law regulating litigation sanctions the heavy tax of purchasing justice in a court—house. The pressing taxation of the Court-fee, other stamps and process—fees &c. makes the assertion of one's rights and liabilities a doubtful gain. Besides, the present civilization has a tendency to foster litigation. It aims a blow at socialistic organization and teaches people to appreciate individual liberty and freedom. Modern society is more individualistic and hence there is nothing like community or co-operation of property. A struggle for life is set in. In it the fittest will outdo all the rest of his fellow—beings. The fitness of a man depends upon the victory of selfish motives over the altruistic side of human nature. That man will be the fittest who will intelligutly subject all his actions to the development of working for one's own ends either in social or political matters. This onward movement is further facilitated by the administration of justice. It helps the fittest to win his glories and accelerates his work so much that a giant's fight begins with the dwarf. The helpless, ignorant and rather benevolent people fall an easy prey to the ends of litigation. One has to pay very dearly for the cause of justice before it could be vindicated. We need not further illustrate how litigation on a large scale becomes ruinous to the interest and the common weal of the people. The dilatory mode of dealing out justice is due to some extraneous causes which are beyond the control of the bar and the bench. Besides the procedure are prolix and allow of such delay.

The Bengal Government has proposed to check the spread of litigation. It is within the intention of that Government to curtail the rights of appeal and to raise simultaneously the jurisdictions of Courts. The question is a very intricate and knotty one and we propose to return to it once more. We have in Mr. R. Obbard a keen and penetrating Judicial Commissioner who has at heart the best interests of his department of administering justice and has got brilliant capacities to effect a solid reform. He is preparing for the present a new scheme and we hope that it will succeed very well in the long run. His experience, legal acumen and administrative energy are a sufficient guarantee for the success of the new proposal. Let us hope that he will unfold his scheme for public approval and criticism before he sends it up.

---

The Takavi advances in this district are most opportune. People who are entitled to claim the advantage apply to the Deputy Commissioner and get the relief with no loss of time Mr. F. W. A. Prideaux is a diligent, energetic and careful officer. He is thoroughly conversant with the needs of the people and tries to afford a ready and immediate help to them whenever it is within his power to do so. The speedy disposal of the Takavi—applications is an effective mode of promoting the wise policy of establishing a government agricultural bank on the system of Takavi advances and this he does in the most efficient and praiseworthy manner.

---

We give below the scientific explanation of the pheuomenon of an earthquake which it is necessary for us to learn:—

" The breast of our mother earth is continually heaving as with a gentle breath. A stately undulation of the surface is always in progress. These waves or pulsations are not of great magnitude, but they are never still. They are called in the terminology of new science "Bradyseismic" movement not in honour of any particular Irishman, of the name of Brady, but from *Bpadvs*—slow, heavy. As to what may be the cause of bradyseismic movement the Japanes themselves do not yet profess to say anything. Sufficient for the moment is the establishment of the fact. But though it is a fact that does not vitally concern countries which lend themselves kindly to the breathing of the great mother, certain conformations of a coast line may impede this breathing. That is the case where the shore descends very abruptly into very deep water. Then the bradseismic wave meets with an irregular resistance, or that is at present the interpretation of the facts, and earthquakes are the consequence. The eastern coast of Japan is built upon the prixciple 1 describe and so also, is the western coast of South America. These are accordingly the two great earthquake regions of the world.

If you have a tract of country covered with grass and trees on one side of your seismic observatory, and on the other side, a tract bare of verdure, there are different conditions in those two regions as affecting the deposition of dew. It accumulates, at certain times in the course of every four and twenty hours, in greater volume on the grass covered country than on the other. And the result is a regular see—saw movement between these two regions that the seismograph detects. Now just apply this observation to the condition of things known to exist in connexion with the deposit of mud, carried down by great rivers, on the bottom of the sea. Here we are concerned, not with the small weights of a dewfall, but with millions and billions of tons Something has to give way sooner or later.

Broadly we may take it as pretty certain now that the bradyseismic waves plus the effects of the seculsar erush and flow of the rocks, are the cause of earthquakes, and the fact that the centres of disturbance in most cases appear to be situated somewhere out at sea, seems distinctly corroborative of the theory. On the ocean beds the deposition of weight is doing most to disturb the previous conditions, and may easily be thought of as interfering most with the regular pulsation movements. "

---

## वऱ्हाड

हवामान—उष्णतेचें मान फार प्रखर आहे. हवेचा उपद्रव उमरावती जिल्ह्यांत विशेष असून आमच्या जिल्ह्यांत फैलावत आहे. वारा चांगला सुटतो आणि त्यामुळें कमी उकडतें उन्हाच्या सिरसिरी मुळें गरीब फार बेहोष होतात.

मे. मिडो साहेब हे दुष्काळाच्या कामासंबधानें अती जीवापाड मेहनत करितात त्यांस विसावा कसा तो ठाऊक नाहीं. काल ते खामगांवास गेले. ठिकठिकाणीं जाऊन स्वतां पाहणी करितात.

येथील अमेरिकन मिशनरी मंडळीनें जवारी किंवा मक्काई वाटण्याचा धर्मादाय मोठ्या ज्यारीनें चालविला आहे.

कर्नल सी. टी. लेन सी. आय. इ. डिपुटी कमिशनर वर्ग १ यांस गेल्या डिसेंबरचे ११ वे तारखे पासून पेनशन मिळाल्या वरून त्या तारखे पासून खालील बढत्या करण्यात आल्या आहेत.:—

| मिस्टर | डिपुटी कमिशनरीचा वर्ग |
|---|---|
| ए. जे. डनलाप ( पर राज्यांत ) | १ ला. |
| आर. डी. हेअर | १ ला |
| एच. गाडविन आस्टिन | २ रा |
| मौलवी महमद निजामुद्दीन हसनखान ( परराज्यांत ) | ३ रा |
| कुमार श्रीहरबानजी रावजी ( परराज्यांत ) | ३ रा |
| रुस्तुमजी फर्दूनजी | ३ रा |
| सी. इ. बिडल्फ | स्पेशल असि० कमिशनर |

मि. ए. वुइलियम्स फर्स्ट असि. रेसिडेंट यांची बदली केटा कडे झाल्या प्रमाणें ते तिकडे गेले आणि मद्रासचे सिव्हिल सरव्हंट मि. पिने यांस फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट नेमण्यांत आलें.

पार्शी मंडळींतील एक बडे गृहस्थ मि. जहानगीर हारमसजी मोडी हे गेल्या पंधरवाड्यांत मुंबईकडे निवर्तले. हे मोठे उदार होते. यांनीं बडनेरा येथें आपल्या खर्चानें धर्मार्थ दवाखाना चालविला आहे.

'वरूडकर' मोर्शीहून कळवितात कीं त्या तालुक्यांत अनाथ गरीब लोकांस शिरखेड, मोर्शी व वरूड येथें अन्न किंवा जवारीचें पीठ वाटण्यांत येत आहे. या कामावरील अधिकारी फार दक्षतेनें व्यवस्था ठेवितात. तालुक्यांत पटकीचा वाखा तुरळक चालू आहे. हवा फार उष्ण असून अती उकडतें. मोर्शीच्या नेटिव क्लबाच्या मंडळीनें मनोरंजनार्थ गुणोत्कर्षाचा खेळ करून दाखविला. पाहिला प्रयत्न असून बरा वठला. अभिनयाचें अंग अगदीं कमी होतें आणि त्यामुळें एन रंग भरण्याच्या वेळीं तीन चार वेळा रसभंग झाला. नाटकाचें उत्पन्न गरीब लोकांच्या उपजीविके कडे खर्चण्यांत येईल तर मंडळीची मोठी प्रशंसा होऊन त्यांस पुण्य लागेल.

---

### बाजार भाव

| | दर खंडीस |
|---|---|
| आळशी | ८९ रुपये |
| जवारी | ९५ रु० |
| गहूं ( कांठे ) | १२५ रु० |
| ,, ( बनशी ) | १२० रु० |
| चणे | ११० रु० |
| तेल | ६। रु० मण |
| तूप | ७॥ मण |
| सोनें | २७ तोळा |
| चांदी | ८३ |

---

## वर्तमानसार.

समुद्राची योग्यता व किंमत किती आहे हें पुढील आंकड्यांवरून दिसतेः-युनायटेड किंगडमच्या बदरांत १८९६ सालीं जे मासे मारले त्यांचें वजन ७,२६,००० टण असून त्यांची किंमत ७,४३,६०,००० रुपये होती. यापैकीं खुद्द इंग्लंड व वेल्स या बदरांत मारलेल्या माशांचें वजन ३,७७,००० टण असून किंमत ९,९१,००,००० रुपये होती. स्काटलंडांत मारलेल्या माशांची किंमत १,६४,७०,००० असून ऐर्लंडची २७,९०,००० रुपये होती. १८९४ सालीं शेजारच्या फ्रेंच बंदरांत ४,६८,१०,००० रुपये किंमतीचे मासे मारले; कानड्याच्या बंदरांत १,२३,४०,००० रुपये किंमतीचे मारले यावरून हें युरोपियनलोक दरसाल किती प्राण्यांचे वध करीत असतील याचें सहज अनुमान होतें. जीवो जीवस्य जीवनं हें त्यांचें तत्व दिसतें. हे इंग्रज लोक हिंदुस्थानचें सुंदर गहूं खावूं लागल्यावरही जर इतक्या प्राण्यांस मारून खातात तर बटाटे व मासे यांच्याचवर जेव्हां त्यांची उपजीविका होती तेव्हा किती प्राण्यांस मारीत असतील ?

सर्व महत्वाच्या खटल्यांत इन्साफ करणाऱ्या माजिस्त्रेटांनीं इन्साफ सुरू करण्यापूर्वीं किंवा सुरू झाल्यावर होता होईपर्यंत तन्ख्याची जागा स्वता पाहावी असें ठरविलें आहे.

२१ वर्षांच्या आंतल्या वयाच्या अगर ३० वर्षें चाकरी न झालेल्या कोणा माणसास प्राव्हिन्शीवल नियमाप्रमाणें जुडिशियल खात्यांत नेमलें जाणार नाहीं असें ठरविलें आहे.

राणीचा वाढदिवस २४ मे ठरला.

आर्टा येथील लोक घाबरून पळूं लागले.

एपिरसमधील पराभव पावलेली ग्रीकफौज पळ काढून आर्टा येथें आली.

टर्कीफौज फर्सालावर जात आहे.

अथेन्सच्या ख्रिस्तीदेवळांतल्या प्रार्थनांतही टवाळ्या होऊं लागल्या.

ग्रीकनें आपला मुख्य कमांडर क. वासस व दुसरे कांहीं कामदार यांस परत बोलावलें.

आस्त्रियाचा बादशहा नुकताच जो रशियाच्या झारास भेटला त्यांत उभयतांच्या विचारानें ठरल्या प्रमाणें या दोघांनींही सर्विया, बल्गेरिया व मांटेनिग्रो यांस पत्र पाठवून तुह्मी कांहीं गडबड न करतां उगीच बसा अशी त्यांस ताकीद केली आहे.

ग्रीकफौज पुन्हा एपिरसमध्यें शिरली.

क्रीटचे लोक बऱ्या राज्यांचें सांगणें ऐकण्यास तयार नाहीं व आमचा देश ग्रीकच्या राज्यांत सामील करावा असें त्यांचें ह्मणणें आहे.

ग्रीक फौजेंत सामानाचा तोटा आहे.

ग्रीसनें टर्की बरोबरची लढाई चालू ठेवण्याचें ठरविलें. होते परंतु आतां इतर राष्ट्रांच्या मध्यस्तीनें टर्कीशी तह होईल असें वाटतें.

हिंदुस्थानांतून रशियांत जाणारीं पत्रें व पाकिटें प्लेगमुळें धुपवून घेण्याचा रशियन सरकारानें ठराव केला आहे करितां हिंदुस्थानच्या ज्या लोकांस पत्रें व पाकिटें तिकडे पाठवावयाची असतील त्यांणीं तशी खबरदारी घेऊन पाठवावी असें पोष्टखात्याकडून सांगण्यांत आलें आहे. ठा. अ.

ग्रीसेंच लष्कर आर्टाच्या मार्गानें टर्कीच्या इपायर्स प्रांतांत पुनः दाखल झालें. पेटेपिगाड्याचा मथक त्यांनीं आपल्या कबजांत घेतला. या लढाईत सल्ला करण्या करितां सर्व राज्यांच्या प्रतिनिधींनीं प्यारिस येथें एकत्र जमून विचार करावा अशी इंग्लंडनें सूचना केली होती; ती इतर राष्ट्रांनीं कबूल केली नाहीं.

तुर्कलष्करास ग्रीसमध्यें न शिरूं देण्या करितां फ्रान्स सरकारकडील २०० लष्करी लोक ग्रीसच्या कोलो बंदरांत उतरले आहेत व तेथें ते पहारा करूं लागले आहेत. ग्रीसकडे लढाईच्या सरंजामाचा व अन्नाचा ताण पडल्याची बातमी बाहेर आली आहे. युरोपांतील मोठीं राष्ट्रें मध्यस्ती करून उभयतांत सल्ला लवकरच करतील असा रंग दिसूं लागला आहे.

टर्की व ग्रीसमध्यें चालू असलेल्या लढाईत टर्कीस मदत करण्याकरितां इजिप्त येथील मुसलमान लोकांत फंड गोळा करण्याचें काम सुरू झालें आहे. केरो येथील कमेटीनें ३८००० पौंड ह्मणजे ६,०८,००० रुपये वसूल केले आहेत. शिवाय गेल्या महिन्याच्या ९ तारखे पर्यंत वेगवेगळ्या माहमेडन कमेट्यांकडून तीन लक्ष पौंड ह्मणजे ४८ लक्ष रुपये टर्कीच्या बादशहाकडे रवाना करण्यांत आले होते. मुसलमानभाईचें हें करणें प्रशंसनीय आहे.

अफगाणीस्थानच्या सरहद्दीवर मरफीनें पिडलेल्या लोकांच्या तपासाकरितां पाठविलेल्या रशियाच्या लष्करी शिपायांनीं अफगाणिस्थानच्या सरहद्दीवरील शिपायाशीं उकरून दंगा केला, या झटापटींत रशियाकडील दोन शिपाई व अफगाणचा एक शिपाई ठार झाला. मुद्दाम भांडण उपस्थित होण्याकारितां रशियानें हें बखेडें केलें असा पुष्कळांचा तर्क आहे, व रशियाचा हिंदुस्थानावर असलेला डोळा व त्याचे चालूं असलेले प्रयत्न पाहिले ह्मणजे हा तर्क खरासा वाटूं लागतो.

मोरवी संस्थानासंबंधीं अशी एक वार्ता बाहेर आली आहे कीं, मोरवीचे हल्लींचे महराज राज्यारूढ होते वेळीं एका सवाष्ण बाईस त्यांनीं स्वतःची करून ठेविली होती. त्या बाईस झालेल्या मुलास गादीचा अधिकार देण्याचा महाराजांचा विचार चालू आहे त्यामुळें महाराजांची विवाहित स्त्री पालितान्यास आपल्या माहेरी जाऊन बसली आहे व तिचे बंधु इंग्रजसरकारा जवळ दाद मागूं लागले आहेत.

महुवा येथील महाजन मंडळी दुष्काळ पीडीत ८०० लोकांस रोज अन्न पुरवीत आहेत. श्री. स. वि.

युरोपियन लोकांचा उत्तरोत्तर असा बळकट समज होत चालला आहे कीं, तिकडील राष्ट्रें ग्रीस व टर्कीचेमध्यें मध्यस्ती करतील.

कर्नल व्हासॉस यांसह १४ ग्रीक सैन्याधिकाऱ्यांना क्रीट बेटांतून परत बोलाविलें आहे. तें दिखाऊ रीतीनें थेसली प्रांतीं जरी पाठविण्यास्तव बोलाविलेलें आहे तरी त्यावरून ग्रीस लवकरच राष्ट्रांच्या आधीन होईल असें वाटतें.

निजाम हैद्राबादच्या इंगोली विभागांतील शेतकरी लोक आपले शेतीचीं जनावरें मारून खाऊं लागले आहेत. कित्येक जिल्ह्यांत पिण्याच्या पाण्याचीही पंचाईत झाली आहे.

फतेपूर जिल्ह्यांतील दुष्काळ पीडित लोकांची देखरेख करण्याकरितां पंडित शिवगोरे नांवाचा नायब तहशिलदार नेमला होता त्यानें दुष्काळ पीडित आजारी लोकांस वाईट तऱ्हेनें वागविल्याबद्दल त्यास ३ तीन आठवड्यांची सक्त मजुरीची कैद मिळाली.

स्टेशनावर दरोडा व दोन खून— गेल्या आठवड्यांत भुसावळजवळील दुसखेडा नांवाच्या स्टेशनावर फार मोठा भयंकर प्रसंग घडून आला. सुमारें २५।३० दरोडेखोर रात्रीच्यावेळीं एकदम स्टेशनावर चालून आले. व त्यांनीं तेथें असलेल्या पोर्टरास पोलिस कोठें ह्मणून विचारलें. त्यानें मला माहीत नाहीं व मी त्याला पाहिलेंही नाहीं असें सांगितलें. हीं झालेलीं भाषणें जवळच निजलेल्या पोलीस कॉन्स्टेबलानें ऐकिलीं. तेव्हां हा कांहीं तरी दगा आहे असा त्याला संशय येऊन तो सावध झाला व आपली बंदुक घेऊन स्टेशनच्या जवळ एका झोंपडींत जाऊन बसला व बंदुकींत गोळ्या भरून तो अगदीं तयारीनें बसला. इकडे ते दरोडेखोर पहिल्यानें दांडगाई करून स्टेशनांत शिरले, व चापसाचापसी करूं लागले, पण पहिल्यानें पोलीसाचा तपास लावून त्याची व्यवस्था केल्यावर मग आपला कार्यभाग साधूं असें मनांत आणून त्यापैकीं एक दोघे इसम स्टेशनच्या बाहेर येऊन ज्या झोंपडींत पोलीसशिपाई बसले होते त्याच बाजूला न कळत जाऊं लागले. ते लोक आपणाकडेसच येतात असें पोलीसास वाटून त्यानें आपली बंदुक लागलींच झाडली. व एका गोळीसरसे दोन इसम खालीं मरून पडले. हा प्रकार पाहतांच येथें चांगला बंदोबस्त दिसतो असें त्या बाकीच्या दरोडखोरास वाटून ते सर्व तेथून पळाले. व जातांना त्यांनीं त्या मरून पडलेल्या दोघां इसमाचीं डोकीं कापून घेऊन गेले. दुसरे दिवशीं पोलिस येऊन चौकशी झाली. शेजारच्या एका खेड्यांतील स्त्रीच्या सांगण्या वरून २५।३० माणसें धरलीं असून खटला भुसावळ येथें चालू आहे. अशी या भयंकर दरोड्यांची हकीकत आमच्या कानीं आली आहे. पोलिसच्या मर्दुमकी बद्दल सरकार त्याला काय बक्षीस देतें तें पहाणें आहे. न्या. सु.

भयंकर आग— पारिस शहरच्या चांम्स इलायासिस भागांत रूजिन गौंजन जागीं दयाभूत कामासाठीं लांकडी छपरांत मोठा बाजार भरला होता. त्या छपरास वाट एकच होती त्यांत विजेच्या तारा आणून सोडल्या होत्या, त्याच्या पासून ही आग लागली अशी तारेंतील बातमी आहे. फक्त १२ मिनिटांत हें लांबचलांब लांकडी छपर जळून खाक झालें इतका आगीचा प्रचंड लोळ होता. त्या आगींत सुमारें २०० मनुष्या पेक्षां जास्त मनुष्य मेलीं असावींत असा अजमास आहे. जळालेल्या माणसांच्या १४ गाड्या भरून नेल्या. पारिस मधील उमराव बायका पुरुष २ नामांकित बरींच माणसें जळून मेलीं असावींत असें निदर्शन ता० ९ च्या तारेंत केलें आहे.

वानाना नांवाचें केळी सारख्या फळाचें झाड असून त्याची लागवड विलायतेंत फार कारतात व त्यापासून उत्पन्न ही फार मोठें होतें. ह्या फळाचें उत्पन्न बटाट्यापेक्षां ४४ पटीनीं जास्त आणि गव्हांपेक्षां १३१ पटीनीं अधिक होतें असें तिकडील कुशल व अनुभवी कृषिशास्त्रवेत्यांनीं प्रसिद्ध केलें आहे. आणि ह्या फळाच्या अशा दांडग्या उत्पन्नामुळें तिकडील लोक त्या फळाची लागवडही पुष्कळच करितात. शु. सु.

---

नोटिस

तुकाराम वा॥ सखाराम पाटील रहाणार खेर्डे तालुके खामगांव जिल्हे आकोले यास व इतर सर्व लोकांस नोटीस देण्यात येते कीं, मौजे खेर्डे तालुके खामगांव जिल्हे आकोले येथील शेत सर्वे नंबर ९७ याचें खातें महादू वल्लद भवानी याचे नांवें असून यांतील ⅓ हिस्सा व शेत सर्वे नंबर ९२ याचे खातें नामा वल्लद देवजी धामनकर यांचे नांवें असून यांतील ½ हिस्सा सदरहू शेतांतील माझे मालकीचें हिस्से माझे कबज्यांत असून मीच उपभोग घेत आहे. असें असतांही माझे ऐकण्यांत आहे, कीं, माझी गंधर्वीचा बायको ठमी हिनें मला न विचारता माझे पश्चात् व तिला कांहींएक हक्क नसतां तुमचे व तुमच्या सारख्या इतर लोकांच्या नादीं लागून माझे जिंदगीची खराबी करण्याच्या उद्देशानें व मला अडचणींत व खर्चांत पाडण्या साठीं सदरहू शेतांतील हिस्से दुसऱ्यास लिहून दिल्याचें ऐकत आहे. तरी या नोटीशीनें तुह्मांस व इतर लोकांस स्पष्ट कळविलें जातें कीं, जर आपण सदर्हू शेतांतील हिस्से तिचे पासून खरेदी अगर गहाण घेतले असतील अगर घ्याल अगर सदरहू हिश्यां संबधानें कांहीं करार करून घेतले असल्यास अगर घ्याल, व ज्या योगानें मांझे मालकीस, ताब्यास, अगर उपभोगांस बाध येईल अशा प्रकारची तिचे कडून कारवाई करून घेतली असल्यास अगर घेण्याचा विचार असल्यास तीं सर्व कारवाई अगर लेख, अगर करार, रद्द, बेकायदेशीर व बातल आहेत. माझे कबज्यात आपण बाध आणल्यास अगर अडथळा आणल्यास मी आपणावर कायदेशीर काम चालवीन. व या नोटीसीचा खर्च ही आपणा पासून भरून घेईन. सदरहू माझी गंधर्वाची बायको नामे ठमी ही मजजवळ राहत नसून दुसऱ्याचें फूसीनें तुमचे घरी राहत आहे तरी तिचे खाण्याबद्दल अगर दुसरे कोणतेही कामानिमित्त तिजला कर्ज दिल्यास त्या बद्दल मी जबाबदार नाहीं. तिनें खुशालीनें मजजवळ येऊन मी ज्याप्रमाणें उदर निर्वाह करितो त्या प्रमाणें मजबरोबर निर्वाह करावा कळावे ही नोटीस तारीख ३।५।९७ इसवी.

सही

खंडु वल्लद रामजी माळी राहणार खेर्डे तालुके खामगांव जिल्हे आकोले

नि॥ हातची खुद्द

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास.................... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस ......... ८१ ८६
दुसरे खेपेस ........... ८१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

Annual in arrears 7 „ 1 Rs. 8 as
Six monthly......... 3 ...... ... ...„ 8 as
Single copy ............... ......... 4 as

Advertisement.
Below 10 lines ... 2 R
Per line over 10 ... 4 as
Repetition Per line ... 2 as

VOL XXXI AKOLA MONDAY 24 MAY 1897 NO 20

वर्ष ३१ आकोला सोमवार तारीख २४ माहे मे सन १८९७ इ० अंक २०

## जाहिरात

### मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक.

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवाअधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोरुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।९६. } R. Aitken
Agent

She was a phantom of delight
When first she gleam'd upon my sight;
A lovely apparition, sent
To be a moment's ornament;
Her eyes as stars of twilight fair;
Like Twilight's too, her dusky hair;
But all things else about her drawn
From May time and the cheerful dawn
A dancing shape, an image gay,
To haunt, to startle, and waylay.
I saw her upon nearer view,
A spirit, yet a woman too!
Her household motions light and free,
And steps of virgin—liberty;
A countenance in which did meet
Sweet records, promises as sweet;
A creature not too bright or good
For human nature's daily food,
For transient sorrow, simple wiles,
Praise, blame, love, kisses, tears, and smiles.
And now I see with eye serene
The very pulse of the machine;
A being breathing thoughtful breath,
A traveller between life and death:
The reason firm, the temperate will,
Endurance, foresight, strength, and skill;
A perfect woman, nobly plann'd
To warn, to comfort, and command;
And yet a Spirit still, and bright
With something of an angel-light.

Wordsworth.

प्रथमचि जयि आली दृक्पथीं माझिया ती ।
वरतनु गमली हो मोद-सर्वस्व-पूर्णी ॥
क्षणभरि सुखवाया अप्सरा सौख्य-दात्री ।
महिवरि फिरते या, काय वा चारुगात्री ॥ १ ॥
नयन रुचिर संध्या तारका कांति भासे ।
कचनिचयहि संध्याध्वांत- कालद्युतीसे ॥
अवयव सुषमा जी या विणें ती वसंत ॥
दिवसमुख सखीची शोभवी फार कांत ॥ २ ॥
गजगति पद चाली, वृत्ति उल्हास खाणी।
समद युवतीची या वाटत हो शिराणी
सकृदपि जर येई दृक्पथीं- मानवासी ।
दचकवि असकृत् ये मानसी राजहंसी ॥ ३ ॥
प्रथम सुरवधूसी वाटली सूक्ष्मनेत्रा ।
मग मज मनुजाची आत्मजा ही पवित्रा ।
कृति निखिल तयेची रम्य निर्व्याज साधी ।
अझुनि न जडलींसे बंधनोद्भूत आधी ॥ ४ ॥
निरखुनि मधुरास्या वाटते शुद्ध भावें ।
शिशुपण सखिनें या वेचिलें; ही स्वभावें ॥
पुढति पतिसुखाला दक्ष होईल कन्या ।
प्रसवलि हिजला जी माउली तीच धन्या ॥ ५ ॥
नहि मनुज सुखाही योग्य लावण्य खाणी ।
वितथ नच मला हे वाटती सत्य वाणी ।
सुख असुखहि दोष प्रेम निंदा स्तुतीला ।
वरतनु मज वाटे योग्य ही सत्वशीला ॥ ६ ॥
खचित अनुभवांतीं गोष्ट हे सिद्ध झाली ।
प्रणयरस शलाका आजि नेत्रासि आली ।
कुमति न शिवेते त्या स्वामिंही अंगनेला ।
जनन मरण मध्यें अध्वगा शुद्धबाला ॥ ७ ॥
दृढतर मति रामा संयताकांक्ष वृत्ती ।
चतुर सबल साधी दूरदर्शित्व चित्तीं ।
भवशकट हकारी रंजवी खिन्नचेता ।
परिहरण करी हे माझिया गूढचिंता ॥ ८ ॥
वरतनु चतुरास्ये वेचुनी बुद्धि सारी ।
त्रिभुवनिं निरवद्या निर्मिली काय नारी ।
निरखुनि सखिच्या या दिव्यतेजापगेला ।
खचितचि सुरनारी वाटते मन्मनाला ॥ ९ ॥

## सामाजिक सुधारणा

मा. अं. व. समाप्त.

बालविवाहाची चाल आमच्यांत जरी अगदींच मोडली गेली नाहीं तरी अशा विवाहांचें वय प्रस्तुतच्या स्थितींत वाढविणें जितकें शक्य आहे तितकें तें वाढलें आहे. ह्मणजे ११ वर्षां पासून तों १३ वर्षां पर्यंत मुली बहुशः सर्व ठिकाणीं अविवाहित ठेवल्या जातात. ही गोष्ट अभिनंदन करण्या सारखी आहे.

स्त्री शिक्षणीं संबंधानें विचार करितां वऱ्हाडांत अशी कोणती ही मुलगी सांपत सांपडावयाची नाहीं कीं जी शाळेंत गेली नाहीं अथवा जिला लिहिणें वाचणें येत नाहीं. उच्च प्रतीचें शिक्षण मिळण्याची सोय वऱ्हाडांत नसल्यानें आमच्यांतील मुलीस उच्च शिक्षण मिळत नाहीं. ज्या ठिकाणीं अशी सोय आहे अशा इतर प्रांतांत कांहीं मुलींस हें उच्चप्रतीचें शिक्षण मिळालें आहे आमच्यांतील मुलींच्या लग्नाच्या वयाची हैयत्ता वाढली असल्यामुळेंच असा शिक्षणाचा फैलाव आमच्या जातींत होणें शक्य झालें आहे. ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

चालू सालीं वऱ्हाड प्रांतांत ज्या गांवीं जातीची दहा पेक्षां जास्त कुटुंबें असतील त्या गांवीं त्याची एक पोटसभा स्थापन झाली आहे आणि ज्या गांवीं दहा पेक्षां कमी कुटुंबें असतील त्यांनीं आपल्या नजीकच्या पोटसभांचा संबंध कोकणांत "जी सर्व जातीची "चांद्रसेनी कायस्थ प्रभू समाजोन्नती परिषद" नांवाची सभा आहे तिच्याशी जोडलेला आहे. ह्या मोठ्या सभेची पहिली बैठक नाशीक येथें सन १८९२ साली झाली होती. तिची दुसरी बैठक सन १८९६ साली कल्याण येथें होऊन ती आतां प्रत्येक वर्षी भरण्याचें ठरलें असून तिला आतां व्यवस्थित स्वरूप आलें आहे

ह्या सभेचें उद्देश फार माफक आहेत. तिनें हाती घेतलेले विषय नुकताच तिचा जन्म झाल्यानें पचन होतील अशाच तऱ्हेचें आहेत ते थोडक्यांत मुख्य मुख्य आपणास सांगतों.

१ हुंड्याची घातुक चाल बंद करणें.

२ लग्न कार्यांत व इतर वेळीं व्यर्थ खर्च होतो तो बंद करणें.

३ जातींत शिक्षणप्रसार होण्याकरितां फंड गोळा करणें. हा फंड प्रत्येक लग्नाबद्दल वधुपक्षाकडून १ रुपया व वर पक्षाकडून २ रुपये आणि प्रत्येक मुंजीबद्दल १ रुपया व प्रत्येक कुटुंबाचे वर्षाचे प्राप्तीवर दरसाल दर शेंकडा १ रुपया प्रमाणें घेणें. वगैरे अशा रीतीनें फंड गोळा करून जातीतील गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करणें. प्रत्येक पोट सभेंत अशा रीतीनें जें उत्पन्न होईल तें त्या पोट सभेनें शिक्षणाचे कामीं आपले हद्दींत खर्च करावेत; त्या प्रत्येक पोट सभेंत अध्यक्ष, सेक्रेटरी, खजीनदार, वगैरे अधिकाऱ्यांच्या नेमणुकी झालेल्या आहेत. सेक्रेटरीच्या इतर कामापैकींच त्यांचे हद्दींतील मुलांचे शिक्षणावर व वर्तनावर नजर ठेवणें हें एक काम होय.

उच्च प्रतीच्या शिक्षणाची सोय वऱ्हाडांत नसल्यानें येथील मुलांची व प्रांता बाहेरील जेथें उच्च प्रतीचें शिक्षण मिळण्याची सोय नसेल अशा मुलांची कांहीं सोय व्हावी ह्या हेतूनें एक वेगळा स्वतंत्र पयत्न हल्लीं चालू आहे ह्या प्रयत्नास वऱ्हाडांतील बऱ्याच लोकांची संमती आहे व ते ह्या प्रयत्नास आपला हातभार लावितील. ह्या संबंधानें पेण येथील पसिद्ध गृहस्थ रावसाहेब विनायक शिवराम धारकर यांनीं पुढाकार घेतला आहे आणि पुणें येथें अशा मुलांचे सोयीसाठीं "बोर्डिंग हाउस" काढण्याचे कामीं २००० रुपेय दान करण्याचा त्यांनीं संकल्प सोडिला आहे.

ह्या सर्व गोष्टींचा विचार करितां सामाजिक सुधारणे संबंधीं हल्लीं आमच्यांत योग्य दिशेनें आस्ते आस्ते कां होईना पण सुधारणेचा मार्ग शाश्वत रीतीनें क्रमण्याचें अभिनंदनीय प्रयत्न होत आहेत हें दिसून येईल आणि आपल्या देशाची सामाजिक सुधारणा झाली पाहिजे अशी ज्यास इच्छा असेल त्यांना यापासून आनंद झाल्या वांचून राहणार नाहीं.

आपणा सर्वांपुढें आमच्या जातींतील होत असलेल्या सामाजिक सुधारणेंचें स्वरूप होईल तितकें थोडक्यांत सांगितलें आहे.

अशा सामाजिक सुधारणेंचे कामीं ईश्वरानें आह्मास यश द्यावें आणि आमच्या देशाची सांप्रत जी अवनती झाली ती ह्या योगें दूर होऊन आमच्या देशाचें गेलेलें नांव त्यास पुन्हा मिळावें अशा बद्दल प्रार्थना करून मी आपला लेख आटपतों.

## वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ८ शके १८१९

वऱ्हाड प्रांतात अशी वहिवाट आहे कीं शेतीचा माल विकण्यासाठीं सरकारानें बाजार स्थापित करावे, त्यांची स्वच्छता व व्यवस्था ठेवावी, कांहीं कर बसवून ते गोळा करवावे व त्यांचा योग्य खर्च करावा आणि ही वहिवाट चालू ठेवणें लोकांस हितावह आहे ह्मणून गव्हरनर जनरल इन कौन्सिल यांनीं परकी मुलुखा संबंधानें कायदे करण्याच्या आपल्या अधिकारा खालीं एक कायदा केला आहे. या कायद्याचें नांव वऱ्हाड कापूस बाजार व धान्य बाजार असें ठेवण्यांत आलें आहे. बऱ्याच वर्षांपासून हा कायदा करण्याचें वाटत होतें आणि पुष्कळ भवति न भवति होऊन अखेरीस सर्व वादाचा जो निष्कर्ष तो कायद्याच्या रूपानें लोकदृष्टी समोर प्रथमच ग्याझेट आफ इंडियाच्या तारीख ८ मेच्या अंकांतून येत आहे. वऱ्हाडाला जे कायदे लागू करितात त्यांचे खर्डे प्रथम लोकांच्या विचारा साठीं कधींच मांडण्यांत येत नाहींत. स्थानिक सरकार आपापल्या अधिकारी मंडळीतून

विचारपूस करितात पण सार्वजनिक सभे सारख्या संस्थांच्या द्वारानें लोकमताची पाहणी करीत नाहींत ही गोष्ट चांगली नाहीं. वऱ्हाडांत लोकमताला प्राबल्य किंवा मानपान बिलकूल नाहीं. स्थानिक सरकार ही स्थिती सुधारण्या विषयीं कांहीं योजना करील तर खरोखर नामी होईल. हल्लीं जो बाजारा संबंधानें कायदा करण्यांत आला आहे तो बरा किंवा वाईट आहे अशा विषयीं शेरा ठोकण्याचा आमचा विचार नाहीं. असा शेरा सांप्रत व्यवस्थेला अगदीं कुचकामाचा आहे आणि हा नवा कायदा लोकांस सुखावह होईल अशी इच्छा प्रदर्शित करून त्यांतील महत्वाच्या बाबी आह्मी खालीं देत आहों:—

आलिशान रेसिडेन्ट सरकारो, मुनसिपल किंवा जिल्हा बोर्डाच्या जागेंत शेतीच्या सर्व मालाच्या किंवा विशिष्ट प्रकारच्या मालाच्या विक्रीसाठीं बाजार स्थापित करितील आणि निराळी मंजुरात घेतल्या शिवाय अशा बाजारा खेरीज अन्य बाजार पांच मैलांच्या टापूंत घालतां येणार नाहीं. नवीन बाजार स्थापणाऱ्यांस किंवा मंजुरांतींतील अटी मोडणाऱ्यास पन्नास रुपये पर्यंत दंड होईल आणि असें गैरकायदा वर्तन पुढें चालविल्यास दर दिवसास पांच रुपये पर्यंत दंड होईल.

बाजाराची व्यवस्था, कर बसविणें, दलाल, तोल घेणारे व मापारी यांस फी घेऊन परवाने देणें, वजनें मापें, तराजूं वगैरे मुक्रर करणें, तपासणें, इत्यादि, आणि बाजारच्या व्यवस्थापक मंडळीला मार्ग दर्शविणें या संबंधानें आलिशान रेसिडेन्ट नियम प्रसिद्ध करतील आणि नियम मोडणाऱ्यास ५० रुपये पर्यंत दंड व पुढें तसाच मोडल्यास दर दिवशीं पांच रुपये पर्यंत दंड द्यावा लागेल.

जें कराचें उत्पन्न होईल त्यांतून खर्च बाजाराच्या व्यवस्थेकडे, इमारतीकडे व स्वच्छतेकडे केल्या नंतर राहिलेली शिल्लक मुनिसिपालिटीस किंवा जिल्हा बोर्डास देण्यांत येईल.

नमुन्या प्रमाणें माल निघाला नाहीं किंवा नियमित ठरावा प्रमाणें माल नसला, किंवा कापसाच्या गठ्याच्या बारदानाचें वजन १० पौंडापेक्षां अधिक भरलें किंवा इतर पदार्थांची भेसळ असली तर मालामध्यें जी कटती ह्मणून कापून घेतली जाईल ती कायद्याला संमत आहे पण या शिवाय इतर कोणतीही व्यापारांतली कटती बाजारांत कबूल केली जाणार नाहीं आणि दिवाणी कोर्टांतून या कटतीला अनुकूळ अशी व्यापाराची वहिवाट किंवा मामुलीहक्क हीं ऐकिलीं जाणार नाहींत. बाजारांत नमुन्याच्या मालाची किंमत द्यावी लागेल आणि दिवाणी कोर्टांतून या किंमती देवविण्याला प्रतिबाधक चाल किंवा पद्धत ऐकिली जाणार नाहीं. कापसाचें वजन बारदाना समेत केलें जाईल पण मालधन्यावर बारदानाचें वजन दहा पौंडा पेक्षां अधीक न ठेवण्या विषयीं जबाबदारी आहे.

सर्व प्रकारच्या फीचे पैसे माजिस्त्रेटानें केलेल्या दंडा प्रमाणें वसूल करण्यांत येतील. नवीन स्थापित केलेल्या बाजारांतून जुना बाजारेससचा कर रद्द करण्यांत आला आहे.

मि. दादाभाई नवरोजी यांनीं रायल कमिशन पुढें जी साक्ष दिली ती फार महत्वाची आहे. यांच्या साक्षींत इंडिया विषयीं राजकीय मतें अगदीं स्पष्टतेनें कळविलीं आहेत. या देशाला जो अपकर्षाचा काल येत आहे त्याचीं वास्तविक कारणें त्यांनीं फार दूरदृष्टीनें व मुत्सदीपणानें दर्शविलीं आहेत. हल्लींच्या इंग्रजी राज्यकारभारामध्यें नेटिवा संबधानें जो परकीपणा कायम केला आहे, आणि जीं चुकीचीं तत्वें मुळाशीं पक्कीं झालीं आहेत त्यांच्या मुळें शहाणपणा, काम, व संपत्ति या त्रिकुटीला इंडियन लोक परकी बनले आहेत. त्यांची कर्तबगारी, मुत्सदीपणा व धुरंधरपणा हीं नष्टप्राय झालेलीं आहेत त्यांच्या गुणाला कोठेंच मोल राहिलें नाहीं. सर्वत्र राज्यकारभाराच्या बाबदींत त्यांस दडपून व कोंडून ठेवण्याचा परिणाम फळाला आला आहे. राज्यकारभारांत त्यांचा फारसा शिरकाव नाहीं आणि तद्विषयक गोष्टी विषयीं ते अगदीं नवखे आहेत. राज्यकारभाराच्या मिषानें सर्व देशाची संपत्ति विलायतेस जात आहे आणि अर्थातच इंडियन लोक संपत्तिहीन, परवश, व मृतप्राय होत चालले आहेत. या मुद्या संबंधानें प्रोफेसर गोपाळ कृष्ण गोखले यांच्या साक्षींत देखील फार नामी खुलासा होऊन दोषदर्शन मोठ्या जोराचें व खुबीचें झालें आहे. ते ह्मणाले कीं:— परकीय अंमलामुळें अवाढव्य खर्च होतो एवढेंच दुःख नाहीं तर त्यापासून दुसरा एक मोठा अनर्थ होत आहे. हा अनर्थ लोकांच्या नीतीवर घडत आहे आणि तो अधीक भयंकर आहे. सांप्रतच्या राज्यकारभारामध्यें इंडियन लोकांची वाढ खुंटविली आहे आणि त्यांस खुजे करून सोडलें आहे. आह्मी आपलीं सर्व आयुष्यें नीचतेच्या व खालच्या वातावणांत कंठलीं पाहिजेत. आणि आह्मांपैकीं जो श्रेष्ट व उच्चतम होईल त्यानें आपली मान वांकवून सांप्रतच्या राज्यकारभारामध्यें अधोमुख राहिलें पाहिजे. जी उत्क्रमपणाची प्रेरणा इंग्लंडच्या सामान्य शाळेंतील मुलांत देखील महत्वाकांक्षा प्रचलित करिते तिजमुळें त्याला वाटतें कीं आपण एक दिवस आपल्या देशाचे ग्लाडस्टन, नेलसन किंवा वेलिंगटन बनूं आणि त्यामुळें आपल्या सर्व उत्कृष्ठ गुणांचा विकास व विजय होईल. पण ही प्रेरणा आमच्या इंडियनांच्या मनांत खेळता कामा नये. आमच्या मध्यें मर्दुमकीची जी मुसमुशी आहे तिची पूर्ण वाढ होतच नाहीं आणि हल्लींच्या राज्यव्यवस्थे खालीं आह्मी आपल्या पूर्ण उंचीला देखील पोचत नाहीं. प्रत्येक स्वराज्याच्या राष्ट्रांत जी नैतिक उन्नती वास करिते ती आह्मा लोकामध्यें बिलकूल असूं शकत नाहीं. आमची राज्यकारभारातली कर्तृत्वशक्ती आणि लष्करी लढवय्येपणाची आमची मनःप्रवृत्ती हीं निव्वळ निरुपयोगामुळें गंजून गंजून अस्त पावतील आणि अखेरीस परिणाम असा होईल कीं आह्मी आपल्या देशांत लांकूड तोडे व पाणके कायमचे बनूं. हे विचार फार प्रगल्भ व वस्तुस्थितीला धरून असून अपकर्षाचीं खरीं कारणें फार खुबीनें कळवितात. इंडियनांवर गुलामगिरीचा व्यापार आमचे राज्यकर्ते करीत असतात. हा व्यापार अक्कलेचा, बनियेशाहीचा व मुत्सदीपणाचा आहे खरा पण तो पूर्वींच्या ढळढळीत गुलामगिरीपेक्षां फार घातुक व प्रलयकारक आहे. रोमन लोकांस गुलाम ह्मणजे धनोत्पादक वस्तु वाटत असे आणि ते त्याप्रमाणें गुलामांचा उपयोग करीत असत हा प्रकार इंडिया संबंधानें व इंडियन लोका संबंधानें नाहीं असें कोणता सूज्ञ ह्मणेल बरें!

## शेतकऱ्यांस मदत

दुष्काळा मुळें सर्व वित्त संपलें, चाऱ्याच्या महर्गतेमुळें गुरेढोरें पांगलीं, आणि आतां येत्या पावसाळ्याच्या आरंभीं शेतकऱ्यांपाशी पुढील सालच्या व्यवस्थेची कांहींच सामुग्री नाहीं. हल्लींच्या दुष्काळा पेक्षां भावी दिवस मोठे कठीण आहेत. पावसामुळें काम धंदा कमी होईल, शेतकामाला स्वतांची ताकद नाहीं व तें करण्याला साधनें नाहींत अशा वेळीं सरकारानें आपल्या प्रजेच्या प्राणरक्षणार्थ मोठी खटपट केली पाहिजे. साधारणपणें, सरकारानें सावकारीची दुकानदारी घातली पाहिजे आणि या दुकानदारींत तोटा येईल अशा समजुतीनें ही गोष्ट केली पाहिजे. तगाईचा पैसा देतात त्या धर्तीवर सरकारांतून रयतेला गुरेढोरें विकत, भाड्यानें किंवा उसनवारीनें मिळालीं पाहिजेत. पेरणीला बियाचा पुरवठा तसाच केला पाहिजे, आणि शेती पिकेपर्यंत कांहीं धान्याची तगाई शेतकऱ्यांस मिळाली पाहिजे. अशा कार्याकडे दुष्काळफंडाचा उपयोग व्हावा अशी मूळ फंड उभारण्यांत योजना केली आहे. पण हा धर्मफंड मोठा नाहीं आणि त्याचा तसा उपयोग होण्यापूर्वीं दुसऱ्या आवश्यक गोष्टी पुष्कळ व्हावयाच्या आहेत. सरकारानें शेतकऱ्यासाठीं दुष्काळतगाई म्हणून निराळा फंड काढून त्या प्रमाणें व्यवस्था केली पाहिजे. आणि अशी व्यवस्था होईल तरच गरीब शेतकऱ्यांस पुढील सुगीचा दिवस उगवेल, नाहीं तर, त्यांची स्थिती मोठी शोचनीय आहे. वऱ्हाड प्रांता संबंधानें वरील व्यवस्था करण्यास स्थानिक सरकारास कांहींच नड असूं नये. या प्रांताची जी ५०।६० लाखाची शिल्लक इंडिया सरकारापाशीं आहे तिचा उपयोग अशा वेळीं झाला नाहीं तर पुन्हां कधींच अशी वेळ येणार नाहीं. ज्या प्रजारूप कामधेनूवर राज्यकर्त्यांनीं किर्ती व विजय मिळविला त्या कामधेनूची अशा संकटवेळीं अवहेलना होणार नाहीं व तिची मरणासन्नता टळून ती सुखी, चिरायुषी व पयस्त्रावी होईल अशी आह्मी उमेद बाळगतो.

---

सरकारी कामावर जशी दुष्काळपीडितांस मदत मिळावी तशी मिळत नाहीं. काम फार कडकपणानें घेतात, आणि प्रखर उन्हामुळें, कमताकतपणामुळें व अशा कठीण कामाची संवय नसल्यामुळें लोकांस कामें सोडून द्यावीं लागतात आणि उपासमाऱ्यांत मरणाची वाट जवळ जवळ करीत बसावें लागतें. दुष्काळानें पोटांत आग पडतें, पोटभर खाण्यास मिळून देखील भूक शांत होत नाहीं, आणि तशांत सरकारी कामावर पोट भागेनासें झालें ह्मणजे लोकांच्या दुःखसमुद्राला खरोखर पारावरच नाहीं. सरकारी कंगालखाने नांवाला आहेत पण तेथें पुष्कळ लोक काल्पनिक व अन्य अडचणीमुळें जात देखील नाहींत एकंदरानें, सरकारी दुष्काळ कामें व कंगालखानें हीं चांगलीं चालण्यास सरकारी अधिकारी मोठे दीलदार, दयाळू व मनमिळाऊ पाहिजेत आमच्या जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनीं या वरील अडचणी पुष्कळ भागविल्या आहेत. मि. प्रीडो आदिकरून अधिकाऱ्यांनीं फार नामी व्यवस्था चालविली आहे आणि आमची खात्री आहे कीं सरकारी व्यवस्था पावसाळ्यांतही चालूं ठेवण्या विषयीं मोठी खबरदारी एव्हां पासूनच घेतली जाईल.

---

आमच्या जिल्ह्यांत धर्मफंडाचा सद्व्यय होतो तो फार वर्णनीय आहे. या धर्मफंडाच्या व्यवस्थापक मंडळींतील प्रत्येक गृहस्थ सरकारी मदत न घेणाऱ्या आणि लाचारीच्या जाळ्यांत सांपडलेल्या इसमांस मदत करण्या कडे रात्रंदिवस खटपट करीत असतो ही मदत यथायोग्य पोंचविण्या विषयीं भगीरथ प्रयत्न चालूं आहेत. कित्येकांस संपूर्ण शिधासामुग्री पोंचवितात, कित्येकांस घरखर्चाच्या मानानें कमी भावानें धान्य विकतात आणि कित्येकांस कांहीं धान्य एकदम पोंचवितात. आमची सर्व लोकांस विनंती आहे कीं या धर्मफंडाच्या सदुपयोगा साठीं प्रत्येक सुखवस्तू मनुष्यानें व्यवस्थापक मंडळीस माहितीच्या द्वारानें मदत केली पाहिजे आणि खरोखर ज्या लोकांस या फंडांतून कांहीं मदत मिळाली पाहिजे त्यांचीं नांवें व्यवस्थापक मंडळीच्या नजरेस आणण्या विषयीं आळस करिता कामा नये. प्रत्यक्ष दान करण्या इतकें महापुण्य नाडलेल्या मनुष्यास मार्गीं लावण्यामध्यें आहे आणि व्यवस्थापक मंडळीलाही अशा माहितीनें आपलें काम करण्यास चांगला जोर येईल.

---

## The Berar Samachar

MONDAY MAY
24 1897

The Settlement department in Berar is fast pushing its operations in the matter of reassessing the rent at a highly prohibitive rate per acre. The argument that people do not return their fields to the Government falls to the ground when we take into consideration that there is no employment for the labour of the rayots. Agriculture is the only industry of old renown. It is still the *privileged* profession of the masses of the people. There is no other work wherein people can turn their labour to advantage. It is better to live somehow upon the old agriculture than to waste time and lose the only means of livelihood. The new rent goes uppermost and is greater than is reasonable. In the view of the Resident expressed in the Administration-Report of some two years back, the solid test of a prohibitive Government demand is the release of the occupancy—rights by the holders of land. But this test cannot apply to this province in her present economic condition. For want of some other employment people stick to their old holdings but the fact is patent that the people are not well off, fall an easy prey to drought and famine, and can hardly tide over the evils of one bad season. The present famine ought to furnish the Settlement Department with an object lesson of the perverse and deplorable effects of the present policy of assessing the state—demand. The position of the state is quite changed. The Government is the

greatest land—lord. It trades in land and leases it out for 10, 20, or 30 years just as it suits the conveniences of the greatest land-lord. Assessments are ever changing and the Government is making a high profit out of the necessitous condition of the masses. The policy regulating the land—revenue is undergone a sorry change in principles and, if it continues a long time, it will shaken the very safety and stability of a government. In this province, the new assessments are most crushing and have made agriculture an uncertain and losing concern. The rates of sub—letting lands are almost changed. People have sad experiences of the recent years and do not offer high sums for sub—leases. Unless a new field of industry opens for the labour of the masses, people will strictly adhere to agriculture but the industry of agriculture will be stunted in growth and will not receive a new stimulus to a further progress and improvement. The Government will realize the unpleasant result that peasantry will die out gradually and it will be then no time to mend matters. The rack—rent is the order of the Settlement Department, and we declaim this policy with the greatest possible deference to the opinion of the Government.

If foreign agency is ruinous to a nation it is much more so in this province. Berar is under a double form of Government. It has to pay a high royalty in addition to the extremely expensive administration of the paramount power. In India, no parallel is found to the large and extensive expenses of administering a small province like Berar. The old land—revenue was quite enough for these extravagant demands; but the lust of revenue is not satisfied. People are now taxed with enhanced rents beyond the utmost point of their ability to pay taxes. The result of such a policy must soon be foretold. It is an utter breakdown of the common—weal and we need not detail the numerous evils that are looming in such an imminent disaster Sir W. Wedderburn has contributed an able article on the present rack—rent to the last number of *India*. He quotes an old despatch of 1856 to show that:—

"The right of Government is not a rent which consists of all the surplus produce after paying the cost of cultivation, and the profits of agricultural stock, but a land revenue only, which ought if possible, to be so lightly assessed as to leave a surplus or rent to the occupier, whether he, in fact, let the land to others or retain it in his own hands."

Let this policy be honoured with the real significance of a guiding principle and we hope we shall not have a chance to complain of the misdoings of the Settlement Department.

---

Indian witnesses before the Royal Commission have achieved a success unique in the history of this Nation. Their evidence goes to explain the bad side of the British rule as well as the good one. It practically propounds the main l[illegible]sons of the political history of the larg[illegible] nations of the past and the present that unless the *foreign* nature of the English rule be removed and that unless an Indian is treated just like a Britisher on the common bonds of humanity and the common level of being the subject of Her Majesty the Queen Empress the Indians will not from themselves into one nationality as the soundest glory of the British Raj. The political bleeding is in short the evil of India. Professor Gokhale thus explains the arbitray and bureaucratic position of the Secretary of State:—

"The whole position may be summed up thus:—(1) The buffer of the Company's Government which fairly protected Indian interests is gone, and there is no effectual substitute. (2) We have no effective constitutional safeguards against the misapplication of our revenues for exta—Indian requirements. (3). The control vested in the Council of the Secretaay of State under the Statute of 1858 is rendered almost nugatory by the alternation of its status under recent amending Acts. (4) The control of Parliament, as against the Secretary of State, has become entirely nominal, owing to the latter being a Member of the imperial Executive with a standing majority behind him."

---

## वऱ्हाड

हवामान—हवेंत बदल विशेप आहे. उष्णतेची वाढ ११३ अंशापर्यंत होते. वारा चांगला सुटतो. आकाशांत ढग पुष्कळ येतात. गुरांचा चारा फार दुर्मिळ आहे. पाण्याची हाकाटी बहुत ठिकाणची आहे. किरकोळ रोगराईचा तडाखा चालूंच आहे.

वऱ्हाडांत दुष्काळ कामावर असलेल्या लोकांची तारीख १० मे पर्यंतची संख्या जिल्हेवारीनें:—

| जिल्हा | दुष्काळ कामावर | फुकट अन्नदानाकडे |
|---|---|---|
| आकोला | ९२४१ | १०७० |
| उमरावती | ४७०० | १४२१ |
| वाशीम | ३३१२ | १२५४ |
| बुलढाणा | २७०६ | |
| इलिचपूर | १९७५ | |
| वणी | ६२२ | |
| | २२५५६ | ३७४६ |

तारीख ३० जानेवारी पासून ८ मे पर्यंत वऱ्हाडांत रेलवेनें २३३०० मण धान्य बाहेरून आलें आणि या प्रांतांतून १९०० मण धान्य बाहेर गेलें. या साला सारखे धान्य बाहेरून पूर्वी कधींच आलें नाहीं!

आजचा सोमवारचा दिवस चक्रवर्तिनी महाराणी सरकारच्या वाढदिवसा निमित्त सार्वजनिक सणाचा समजला जाईल. दुष्काळपीडितां साठीं अन्नसंतर्पण महाराणी सरकार करितील तर तो खरा सणाचा दिवस होईल.

मि. आर. एम. वुलियमसन असिस्टंट कानसरव्हेटर यांस मार्च २४ वे तारखे पासून आफि. डेपुटी कानसरव्हेटर वर्ग ४ ची बढती देण्यांत आली.

अकोला जिल्हा बोर्डात ८ सभासद कमी झाले होते त्यांच्या जागीं निवडलेल्या सभासदांचीं नांवें:—रा. रा.

तुकाराम उदेभान, जगदेव भूताजी, जानराव नंदाजी, किसन चंद्रभान, नारायण रामचंद्र, आनंदराव आंबादास, इष्णाजी ममटाजी, व मुकुंदराव अमनलिंग.

उमरावती जिल्हा बोर्डांत ११ सभासदांच्या जागा रिकाम्या होत्या त्या निवडणूकींत बहुमतानें खालील गृहस्थांनीं भरल्या:—

रा. रा.

रामराव बाजीराव, केशव खुशाल, पुंडलिक रघुनाथ, कृष्णाजी लक्ष्मण, मीर यवार अल्ली, रुस्तुमराव गणेशराव, रामराव अमृतराव, बकाराम रायमलजी, मंगणीराम रामलाल, कृष्णराव शाबाजी, व धोंडो मोरेश्वर.

आकोला मुनासिपालिटींतील सभासद क्याप्टन आयव्हर्स यांची शिकंदराबादेस बदली झाल्या मुळें त्यांच्या जागीं मि. शेख इस्मायल एकस्ट्रा असि. कामिशनर यांस सभासद नेमण्यांत आलें.

रा. रा. रामराव गोविंद नायब तहशालेदार यांस दुष्काळ कामावर नेमिल्या मुळें त्यांच्या जागीं केळापूरास रा. रा. गोविंदरावजी नेटीव आकौंटंट यवतमाळ यांस नेमिलें.

या प्रांतीं गेल्या मार्च महिन्यांत १०८९८ मनुष्यें जन्मलीं त्या पैकीं ५६११ मुलगे व ५२८७ मुली होत्या, आणि ५६८२ मनुष्यें मरण पावलीं. ही मरणाची संख्या इतकी लहान आहे कीं अशी पूर्वीं कधींच या महिन्यांत नव्हती.

आलेगांवच्या दोन मारवाड्यांनीं परवान्या शिवाय फटाके विकले ह्मणून ते पोलिसाच्या कचाट्यांत आले त्यांनीं. पोलिस अधिकाऱ्यांस ५ रुपये लांच दिला. या लांचाच्या प्रकरणांत त्यांनीं कबूली जबाबांत दुसऱ्याच्या सांगण्यावरून लांचाचे रुपये देण्यास काढले असें सांगितलें. मे. अजीजुद्दीन साहेब माजिस्ट्रेट हे सत्यप्रिय आहेत त्यांनीं आरोपिची संकटवेळां लक्षयांत आणून दयार्द्रतेनें ५० रुपये दंडावर त्यांस सोडलें.

---

मोर्शी, तारीख १९।५।९७

हालहवाल— दोन चार दिवसां पासून आकाश अभ्राच्छादित असतें, त्या मुळें उष्णता फारशी भासत नाहीं. पण गरमी फा होते. रविवारीं सायंकाळीं पांचचे सुमारास पाऊस पडल्यामुळें, थोडा वेळ उष्मा कमी भासत होता. उष्णतेनें तीव्र स्वरूप धारण केल्यामुळें व अन्नाच्या मह्रागाईमुळें पटापट लोक मरतात. आसपास, पाळ, लोणी, हुसंगाबाद व येथें देखील महामारीचा रोग सुरूं आहे अन्नाची ददात व त्यांत हा भयंकर कहर या मुळें लोकांचीं मनें हवालदील जालीं आहेत यात नवल तें काय? कर्ता हर्ता प्रभु आहे. आपले मानवाचे काळजीनें काय होणार? मृग जवळ आला आहे. शेतकीचीं कामें जारीनें सुरूं असावींत पण शेतकऱ्यांत बिलकूल यंदा त्राण राहिला नाहीं. गुरांना बिलकूल चारा मिळत नाहीं. एका कडब्याच्या पेंडीस सहा पैसे द्यावे लागतात. जसा धान्याचा भाव यंदा वाढत्या प्रमाणावर आहे त्याच प्रमाणें वैरणचाही भाव वाढत्या प्रमाणावर आहे.

यंदा शेतकऱ्यांना आपले पोटाचीच फक्त चिंता नाहीं तर शेतकीचे मुख्य साधन जे बैल त्यांचे संबंधानेंही फार काळजी आहे याचें मुख्य कारण वैरणीची उणीव होय. ढोरांना जंगलांत बिलकूल चारा मिळत नाहीं. कित्येक शेतकरी नाइलाजास्तव व कसें तरी करून प्राण रक्षावे ह्मणून गुरांना पिंपळाचा पाला व तुराट्या खायला घालतात अशी स्थिति आहे. या वरून उदीम यंदा किती उत्तम प्रकारें झाला असेल किंवा होईल याची कल्पना सूज्ञ वाचक करतीलच. या तालुक्याच्या कांहीं भागांतून चार आणे देखील पीक आलें नाहीं. तरी बिचाऱ्या शेतकऱ्यांना सरकारी सारा देणें सुटलें; छे, नांव कशाला घेतां! दर वर्षापेक्षां यंदा सारा वसूल करण्या विषयीं रिव्हेन्युकोड मध्यें जास्तच कडक नियम आहेत. पुष्कळ लोकांनीं शेत गहाण लिहून साऱ्या कारितां कर्ज काढिलें. येणें प्रमाणें शेतकीची स्थिती आहे.

येथील अनाथ गृहें— अनाथ गृहांत सरासरी ३५० लोकांस एक वेळ जेवावयास देतात ह्मणून ऐकतों. शिरखेड व वरूड या दोन ठिकाणीं मिळून सरासरी ५०० अनाथ लोकांस जेवायास मिळतें. अनाथ गृहांतील भोजनबंधूंची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. या तिन्ही ठिकाणचे अनाथगृहांचे खर्चा करितां प्रत्येकीं पांचशें रुपयांची नेमणूक केली आहे. पडद्यांतील बायका ह्मणजे ज्या चौवां लोकांत येऊन काम करीत नाहींत. व ज्यांना महर्गते मुळें उपासमार कराव लागतात त्यांना मदत करावा या हेतूनें येथें सरकारी चावडींत प्रत्येक बायकोला अच्छेर जवारीचा आटा व मिठ मिरची डाळ वगैरे सामान मिळते. इतकी जरी व्यवस्था सरकारानें स्वतःचे व लोकांचें खर्चानें मिळून केली तरी भिकारी लोकांचा गांवातील त्रास बंद झाला नाहीं. रात्रीं बारा वाजे पर्यंत अन्नान्न करीत दारोदार भटकणारे अनाथ भिकाऱ्यांचे दीनविलाप कानीं पडतात. मित्रहो असा दिवस वैऱ्यांवर देखील पडूं नये. त्यांचे ते दीन स्वर ऐकून पाषाणहृदयी मनुष्यांचे अतःकरणास द्रव येईल तर मग इतरांचीं काय कथा? असें असून अनाथ गृहांत जशी व्यवस्था असावी तशी झाली नाहीं.

या तालुक्यांत दुष्काळा प्रित्यर्थ वर्गणी आज तारखे पर्यंत सरासरी ४००० रावर गोळा झाली व त्या पैकीं ८०० जवळ जवळ खर्चही पण शाला रोज शनिवारी मि. लुकस साहेब डे. कमीशनर यांची स्वारी येथील अनाथ गृहें तपासून, वरूड येथील अनाथ गृहें तपासण्यास गेली होती. व तेथील अनाथ गृहाची व्यवस्था पाहून सोमवारीं उमरावतीस परत गेले.

या तालुक्यांत दोन ठिकाणीं रिलीफ कॉम सुरू करण्याविषयीं मंजुरात मिळाली, पण काम जिवापाड व मजुरी बिलकूल कमी असल्यामुळें. कामावर लोक मिळाले नाहींत सबब तीं बंद आहेत असें समजतें. येथून चांदूरबाजारला जर सडक नेली तर फारच लोकांचा फायदा होईल; कारण त्या रस्त्यानें नेहमीं फार जाणारे येणाऱ्यांची गर्दी असते. करितां ती सडक तयार करण्या विषयीं सरकार मंजुरात देतील तर ह्यांनें गरीब प्रजेवर फार उपकार होतील.

आग—नुकतीच पंधरा दिवसा पूर्वीं येथें आग लागली होती, तरी काल पहाटचे चार वाजतां, वाऱ्याच्या सपाट्यांत, एका गवती घरास आग लागून त्याचा फडशा उडाला लोकांनीं पाण्याचा बेत चांगला केला. नाहीं तर बऱ्हाणपूरा सारखा भयंकर प्रसंग येण्यास कांहीं कमी नव्हतें पण ईश्वरदयेनें सर्व संकट निर्विघ्नपणें पार पडलें.

लायब्ररी—येथील जनरल लायब्ररींत नाटकांचा व कादंबऱ्यांचा फार भरणा असून शास्त्रीय विषयावर ग्रंथ फारच थोडे आहेत; तर लायब्ररी म्यानेजर कृपाकरून शास्त्रीय विषयांवरील बुकें लायब्ररी करिता बोलावतील अशी आशा आहे व तसें केल्यापासून लोकांचें फार कल्याण होईल.

---

## वर्तमानसार.

पालीठाण्याच्या ठाकूर साहेबांनीं दुष्काळा निमित्त आपल्या राज्यांतील शेतकऱ्यांस सूट दिली व सडकेचे आणि विहिरीचे कामास सुरवात केली आहे.

बंगाल्यांतील टाका जिल्ह्यांत अब्दूलपूर नांवाचा गांव आहे. त्या गांवांत चंद्रदास नांवाचा एक कायस्थ जातीचा गृहस्थ राहत आहे. याला विद्यासुंदरी नांवाची एक कुळदीपक कन्या होती. या उभयकुलभूषित कन्येचा विवाह कलकत्यास वास्तव्य करणाऱ्या वृंदावनराय नांवाच्या एका भाग्यशाली पुरुषाशीं झाला होता. प्रारब्धानुसार वृंदावनराय यांस आजार होऊन तारीख ९ एप्रिल रोजीं त्याचा देहांत समय अगदीं नजीक येऊन पोचला. विद्यासुंदरीनें आपल्या त्या प्रियपतीची देहांतावस्था पाहून इहलोकीं पतिविरहित राहून, जगास आपलें कृष्णवदन दाखविण्यापेक्षां पतिसमवेत परलोकीं अक्षय्य सौख्य भोगण्याची इच्छा धारण केली व त्या मृतप्राय झालेल्या आपल्या पतीच्या गळ्यास गच्च मिठी मारली. इतक्यांत त्या पुण्यपुरुष वृंदावनरायाचाही देहांत झाला. पुढें लोकांनीं त्याच्या स्मशान यात्रेची तयारी चालविली. वृंदावनरायाचें शव उचलण्या करितां लोक घरांत गेले पण पहातात तों त्यांची ती तरुणी स्त्री आपलें देहभान सोडून या प्रेतास गच्च आवळून त्याच्या शरीरावर पसरली आहे. तिला दूर होण्याकरितां प्रथमतः हाकामारून पुष्कळ शांतवनाच्या गोष्टी सांगितल्या. पण तिची मुळींच हालचाल होईना. लोकांनीं हात धरूनही तिला दूर करण्याचा प्रयत्न चालविला. पण तिची ती मगरमिठी सारखी बसलेली प्रेममिठी सुटेना. शेवटीं चिमटा तापवून त्यांनें तिला पोळविलें; पण तिच्या देहांत प्राण असेल तरना ! पतीच्या व तिच्या आत्म्याचें ऐक्य होऊन ब्रह्मानंदांत तल्लीन झाल्यामुळें त्या चटक्याचा परिणाम तिच्या शरीरावर मुळींच झाला नाहीं. नंतर अति दुःखानें तप्त होऊन तिच्या मस्तकांत उष्णता चढली असल्यानें ती मूर्च्छित झाली असेल असें समजून तिच्या शरीरावर बर्फही पुष्कळ टाकलें ! तरीहि ती देहांवर येईना. अखेरीस निरुपाय होऊन डाक्टरांकडून तिचा तो प्रेम पाश तुटून शुद्धीवर येण्याकरितां अनेक उपाय करविले. पण त्यांनीं देखील हात टेकले व सांगितलें कीं इच्या शरीरांत मुळींच चैतन्य राहिलें नाहीं. ही निःसंशय मरण पावली त्यावेळीं सर्वांचा नाईलाज होऊन ते सर्व लोक तिच्या दृढनिश्चयाची व पतिव्रत्य धर्माची वाखाणणी करूं लागले. शेवटीं त्या लोकांनीं त्या दोन्ही प्रेतास एकाच चितेंत ठेवून दहन केलें. स. वि.

ओरिसांतील जुळें—बर्नम, आणि बेली मेठे शोमेन ह्यांनीं ओरिसाप्रांतांतून एक जुळें अमेरिकेस नेलें आहे. त्या मुली आहेत. छातीच्या खालीं एका कुशीस ९ इंच लांब, आणि चार इंच गर्भाच्या एका कातडीनें त्या एकमेकीस चिकटलेल्या आहेत, त्यांचीं वयें समजत नाहींत. हें जुळें हिंदु असून जुळ्यापैकीं एकीचें नांव दूदिका, आणि दुसरीचें नांव बोडिका, ह्यांची उंची ९ फूट असून दिसण्यांत त्या सुरेख, आणि मनोहर आहेत. त्या दोघीना हिंदुस्थानीं, रशियन, जर्मन, कांहीं नार्वेजीयन, इंग्रजी आणि थोडें फ्रेंच इतक्या भाषा येतात. यांची विचार शक्ती एकसारखी आहे. एक जण एकाद्या वाक्यास आरंभ करिते, आणि दुसरी तें संपविते, दूदिका डाव्या बाजूस, आणि बोडिकी उजव्या बाजूस आहे. एकीस शीतबाधा झाली तर दुसरीस होत नाहीं. पण काळजांत कांहीं आजार झाला तर दोघीस बाधक होतो. अमेरिकेस नेल्या तेव्हां दोघीस समुद्र सारखाच लागला ह्मणजे त्या दोघी आजारी झाल्या. औषध किंवा उत्तेजक पदार्थ एकीस दिला तर दुसरीवर त्याचा परिणाम घडतो असें अनुभवानें समजलें आहे.

पायांनें लिहिणारा ! ! व गोफण मारणारा ! !—आलपूर तालुक्यापैकीं तकसील मुक्कामीं जगन्नाथसिंग रजपूत नांवाचा इसम असून तो थोटा आहे. तो पायांनें तेलंगू लिहितो, पायांनें टाळ वाजवितो, गोफण मारतो, व सुरेख पोहतो ! त्याचें वय २८।३० वर्षांचें आहे. गु. सू.

सुटीं टिकिटें—यूनायटेड् किंग्डममध्यें ( ब्रिटन बेटांत ) दरसाल पत्रांवर डकवलेलीं ६ लाख टिकिटें पत्रांपासून सुटून टपालच्या पेट्यांतून व खांबांतून पडलेलीं सांपडतात.

धूम्रपान—यूनैटेड् किंग्डम् ( इंग्लंड वेल्स, कॉट्लंड व आयर्लंड ) ह्या सयुंक्त राज्यांत दरसाल धूम्रपानाकडे २२॥ कोट रुपये खर्च होतो.

बेवारसी माल—इंग्लंडांतील पोस्टखात्यांत दरसाल ६०,००० रु० चा बेवारसी माल सांपडतो व तो सरकारास मिळतो हें उघडच आहे.

हायकोर्टाचा ठराव—प्राव्हिडेंट फंडांत भरलेल्या रकमेवर फंड भरणारा मयत झाल्यावर त्याच्या धनकोचा हुकुनामा चालूं नये असा मुंबई हायकोर्टानें नुकताच एक ठराव केला आहे.

काळविट व हरिणें—दरसाल स्काटलंड मध्यें रानांत ४००० काळविट व हरिणें मारण्यांत येतात.

झाराची खाजगी स्थावर जिंदगी—रशियाचा बादशाहा झार याची खाजगी स्थावर जिंदगी १० लाख चौरस मैल आहे.

रानहत्तींचें घ्राणेंद्रिय फार तीक्ष्ण असतें. १००० यार्डावर आलेल्या त्यांच्या शत्रूचा ह्यांना वास येतो; व त्याप्रमाणें ते आपल्या बचावाची तजवीज करितात.

एका सोनराचा वार्षिक खर्च—प्रत्येक ब्रिटिश सोनराला दरसाल ६४ पौंड ह्मणजे सरासरीनें ८०० रु० खर्च येतो, ह्मणजे दरमाहा ६० रुपये किंवा दररोज दोन रुपये प्रमाणें.

खेळावयाचे पत्ते—इंग्लंडांतून दरसाल खेळण्याच्या पत्त्यांची ४ लाख बंडलें बाहेर विक्रीकरितां पाठविण्यांत येतात.

औषधें—दरसाल ब्रिटिश देशांतून बाहेर गांवी जीं रामबाण व पेटेंट औषधें जातात तीं सरासरी १० लाख पौंडांचीं असतात.

गोहनन—इंग्लंडांत दरसाल ६ लाख गाई व बैल गोमांसासाठीं तिकडील गोहनन यंत्रांत मारले जातात. ! हरहर !

तांब्याचें नाणें—लंडनच्या टांकसाळींत दरसाल ८० लाख तांब्याचीं नाणीं पाडतात.

मिरी—अवघ्या जगांत दरसाल सुमारें दहा लाख रुपयांची मिरी खपतात.

सर्पदंशानें मृत्यु—हिंदुस्थानांत सदरील २०००० लोक सर्पदंशानें मृत्यु पावतात.

करिहनन—दरसाल हस्तीदंताकरितां ६०,००० हत्ती मारले जातात.

चिरीमिरी—ब्रिटीस रेल्वेवरील एकंदर नौकर लोक उतारूजवळून चिरीमिरी घेतात तिची दरसालची सरासरी ३ लाख पौंड होते. न्या० सिं०

मि० हाचिन्स, केपटाऊन येथील वायु नभोशास्त्रज्ञ या विद्वान गृहस्थानें चालू सालीं हिंदुस्थानांत आवर्षणामुळें दुष्काळ पडेल असें गतवर्षी भविष्य केलें होतें. हें भविष्य खरें उतरल्या मुळें त्यांच्या भविष्यावर सरकारी अधिकाऱ्यांचा भरवसा बसला आहे. त्यांनीं केप टाऊन येथून जी तार पाठविली आहे ती वरून पुढील वर्षकाळाबद्दल कांहींसें अनुमान करतां येतें. येत्या पर्जन्यकाळांत पर्जन्य चांगला पडेल व दुष्काळ पडणार नाहीं असें अनुमान त्यांनीं काढलें आहे हें अनुमान शुभ असल्यामुळें सर्वांसच प्रिय वाटेल हें सांगावयास नकोच. पर्जन्यकाळास जून अखेर आरंभ होईल असें ते ह्मणतात.

रालीब्रदर्स कंपनीचें एक एजंट मि० डक्सबरी ह्यांनीं सालापूरचा एक देशी माग व ८ मोमिन असे त्या मागाचें काम करून दाखविण्याकरितां विलायतेला स्वखर्चानें पाठविले आहे. न्या० सु०

निझामाच्या राज्यांत खाणी काढणारी एक गोरी कंपनी निघाली आहे. तिला निझामच्या राज्यांतील कांहीं जमीन पाहिजे आहे. निजामसरकार ती जमीन लिलाव करून देणार आहे.

टर्की व ग्रीसची लढाई—ही लढाई आतां लवकरच संपणार असें स्पष्टपणें दिसून येत आहे. समरांगणावरील ग्रीक सैन्याचा पायारूप बनलेलें त्यांचें ठाणें जें व्होलो तें आयतेंच टर्किशांचे हातीं लागलें आहे. तें सर करण्याकरितां टर्किश लोकांना एकही मनुष्य मारावें लागलें नाहीं. तसेंच आथेन्स येथील ग्रीक लोकांचा फाजील जोर सुद्धां बराच मऊ पडल्याचें समजलें आहे. ह्यापुढें थोड्याच दिवसांनीं सदर्हू दोन्ही राष्ट्रांमध्ये मध्यस्ती करण्याचें काम बडीं युरोपियन राष्ट्रें आपल्या हातीं घेतील असें दिसतें.

टर्की व ग्रीसमध्यें चालू असलेल्या लढाईत टर्कीस मदत करण्या करितां इजिप्त येथील मुसलमान लोकांत फंड गोळा करण्याचें काम सुरू झालें आहे केरो येथील कमेटीनें ३८००० पौंड ह्मणजे ६,०८,००० रुपयें वसूल केले आहेत. शिवाय गेल्या महिन्याच्या ९ तारखेपर्यंत वेगवेगळ्या माहमेडन कमेट्यांकडून तीन लक्ष पौंड ह्मणजे ४८ लक्ष रुपये टर्कीच्या बादशहाकडे रवाना करण्यांत आले होते.

√ औरंगाबाद समाचार पत्राची लिहिलेली प्रत अगोदर तेथील अधिकाऱ्यास दाखवून नंतर छापावयाची अशी सरकारी अटक होती ती आतां रद्द झाली.

क्रीट बेटामधील ग्रीक सैन्य परत येण्याकरितां गलबतांवर चढूं लागलें आहे. क० त०

अलाहाबाद जिल्ह्यांतील मौजे चकला या गांवी नशीबन नांवाची एक मुसलमानीण रहात आहे. हल्लीं दुष्काळचा समय पाहून त्या बाईने आपल्या मुलास ३ रुपयांस एका पाद्रिणीस विकलें. पुढें तिच्या जातवाल्यांनीं तिला दोष दिल्यावरून ती आपलें मूल पाद्रीणबाई जवळ परत मागण्यास गेली. पुष्कळशी होय नाहीं होतां होतां शेवटीं रुपये परत देण्याची वेळ आली, परंतु नशीबन जवळ ९ आणे कमी होते. यामुळें मिशनरीण मुलगा परत देईना. अखेरीस एका हिंदु मनुष्यानें धर्मार्थ ९ आणे देऊन मुलास सोडविलें. काय हा प्रसंग! ह्या दुष्काळांत मनुष्य काय करील याचा कांहीं नेम नाहीं.

पाटणा येथील छावणीच्या रेल्वे स्टेशनाच्या फाटकांतून २ मुसलमान जात असतां तिसरा मुसलमान मागून धांवत आला. आणि त्यानें त्या दोघांस तरवारीनें ठार केलें. मारणारास पोलिसानें पकडलें आहे.

मालेगांव येथें बद्या तापाची साथ सुरू झाली.

आस्ट्रेलियांत नायकांना तुरुंगाची शिक्षा नाहीं. यांनीं कसलाही भयंकर अगर घाणेरडा अपराध केला तरी त्यांना तुरुंगांत न घालतां कांहीं दिवस त्यांना गुरूचे मठांत नेऊन ठेवितात. आ० व०

बडोद्याचे माजी दिवाण बहादूर लक्ष्मण जगन्नाथ हे गेल्या ८ वे तारखेस पंचगणी येथें मरण पावले. हे १८३१त जन्मले होते. हे आपल्या कर्तबगारीनें, विद्वत्तेनें व उद्योगबलानें मोठ्या हुद्याच्या अधिकराला चढले होते !

एपीरसप्रांतांत लढाई होऊन ग्रीकचा पराभव झाला.

वकिलीची व मुन्सफीची परीक्षा जूनच्या २१ तारखेस होणार होती ती जूनच्या २८ तारखेस होणार आहे.

हिंदी दुष्काळ फंडाकडे कलकत्ता येथें मुख्य कमिटीजवळ निदान एक कोटी तीस लक्ष रुपये तरी जमतील.

निझाम सरकारला हिंदुस्थान सरकारानें असें चक्क कळविले आहे कीं, तुमच्या राज्यांत जमिनी घेण्याचा युरोपिअनांना पूर्ण हक्क आहे आणि त्यांचा फौजदारी न्याय आमची कोर्टें करितील.

कोल्हापूर येथें मंडईतील एका व्यापाऱ्याचें दुकान पुष्कळ वेळपर्यंत दिवसां उघडलें नाहीं ह्मणून शेजाऱ्यांनीं तें उघडून पाहिलें तो दुकानदार व्यापारी खुन होऊन ठार मेलेला त्यांना आढळला.

मस्तकाकृति घरः— आणखी तीन वर्षांनीं पारीसमध्यें एक नभूतंन भविष्यति प्रदर्शन होणार आहे. त्याची तयारी कधीं पासून चालली आहे. त्या प्रदर्शनांत एक स्त्री मंदीर ह्मणजे बायकांचा वाडा तयार होणार आहे. या वाड्याची आकृती अत्यंत सुंदर अशा स्त्रीच्या मस्तका प्रमाणें करावी असें ठरलें आहे. या आकृतीचा मूळ नकाशा करावयास तो जगांतील अत्यंत सुंदर अशा स्त्रियांच्या तसबिरांतील सौंदर्य एकत्र करून करावयाचा आहे. दी० बं०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही ,, ३ ,, ८
साल अखेर ,, ७ ,, १ ८
किरकोळ अंकास ....................... ८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ......... ८१ ८६
दुसरे खेपेस ............ ८१

Annual in arrears 7 ,, 1 Rs.
Six monthly......... 8 ..........
Single copy ..................

Advertisement.
Below 10 lines ... 2
Per line over 10 ... 4
Repetition Per line ... 3

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXI — AKOLA MONDAY 31 MAY 1897 — NO 21

वर्ष ३१ — आकोला सोमवार तारीख ३१ माहे मे सन १८९७ इ० — अंक २१

## जाहिरात

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक.

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी-च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे पैकीं कोणी वारले तर त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा २ दोन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।९६. } R. Aitken Agent

## नोटीस

रा. रा. गोविंदसिंग लक्ष्मणसिंग रजपूत राहणार पातूर शेखबाबू तालुका बाळापूर यांस.

या लेखानें कळविण्यांत येतें कीं मौजे कोठाडी खुर्द तालुके बाळापूर येथील शेत 'पठाल' नांवाचें मारुतीचें एक आणि दुसरें मौजे पाडळी तालुके बाळापूर येथील शेत 'बिहाडबन' या नांवाचे अशीं दोन शेतें रा. रा. रामजी कारभारी पाटील, खानापूर, यांच्या मालकींचीं आहेत तीं आह्मी पांच जणांनीं पांच वर्षांच्या बटाईच्या करारानें (ह्मणजे सालीम वायदा रामजी पाटील यानें द्यावा आणि शेतांचें उत्पन्न निमेनिम शेतांतच वाटून द्यावें अशा करारानें) वहितीस घेतली. त्या गोष्टीस, आज तीन महिने होऊन गेले. आमच्या पांचजणाच्या एकंदर ६ जोड्या आहेत. सदहू शेतें आह्मी पांचजणांनीं वहितींत आणण्यासाठीं शेतांची नांगरटी काढली आणि इतर कष्टमशागत केली. आतां ही दोन्हीं शेतें पेरणीला तयार केलीं आहेत.

आह्मीं शेतें तयार केल्या नंतर तुह्मी आह्मास सांगतां कीं तुह्मी हीं शेतें कर्जाच्या खंडांत मशारनिल्हे रामजी पाटील याज पासून घेतलीं आहेत. तीं शेतें पूर्वीच्या बटाईच्या करारानें आह्माकडे ठेवण्यास तुह्मी नाखूष असल्या विषयीं ह्मणता; आह्मी शेतें निव्वळ २०० दोनशें रुपये नक्यानें तुमच्या ह्मणण्या प्रमाणें वहाण्यास तयार नाहीं.

शेतांवर मालकी तुमची झाली असेल तर आह्मी रामजी पाटिलांच्या समक्ष व त्यांच्या मंजुरातीनें बटाईचा माल बरोबर करारा प्रमाणें तुह्मास कराराच्या मुदतीवर पांच वर्षे देत जाऊ.

जर तुह्मी दांडगाईनें दोन्ही शेतांचा ताबा घेण्यास याल किंवा दुसऱ्या कडून ताबा हिसकाऊन घेण्याचा प्रयत्न कराल तर त्या गोष्टीची जबाबदारी तुमच्या माथीं राहील. आह्मी तुह्मास किंवा तुमच्या मार्फतीच्या माणसास दोन्ही शेतांचा ताबा देणार नाहीं. तुह्मास आमच्या विरुद्ध ताबा घेण्यास दिवाणी कोर्ट आहे. या उपर जर तुह्मी दांडगाई किंवा आगळीक कराल किंवा इतर धोका अगर धमकी द्याल तर त्या बद्दल तुह्मावर फौजदारी केली जाईल आणि यथायोग्य रितीनें सर्व नुकसानी खर्चासह तुह्माकडून भरून घेतली जाईल कळावें. ता. २९ मे १८९७ इसवी.

(सही)

१ श्रावण वल्लद रामजी कुणबी
निशाणी —
२ मारुती वल्लद सोनाजी गवळी
निशाणी —
स्वतां करितां आणि खालील तीन समाईक वहितदारा करितां.
[३] सोनाजी वल्लद बिबाजी
(४) चिंतामण वल्लद अवचित
(५) सखाराम वल्लद कृष्णाजी
सर्व राहणार आगीखेड तालुका बाळापूर.

## नोटीस

रा. रा. बुलाखीदास गोपाळदास साहू या नांवाचा दुकानचा मालक बुलाखीदास नारायणदास साहू दुकान बाळापूर— यांस

या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी तारीख २१।४।८७ रोजीं मौजे मांडवे खुर्द तालुका बाळापूर येथील सर्वे नंबर १९ व २० या दोन्ही शेतांचे खरेदीखत करून दिलें. खरेदीचा करार ३-३-९६ रोजीं होऊन त्या अन्वयें दोन्ही शेतांच्या स्वामीत्वा बद्दलचे रुपये २०५ वहितदार शेख यासीन वा॥ शेख इमाम पिंजारी याजकडून पहिल्या वायद्याचे वेळेस १८९७ सालीं घ्यावयाचे ते माझ्या कडे शेताच्या मालकीच्या नात्यानें लावून दिले आणि ती रकम कटमितीनें मला खरेदीच्या १५०० रुपयांत मुजरा दिली.

दोन्ही शेतें विकत दिलीं त्या वेळीं शेख यासीन वल्लद शेख इमाम याजकडे फक्त फसली १३०६ सालाबद्दल नक्यानें तीं तुह्मी ठेवल्याचे कळविलें होतें, या नक्याच्या पैशाबद्दल जमाखर्च करण्यांत आला आणि दोन्ही शेतांचा प्रत्यक्ष ताबा मी १३०७ फसली सालाला घ्यावा असें तुह्मी सांगितलें.

मी शेतें दोन्ही ताब्यांत वहितीसाठीं घेणार होतों पण सदहू शेख यासीन वा॥ शेख इमाम यानें शेतें ताब्यांत देण्याविषयीं इनकार केला.

खरेदीखतांतील शर्तीं प्रमाणें सर्वतोपरी तुह्मास सोसावें लागेल, यंदा शेतें आमच्या ताब्यांत न मिळालीं तर आमचा धंदा बसेल आणि आमचे निव्वळ नुकसान सारा वजा जातां निदान तीनशें ३०० रुपयापेक्षां अधीक होत आहे. शेतें खरेदी घेतली तेव्हां मी उदीमासाठीं घेत आहे असें तुह्मास निक्षून सांगितलें होतें. माझा उदीम पडला तर तुमच्यावरील जबाबदारीला धरून माझें सर्व भावी नुकसान भरून घेतलें जाईल. तारीख ६।६।९७ पर्यंत तुह्मी कोणत्याही रितीनें शेतें माझ्या वहितीस दिली तर मी तुह्मांस नोटिशीच्या खर्चा शिवाय इतर तोषीस लागूं देणार नाहीं. कळावें. तारीख २४ माहे मे सन १८९७ इ०

(सही)

मारोती आपा खंडा आपा रहाणार
बाळापूर दस्तुर खुद्द.

## नोटीस

शेख यासीन वल्लद शेख इमाम पिंजारी राहणार बाळापूर यांसः—

या लेखानें कळवितो कीं मौजे मांडवे येथील दोन सर्व्हे नंबर १९ व २० हीं शेतें तुह्माकडे १३०६ फसली साली वहितीस होतीं. हीं १३०६ सालींच मी विकत घेतलीं होतीं आणि त्याप्रमाणें २१।४।९७ रोजीं खरेदीचा भरणा संपूर्ण मिळाल्या नंतर बुलाखीदास नारायणदास यानें खरेदीखत करून दिलें.

यंदा आमच्या किस्तगारीला व वहितीला तुह्मी हरकत करिता. त्यामुळें माझा शेतीचा उदीम बंद पडून माझें भारी नुकसान होत आहे. तें तुमच्या गैर कायदा वर्तना मुळें होत आहे असें ठरल्यास सारा वजा जातां नुकसानी बद्दलची निदान ३०० रुपये रक्कम तुह्मास भरून द्यावी लागेल. तुह्मी तारीख ६ माहे जून सन १८९७ पर्यंत शेतें माझ्या ताब्यांत दिली तरी मी आपलें काम संभाळून घेईन. कळावें तारीख २४ माहे मे सन १८९७ इसवी.

(सही)

मारोती आपा खंडा आपा रहाणार
बाळापूर द० खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती वैशाख वद्य ३० शके १८१९

इंडिया देशांत जी व्यापारवृद्धी ब्रिटि[श] अमलाखाली झाली आहे ती अगदीं मायाव[ी] कनकमृगा प्रमाणें आहे. व्यापारवृद्धी साम[ा]न्यतः देशाची उन्नत स्थिती दर्शवि[ते] पण ही वृद्धी या देशाच्य[ा] संपत्तीला ऱ्हासकारक व अपायकार[क] झाली आहे. असें प्रतिपादन करणें ह्मणं[जे] मोठ्या चुकीचें, राजद्रोहाचें व कृतघ्नते[चें] काम होय असें कांहीं वर्षांपूर्वी सर्वजण[ास] वाटत होतें परंतु राष्ट्रीय सभेनें जें राजकी[य] शिक्षण दिलें आहे त्याच्या प्रभावानें पुष्कळ विचार बदलले असून सध्या त्यांचेंच सार्व[]भौमत्व स्थापण्यांत येत आहे ही मोठी आ[न]नंदाची गोष्ट होय. व्यापारवृद्धी संबंधा[नें] आपल्या देशाचें नुकसान कसें काय हो[त] आहे याचा खुलासा मि. वाचा यांनीं राय[ल] कमिशन पुढें केला आहे तो फार बोधकार[क] व खात्रीलायक आहे.

या देशांत रेलवे स्थापण्याकडे जें भांडव[ल] लागलें आहे त्याच्या व्याजाच्या मानानें रेलवे चालू झालेल्या प्रदेशांतील संपत्ती पु[ष्]कळ वाढली हें खरें तथापि सर्व फायद[ा] इंग्लिश व्यापाऱ्यांस मिळतो. कापूस किंवा गहूं उत्पन्न करणाऱ्यास कापसाची किंवा गव्हाची वाजवी किंमत येत नाहीं अशा तऱ्हेचें कांहीं सांगतां येणार नाहीं. या मालासाठीं निरनिराळे बाजार निघाल्यामुळे रयतेला फायदा आहे; तथापि पुष्कळदा असें घडतें कीं रयतेला आपला माल तोट्यानें द्यावा लागतो. रेलवेमुळें बाजार भावाला तेजी आली आहे तरी रयतेचा नफ्या ऐवजीं तोटाच होत असेल. उदाहरणार्थ, रायली ब्रदर्स कंपनी पीक येण्यापूर्वीं भावी माल खंडून घेतात पण या खंडलेल्या भावानें फायदा होईल तसा तोटाही होण्याचा संभव आहे अर्थशास्त्रदृष्ट्या बरबर असें दिसतें कीं दळणवळणाचे मार्ग सुधारले ह्मणजे शेतीचा माल विकत घेणाऱ्या प्रमाणें शेतीमाल उत्पन्न करणाऱ्यांस देखील कांहीं फायदा झाला पाहिजे; पण या देशाच्या विलक्षण स्थिती मुळें हा फायदा शेतकऱ्यांस मिळत नाहीं; सर्व रयत ह्मणजे व्यापाऱ्यांच्या हातांतली गुलाम मंडळी होय आणि नवे बाजार निघाल्यामुळें रयतेस कांहीं न मिळतां व्यापाऱ्यांचाच फायदा होत आहे. जे शेतीचा माल उत्पन्न करितात ते या व्यापारवृद्धीच्या फायद्याला आंचवलेले आहेत. रेलवेचेंच उदाहरण घ्या; युरोपियन भांडवलवाल्यांस सर्व निव्वळ नफा मिळतो; नेटिवांचें भांडवल नसल्या मुळें या नफ्यांत त्यांस कांहीं लभ्यांश नाहीं; आणि उत्पन्न वाढलें तरी त्यांत शेतकऱ्यांस ह्मणण्या सारखा फायदा नाहीं. या गोष्टीच्या शाबितीसाठीं मोठा पुरावा हा होय कीं साधारण अवर्षण झालें कीं लागलीच दुष्काळ पडतो आणि रयतेची दैना हृदयद्रावक होते व तिला अशा दुष्काळांत काडी मात्र निभाव लागत नाहीं.

राष्ट्रांचें खरें वैभव त्याच्या खजिन्यावर असतें. या देशाचा खजिना रिता असून शिवाय कर्ज उत्तरोत्तर वाढत आहे स्टेट सेक्रेटरी राष्ट्राची नादानी ओळखून आहेत आणि ते वारंवार सुचवीत असतात कीं फार कसोशीची काटकसर राखून खर्च न वाढविण्या विषयीं पराकाष्ठेची दक्षता ठेवावी. पण या सूचना अंमलांत आणण्याची जबाबदारी इंडिया सरकारावर नाहीं किंवा त्या अंमलांत आल्या किंवा नाहींत हें पहाण्याविषयीं देखील स्टेट सेक्रेटरी काळजी घेत नाहीं. मि. दिनशा एदलजी वाचा हे अर्थशास्त्रज्ञ असून त्यांची माहिती आकड्यानिशी सप्रमाण असते. त्यानीं रायल कमिशनपुढें आपल्या साक्षींत स्पष्टपणें कळविलें कीं इंडियाच्या खजिन्यांत खरी शिल्लक कांहींच नाहीं. या देशाची उत्तम स्थिती ह्मटली ह्मणजे जेव्हां पराकाष्ठेनें या देशाचें पोट हातावर चालतें तेव्हांची होय; पुष्कळ वेळा अशी ओढ होते व घोंटाळा होतो कीं त्यांतून पार पडण्या साठीं कांहीं तरी मरणाला रात्र आड अशी व्यवस्था करावी लागते. ह्मणजे कर्ज काढावें लागतें, किंवा निराळा कर बसवून किंवा जुने कर वाढवून वेळ मारून न्यावी लागते. पण असे कर वाढले ह्मणजे ज्या कर देणाऱ्या प्रजेचें उत्पन्न दरसाल दरमाणशी २७ रुपये पडतें त्या प्रजेच्या सर्व नाड्या व शक्ती आकर्षून घेतल्या जातात. सन १८४९-५० पासून १८९४-९५ पर्यंत एकंदरीनें उत्पन्ना पेक्षां खर्च ३७ कोटी ६२ लक्ष रुपयांनीं अधीक झाला आहे ह्मणजे गेल्या ४६ वर्षामध्यें सरासरीनें दरसाल ८० लक्ष रुपयांची तूट पडत आहे. मि. वाचा यांनीं निक्षून सांगितलें कीं मूळ महत्वाची गोष्ट कोणीच लक्ष्यांत घेत नाहीं. ही गोष्ट अशी कीं इंडिया देशाचें रक्तशोषण राजकीय व्यवस्थेनें घडत आहे आणि त्या मुळें हा देश अगदीं भिकार दशेला पोंचला आहे. कितीहि सद्धेतुपूर्वक असली तरी सध्यांची राज्यपद्धती ही वरील गोष्ट विचारांतच घेत नाहीं आणि पाश्चिमात्य राज्यकारभाराचीं तत्वें स्वीकृत करीत सुटते. पाश्चिमात्य राज्यकारभार अती खर्चाचा आहे आणि त्या मुळें ही राज्यपद्धती मागें पुढें निःसंशय या देशाच्या खजिन्याची स्थिति भयंकर करील आणि हा भयंकरपणा परकी व जुलमी कारभारामुळें व इंडियनांला कांहीं बोलूं न दिल्या मुळें फारच वाढेल. इंग्रजी राज्यपद्धतीच बुडाशी चुकीची आहे तेव्हां तिला अपयश येईल हें उघड आहे.

---

टर्की व ग्रीस या दोन राष्ट्रांमध्यें चाललेली लढाई सध्यां तहकूब आहे आणि ही तहकुबी फार अनिश्चित व अस्थिर आहे. प्रस्तुत सांकेतिक तह झाला आहे; तथापि असला तह ह्मणजे खरा तहनामा नाहीं. लग्न होण्या पूर्वीं जसें वधूवरांचे वैवाहिक हक्क खरे व पक्के नाहींत तसें खरा तहनामा ठरण्या पूर्वीं सांकेतिक तहानेंच लढाई मिटली अर्शाविला कांहीं पर्याय नाहीं, तूर्त लढाई बंद आहे पण तिचे प्रज्वलित लोळ धुमसत असलेल्या यादवींत केव्हां बाहेर पडतील याचा नेम नाहीं. कदाचित इतर युरोपियन राष्ट्रांच्या मध्यस्तीनें लढाई मिटेल असाही संभव आहे पण निश्चयात्मक कांहींच नाहीं झालेल्या लढाईत ग्रीक लोकांची तयारी अगदीं कच्ची दिसली. प्राचीनकालचें युद्धकौशल्य, लढाईची कवाईत, दारू गोळ्याची सामुग्री सेनाधिपणाची कर्तबगारी इत्यादि सर्व सांप्रत ग्रीस देशांत विद्यमान नाहींत असें पुरतेपणी सिद्ध झालें. टर्कीचें सैन्य अगदीं तयार व तरबेज आहे टर्कीचें सामर्थ्य कांहीं सामान्य नाहीं आणि अशा बालाढ्य राष्ट्राशीं बेताबेतानें व तजविजीनें वागलें पाहिजे अशा विषयीं दहशत इतर राष्ट्रांच्या मनांत चांगली वास करूं लागली. टर्कीनें आठनऊ कोट रुपये लढाईच्या खर्चा निमित्त मागितलें आहेत त्या संबंधानें जर्मनीनें टर्कीच्या विरूद्ध जरा नेट धरला होता पण अखेरीस जर्मनीनें आपली बाणी बाजूस टाकली. थेसली प्रांता विषयीं टर्की तर गोष्ट काढूं देत नाहीं आणि ग्रीसच्या ताब्यांत थेसली राहील असा विचार सुद्धां चालूं द्यावयाचा नाहीं. अद्याप पक्क्या तहनाम्याच्या अटी ठरल्या नाहींत पण टर्कीशी लढाई चालविण्या पासून ग्रीसचें नुकसान होऊन इतर राष्ट्रांची देखील तारंबळ उडेल असें अनुमान आहे. या लढाईनी विझवाविझव झाली नाहीं तर युरोप खंडभर रण माजेल असा रंग दिसतो. ग्रीस देशाला पुष्कळ राष्ट्रांचे पाठबल आहे तथापि टर्कीला देखील कांहीं बलाढ्य राष्ट्रें मिळतील. रशिया टर्कीला जोर देवो किंवा दुसरी राष्ट्रें या कामीं पुढें सरोत, तथापि परिणाम फार भयंकर होऊन रक्तपात व राज्यक्रांती ही झाल्या शिवाय पुन्हा शांतता व स्वस्थता होणार नाहीं. ईश्वर करो आणि ही लढाई पक्केपणी बंद होवो.

---

धर्माची किंवा जातीची मोहनीं कांहीं अजब आहे. ही शृंखला अविनाशी व फार मजबूत असून तिची बंधनशक्ति अती गूढ व अवर्णनीय आहे. जुनें लढाईचे इतिहास वाचीत असतांना देखील प्रत्येकाच्या मनोवृत्ती कोणत्या तरी पक्षाला विजय वांछीत असतात. ही वांछा खरोखर अहेतुक असते पण ती आपल्या मनामध्यें पूर्णपणें राज्य करिते. इतिहास वाचतांना ज्या प्रेरणा उचंबळू लागतात त्या वर्तमानकाळच्या चालूं ० लढाईच्या गोष्टी ऐकतांना अगदीं प्रचलित व जोरदार होतात आणि अयाचितपणानें आपोआप आपण कोणत्या तरी पक्षास मिळतो. पण जर मनोवृत्तींच्या अंतस्थ सूत्रामध्यें धर्मसूत्र किंवा जातीसूत्र मुळाशीं असलें तर त्या मनोवृत्ती स्वपक्षीय लोकांच्या विजया बरोबर आनंदोल्हासानें डोलूं लागतात. अशाच प्रकारचें उदाहरण आमच्या मुसलमान बंधूंच्या वर्तनांत आह्मांस दिसून आलें. मुसलमानभाईंचीं मनें ग्रीसोटर्कीश लढाइमध्यें तटस्थ नव्हती. त्यांच्या मनानें टर्कीचा विजय चिंतीला होता आणि ती मनीषा पूर्ण होतांच गेल्या गुरूवारीं मुंबई शहरीं मुसलमान लोकांनीं दीपोत्सव केला, सभा वगैरे भरवून आनंद प्रदर्शित केला आणि त्या निमित्त गेल्या गुरुवारचा दिवस राष्ट्रीय सणा प्रमाणें पाळला ही सानंद मनोवृत्ती पाहून मुसलमानांच्या एकदिलाचें व स्वाभिमानाचें आह्मांस मोठें कौतुक वाटतें. या मनोवृत्तींत सर्व भावी गोष्टींचा मूळपाया आहे तेव्हां त्यांचें उज्जीवन होऊन त्या जोरानें वाढतील अशी व्यवस्था नेहमीं चालूं ठेविली पाहिजे.

---

हिंदुस्थानच्या राज्याची अलौकिक उभारणी ब्रिटिश वैभवाचें चिरस्मारक होय. या राज्याची शांतता, स्वस्थता व आबादानी हीं ब्रिटिश लोकांच्या किर्तीची नौबद सतत वाजवितील. पण इंडियाचे लोक निःशस्त्र आहेत, त्यांची मर्दुमकी नष्ट पावली आणि ते राजकीय गुलाम आहेत ही गोष्ट ब्रिटिश लौकिकाला काळिमा आणिते. या गोष्टीचा इतिहास ब्रिटिश लोकांच्या सर्व चांगल्या गोष्टीस तिळांजली देतो. कदाचित राज्यस्थापनेच्या वेळीं निःशस्त्रतेची युक्ती रामबाण वाटली असेल पण ही युक्ती सांप्रतच्या मनूला फार घातुक आहे. आह्मी ब्रिटिश लोकांशी एकजीव होऊं पहात आहों. भूमीच्या अंतरायामुळें आह्मी वेगवेगळ्या नांवानें मोडतों पण इंडियन लोक व ब्रिटिश लोक प्रजाधर्मानें एक आहेत. स्वकीय व परकीय असे दोन भेद आह्मा इंडियनापाशीं नाहींत पण आमचे राज्यकर्ते आह्मांस परकी लेखितात, सापत्नभावानें देखील बंधुवर्गांत गणत नाहींत, आणि आह्मी राज्यकर्त्यांच्या सुखसाधना पैकीं चालतीं बोलतीं यंत्रें बनलों आहों. आमची जरूरी सुखसाधनाच्या दृष्टीनें आहे आणि अशा आत्मपरायणतेच्या तत्वावर आमच्यावर राज्यकारभार चालविण्यांत येत आहे.

निःशस्त्रतेच्या बळावर इंडियन राष्ट्राचें राज्य करावें यांत पुरुषार्थ नाहीं. ' ब्रिटिश प्रजा ' या गर्भित संज्ञे खालीं आमचे हक्क व स्वातंत्र्य हीं ब्रिटिश लोका प्रमाणें समसमान आहेत. इंडियन लोकांस निःशस्त्र ठेवण्यामध्यें खरोखर राज्यकर्त्यांचा फायदा नाहीं. इंडियांत जो हत्याराचा कायदा आहे त्याच्या तोडीचा कायदा सर्व पृथ्वीवर कोठें आढळणार नाहीं. हा भित्रेपणाचा पाताळयंत्री राज्यकारभार धन्याला व प्रजेला सारखाच अहितावह आहे. अकृत्रिम राजनिष्ठेचा मूळपाया प्रजेवरील राज्यकर्त्यांच्या विश्वासावर आहे. आणि त्या राजनिष्ठेची भव्य इमारत राज्यकर्त्यांवरील प्रजेच्या भरंवशानें बनलेली आहे. ही स्थिती इंडियन राष्ट्राला लागूं पडत नाहीं. या देशाचा हत्याराचा कायदा सर्व विश्वास व भरंवसा विलयास पोंचवितो. ही दूषित दशा आमच्या राजनिष्ठेला वैगुण्य आणिते आणि राज्यकर्त्यांच्या प्रजावात्सल्याला हीनत्व देते. वरील वैगुण्य या हीनत्वाचा परिणाम आहे आणि ह्मणून त्याबद्दल आह्मी जबाबदार नाहीं.

---

हल्लीं वऱ्हाडांत व मुख्यत्वें करून आमच्या जिल्ह्यांत हत्याराच्या कायद्या खालीं फार खटले होतात. हे खटले लोकांच्या अज्ञानामुळें पुष्कळ होतात. सरकारच्या कायद्या विरुद्ध वागण्याच्या इराद्यानें बुद्धिपुरस्पर अपराध घडत नाहींत तथापि अडाणी लोक चुकीनें शिक्षेला पात्र होत आहेत. ही दुःखाची गोष्ट होय. शस्त्रें, बंदुक वगैरे घरांत परवान्या शिवाय ठेवणें हा देखील अपराध घडतो. एक वेळ परवान्या शिवाय कांहीं वस्तु अज्ञानामुळें किंवा हयगयी मुळें घरांत राहिली तर लोकांवर मोठी कठीण वेळ येते. नवीन परवाना मागावा तर ती वस्तु इतके दिवस तशीच राहिल्या बद्दलचा अपराध उजेडांत येतो, आणि परवाना न मागावा तर एकवेळ घडलेला अपराध लांबत जातो व त्या बद्दलचा सर्समिरा मन वेढावून सोडतो. थोडे दिवसापूर्वीं एका मनुष्यानें जुन्या बंदुकीनें पिसाळलेलें कुत्रें मारलें आणि दुसऱ्याचे प्राण वाचविले. ही बंदुक परवान्या शिवाय उपयोगांत आणिली ह्मणून त्यास शिक्षा झाली. वारंवार असे निरुपद्रवी अपराध घडतात पण त्या बद्दल लोकांस कांहीं माफी न देतां धडाधड शिक्षा होतात, जिल्हा माजिस्ट्रेटांनीं हत्याराचा कायदा विनाकारण अमलांत न आणण्या विषयीं काळजी घेतील तर लोकांवर मोठे उपकार होतील. पूर्वींच्या राहशतिल्या घराण्यांत जुनीं शस्त्रें पुष्कळ असतात आणि तीं बहुत करून विजयादशमीच्या दिवशीं पूजेला मांडतात अशीं शस्त्रें निरुपयोगी परवान्या शिवाय घरीं राहिल्या बद्दल जर कोणावर फौजदारी झाली तर मोठा अन्याय होय पूर्वजांचीं स्मारकें ह्मणून हीं शस्त्रें राखलीं असतात पण त्या गोष्टीनें देखील हल्लीं अपराध होतो. ही निःशस्त्रता खरोखर दुःखमूळ आहे व तिचा अनर्थकारक परिणाम ओढवण्यापूर्वीं हत्याराचा कायदा रद्द होईल अशी आह्मी आशा करितों.

---

## The Berar Samachar

MONDAY MAY 31 1897

Famine in Berar is growing in extent and intensity. The distress has reached its highest point and it is really a problem of deepest concern to tide over the present difficulty. The magnitude of the distress is alarming; and in the next few months to come the pressure will be felt most & will drive a large number of people to the extreme necessity of preserving life at any cost. In a province populated by about twenty—nine lakhs of people, there are already more than twenty six thousands of men on relief works. The average proportion of men requiring relief to the total population being one to hundred does not compare more favourably than the percentage obtaining in the provinces where the distress is most severe. It is to be deplored that a disastrous fate should fall upon a pro—vince which had once the reputation of being a splendidly furnished granary in India. The province was a total stranger to famine though we often apprehended a similar state in a year of bad harvest from the exhaustive and continuous drain of the provincial food—grains. It behoves the authorities that they should push on their vigorous measures hitherto steadily pursued, of affording relief to the needy and distressed. No relaxation would be advisable on the pure ground that the monsoon will shortly set in.

Not only the relief works should not cease but that the operations of the Famine Fund should be more extensive so as to reach the growing numbers of the sinking and helpless people who would prefer death to go a—begging for bread. So, relief from the 'Government Funds and Charitable Funds should be liberal, widespread and continuous.

We wish to particularize the relief that people need most; and it is in the matter of clothing. The sight of some people moving about in their tattered rags is most painful and we wish the state to provide with at least the most indispensable clothing. Thousands of

people have lost all they had in facing this dire calamity. It is for these men that some help is necessary in food & clothing and also a distinct help is needed to put people to their ordinary avocations. In most cases cattle and seedgrains will have to be supplied in order to assist ; or agriculturists in tilling their lands. It is now high time that the authorities in charge of the Famine relief should utilize large funds in buying cattle and seed—grains for distribution among the deserving peasants.

There should be no difficulty as to funds in Berar, as there is already a good surplus to the credit of the Provincial Administration. It is the duty of the state to preserve the life of the Rayots at any cost. We conclude with an earnest hope that the Local Government will not be found wanting in the discharge of this sacred and onerous duty which Providence has unhappily thrust upon them.

---

Mr. J. D. B. Gribble is a well-known gentleman in the political circle at Hyderabad. He has written a nice and learned history of the Deccan. And it is a pleasure to note that he has taken up an important question in connection with the rendition of Berar. He has published a pamphlet in which he makes a remarkable demand for justice in regard to the Berar Trust. The pamphlet reminds us of some sterring articles in the columns of the Pioneer published a few months before. The demand is based on the right of the Nizam defined in various treaties. The Saturday Review summarizes in the following manner the main purport of the demand for justice:—

" Mr. Gribble has made out a case for inquiry as to why the administration of the Berar distrricts costs so much, and why the Nizam receives so little. He also shows that we broke faith in the percentage to which we were limited, and that we have treated the prince whose territory we hold in trust with a very niggard hand. But, notwithstanding that the facts of the case would justify a far more a sweeping demand, the Nizam's representatives appear to be swayed by moderation. They say, Let a new arrangement be concluded, based on a proportional distribution of the Berar revenue, and they uggest that the proportion should be 50 per cent. for all civil Contingent, and the remaining 25 per cent. for the Nizam. Considering that we are tied by our treaty to 25 per cent. for the administration, and that we have more than doubled it without any warrant, we cannot complain of a want of moderation in the suggestion made on behalf of Hyderabad. No doubt the Government of India will be reluctant to take up the matter, and, if it can, will silence inquiry; but, as the facts are acquiring publicity, public opinion at home will force on the authorities the necessity of doing something. To get at the whole truth an exhaustive investgation of all our monetary transaction with the Nizam would be required; and although there is no likelihood of any such thorough examination being carried out, it may be confidently affirmed that the public conscience would be so smitten by the revelation of the enormous sums paid by that potentate in a hundred years that it would decree the immediate restitution of the Berar province. But even without that supreme appeal something must surely be done to place the Berar Trust on a basis of justice, and to remove the injured feeling that has so long rankled in the minds of the Nizam and his Ministers."

## वऱ्हाड

हवामान—पावसाळा लवकर सुरू होण्याचीं चिन्हें दिसतात. उन्हाचा ताप पराकाष्ठेचा आहे; आणि उन्हाच्या विकारानें लोकही पुष्कळ हैराण होतात. वारा साधारणपणें चांगला सुटतो. पारा ११६ अंशापर्यंत चढतो. रोगराई चालू आहेच. पाण्याच्या कमताई मुळें लोकांस फार त्रास होतो.

राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार बी. ए. सी. आय. इ. यांची स्वारी उन्हाळ्यापूर्वी वाशिमाहून महाबळेश्वरास गेली होती. ते सध्यां त्या स्थलाहून पुण्यास परत आले आहेत.

तारीख १७ मे रोजीं या प्रांतांतील दुष्काळ कामावर २२३४९ माणसें होतीं, आणि ४९९७ माणसास फुकट मदत मिळत होती.

तारीख ३० जानेवारी पासून तारीख १९ मे पर्यंत वऱ्हाड प्रांतांत २३८०० मण धान्य रेलवेनें आलें आणि २१०० मण बाहेर गेलें. या शिवाय बैलगाडीच्या मार्गानें धान्याचा जंगी पुरवठा होत आहे तो वेगळाच आहे.

परतवाड्यास गेल्या १८ वे तारखे पासून २१ वे तारखे पर्यंत क्रिकेटचा सामना झाला. परतवाड्याची क्रिकेट मंडळी आणि उमरावतीची 'खापर्डे' क्रिकेट मंडळी या मध्यें खेळ झाला. उमरावती करांच्या फेऱ्या ८९ व इलिचपूरकरांच्या ४० झाल्या. खेळ मोठा नामी झाला.

कलकत्याच्या दुष्काळ-फंड कमिटी कडून वऱ्हाडास ९० हजार रुपये देण्यांत आले. मागणी ८० हजारांची आहे. या रकमे शिवाय प्रांतांत निराळी वर्गणी बरीच मोठी जमविली आहे. मि. जेम्स हे कलकत्याहून इकडील पाहणी करण्या साठीं मुद्दाम येत आहेत.

मे. बुलक साहेब कामिशनर हे चिखलदऱ्याहून परत दुष्काळ कामानिमित्त उमरावतीस येत आहेत.

ऊटी येथें अलिशान रेसिडेंट मि. फ्रेडन साहेब यांस दुचाकी पायगाडीनें बरीच इजा झाली पण त्यांची तबेत आतां चांगली आहे.

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस ओंकार मयाराम मारवाडी अज्ञान पालन करणार मातोश्री आईकासाबाई मर्द मयाराम मारवाडी दुकान मौजे कळमेश्वर तालुके मेहेकर जिल्हे बुलडाणा ह्या अर्से जाहीर करितात कीं आह्मी साळूजी वल्लद नारायण जात कुणबी राहणार मौजे कळमेश्वर यास कुलमुकत्यार नेमिले होते. परंतु आज तारखेपासून आह्मी त्यास कुलमुखत्याराचे कामावरून दूर केलें आहे. तर आमच्याकरितां आमच्या संमती शिवाय जर कोणी साळूजी वलद नारायण नी याजबरोबर देवघेव वगैरे कोणत्याही प्रकारचा व्यवहार केल्यास त्याजबद्दलचे जबाबदार कोणत्याही प्रकारानें आह्मी नाहीं ज्याचा तो आहे ह्मणून दिली जाहीरात तारीख २७ मे सन १८९७ ई०

सही

ओंकार मयाराम मारवाडी अज्ञान पालन करणार मातोश्री कासाबाई मर्द मयाराम मारवाडी राहणार कळमेश्वर इचे हातची नांगडी.

### नोटीस

रा. रा. सिवराम वा॥ नामदेव पाटील आडनाव जने वा॥ गाडेगांव बु॥ तालुके जळगांव जिल्हा आकोला यासि खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तू माझा लग्नाचा नवरा असून सन १८९२ ते सन मजकूर पावेतो मी आपले वयांत आली असून आपणास रक्तपितीचा रोग झाल्या कारणानें आपले शरीर सदरील रोगानें नाताकत झालें आणि सदरील साला पासून मी आपले बापाचे घरीं मौजे गोळगांव खुर्द येथे राहत असून मी सावकारी कर्ज काढून उपजीविका करीत असोन आतां सदहू नोटीस पावल्या तारखे पासून १९ दिवसांत कायद्या प्रमाणें माझी सोडचिठ्ठीची फारकती द्यावी आणि माझेवर झालेलें कर्ज सावकारी मोठी रक्कम आदा करून मजला फारकती बिनहरकत द्यावी आणि करारासह मुदतीचे आंत फारकती नदिल्यास मी दुसरा नवरा करून पुनर्विवाह करून नांदनुक करीन आणि जनाब दिपुटी कामिशनर साहेब बहादूर जिल्हा आकोला याचे हुजूर अर्ज दाखल करून जनाब सिव्हीलसरजेन डाक्टर साहेब यांचें विद्यमानें आपले रोगाची परीक्षा करून मी आपली मोकळिक करून घेईन. आपले कोणतेही प्रकार मजवर हक्कतंबंध डागिन्या सह मजपासी आपले कांहीं एक नाहीं आपली कोणतेही प्रकारे जबाबदारी मजवर कायद्या प्रमाणें नाहीं. ही नोटीस लिहून दिली तारीख २९।५।९७.

सही

सोनी मर्द सिवराम पाटील मौजे गाडेगांव नि॥ बांगडी

---

### नोटीस

बायजाबाई मर्द सखाराम पाटील राहणार मौजे अडगांव खुर्द इसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे अडगांव खुर्द येथील सर्वे नंबर १३० चें शेत नेहुरी सिवेचें याचें खातें तुमचें नांवें असून त्या शेतांत मोहनाजी वल्लद बाबुजी माळी राहणार अडगांव याचा निम्मे हिस्सा असलेला त्यानें आह्मास खरेदी दिला असून मैत शिवराम ( तुमचा नवरा ) व मैत मोहनाजी माळी या उभेतांचे संमतीनें शेताची वाटणी होऊन मध्यें बांध धुरा वगैरे टाकून पश्चिमेकडील हिस्सा जो खरेदीचे वेळीं पडीत व नाल्याचा होता तो आह्मी घ्यावा असें ठरलें व पूर्वेकडील जो काळ जमिनीचा तो सखाराम पाटील यानें घेतला. तेव्हां पासून आजपर्यंत आह्मी आपले हिशाची बिनतकार वाहिवाट करीत असता मागिल साला पासून आमचे शेताचे वाहितदारास तुह्मी विनाकारण अन्यायानें हरकत करितां असें समजतें. तरी हें तुमचें करणें बरोबर नाहीं. सबब या नोटिशीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं, या नंतर जर तुह्मी किंवा तुमचे तर्फे कोणीही आमचे हिशांत येऊन कोणतेही प्रकारची हरकत, नुकसानीं अगर आगळीक केली तर कायदेशीर रीतीनें योग्य तजवीज केली जाईल. कळावें तारीख १६।४।९७ इसवी.

( सही )

केशव परशराम आमडेकर दस्तुर खुद्द.

### नोटीस

नोटीस देशमी गुणाजी वलद पुंजाजी ढोर कुणबी राहणार बारशी टाकळी तालुके अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी आह्मापासून तारीख २७-११-९६ रोजीं रकम रुपये १९८ रोख घेऊन गहाणखत लिहून दिलें तसेंच २७-१२-९६ रोजीं रकम रुपये ३०० चें गहाणखत करून देऊन रोख नगदी रुपये १३७ तुह्मास मिळाले आहेत. सदहु तिन्ही गहाणखतात बारशी टाकळी येथील शेत सरवे नंबर १८२, २८३, १९७, २६६ व सरवे नंबर १८२ एकूण पांच नंबर गहाण लिहून दिले आहेत व आतां ६-१-९७ रोजीं तुह्मी रकम रुपये ९०० सदहु शेतावर मिळण्याबद्दल तगाईचा अर्ज दिला आहे असें समजतें तरी सदहु शेतें आमचेपाशीं गहाण असल्यावरून आतां दुसरे गहाणाचा बोजा सदहु शेतावर तुह्मास ठेवतां येणार नाहीं करितां या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मास तगाई घेणें असल्यास आमचे जवळ जे नंबर गहाण दिले आहेत ते नंबर सरकारात ठेऊन तगाई घेऊं नये. कळावें तारीख २७ माहे मे सन १८८७ इसवी.

सही

किसनलाल मोहनलाल दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

रा. रा. रावजी वल्लद रामजी टाळे राहणार मौजे आरेगांव प्रगणे व तालुके मेहेकर जिल्हा बुलठाणें यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, नामे सोनाजी वल्लद नारायण चेके वस्ती आरेगांव यांनें तुह्मास तारीख २६ फेब्रवारी सन १८९७ रोजीं गहाणखत लिहून देऊन रजिस्टर करून दिलें आहे. त्यांत आमचा स्थावर माल मौजे गौंढाळ प्रगणे रिसोड तालुके रिसोड व जिल्हे वाशीम येथिल शेत सर्वे नंबर ९१ एकर गुंठे १९८ आकार रुपये ६८ यांचें खातें आह्मापैकीं कडतू यांचें नांवे आहे तो नंबर सालीम आमचे उभयताचे मालकीचा आहे व आमचे ताब्यांत आहे त्यांत त्याचा कांहीं हक्क संबंध नाहीं. करितां तुह्मास कळविलें जातें कीं तुह्मी आपल्या रुपया करितां त्याजकडून वाटेल ती सोय करून घ्यावी सदरील आमचे शेतावर तुमचा गहाणाचे संबंधानें बिलकूल हक्क चालणार नाहीं करितां आह्मास समजल्या बरोबर तुह्मास अगाऊ कळविलें आहे पुढें तुमची तकरार कोणत्याही प्रकारें आह्मी ऐकणार नाहीं. कळावें तारीख २१ माहे मे सन १८९७.

सह्या

हणंवता वल्लद नारायण चेके राहणार मौजे आरेगांव तालुके मेहकर याची निशाणी असे.

कडतु वलद गोविंदा चेक राहणार मौजे आरेगांव तालुके मेहेकर याची निशाणी असे

---

## वर्तमानसार.

कॉड माशाची मादी दरेक हंगामांत सुमारें साडेचार कोट अंडीं घालते ह्मणतात.

एका फ्रेंच डाक्टराचें मत असें आहे कीं, ज्या माणसांस तीस वर्षांचा होईपर्यंत फारसें मोठें दुखणें येत नाहीं, तीं बहुधा ७३ वर्षें पर्यंत जगतात.

आकाश गंगेच्या आलोकडच्या फोटोग्राफावरून असें कळलें आहे कीं, त्या तारासमूहांत सूर्य पन्नास कोटि आहेत. आणि त्या प्रत्येकास वेगळी वेगळी ग्रहमाला आहे!

पंचवीस हजार लोकांची उपजीविका चालली होती, असा साखरेचा एक मोठा कारखाना मारिशस बेटांत होता, तो बंद पडला आहे. लोक उपाशीं मरत आहेत.

एक नवें यंत्र केलें आहे. त्याच्या योगानें दाहा तासांत ९,००,००० कार्डी मोजून, पंचवीस पंचवीसांचीं पुडकीं वेगळीं वेगळीं लावून त्यांच्या भोंवतीं कागद सुतळी बांधून तयार होतात!

अमेरिकेंतल्या एका दुर्बिणीकरतां एक भिंग तयार केलें आहे. तें तयार करण्यास सुमारें अडीच वर्षें लागलीं. त्याचें वजन १००० रत्तल असून त्यास खर्च सुमारें साडेतीन लाख रुपये लागला आहे.

ब्रिटिश म्यूझिअम ह्मणून लंडनांत एक मोठें संग्रहालय आहे, त्यांत प्राचीन पुस्तकांच्या हस्तलिखित प्रतींचा पुष्कळ संग्रह आहे. त्यांतले कांहीं ग्रंथ विटांवर, कांहीं कौलांवर, शिंपावर, हाडांवर दगडांवर, सालींवर पानावर, हस्तिदंतावर, व तशाच इतर पदार्थांवर लिहिलेले आहेत.

पर्शीया व अफगाणिस्थान यांच्या सरहद्दीवरून आलेल्या बातमीवरून समजतें कीं, रशियाची कोसाक फौज अजून सरहद्दीवरच असल्यामुळें अफगाण लोक काळजींतच आहेत नवीन कांहीं सामना वगैरे नाहीं, आणि कांहीं गडबड झाल्यावाचून आपणात अफगाण हद्दींत शिरतां येणार नाहीं असें प्लेगचें काम करीत असलेल्या सरहद्दीवरच्या रशियन डाक्टरांस आतां समजूंही लागलें आहे. तेव्हां आतां टेहेळणी वगैरे करण्याचें काम ते यापुढें करणार नाहींत असें वाटतें.

इलाख्यांत हास्पिटल असिस्टंट हुद्याचे डाक्टर हवे तितके नाहींत, याकरतां तरुण विद्यार्थी तो धंदा शिकण्यास जातील तर त्यांचा फायदा होईल असें पंजाबच्या शाळाखात्याच्या डॉरेक्टराने सर्व आंग्लो व्हर्नाक्युलर शाळांच्या मास्तरांस कळविलें आहे.

म्रिबोरो येथें फार कडक अशी हातघाईची लढाई होऊन दोन्ही पक्षाचे पुष्कळ लोक ठार झाले.

लढाई तहकूब करण्याबद्दल बड्या राजांच्या वकिलांनी टर्कीस जें पत्र लिहिलें होतें त्याचा जबाब, वेराम सण पुरा झाल्यावर देवूं असें टर्कीनें उत्तर दिलें. या तहांत थिसलीचा कबजा घेण्याचा टर्कीचा इरादा आहे व टर्कीस तसें करूं देवूं नये ह्मणून ग्रीस कंबर बांधून टर्कीच्या आंगावर जाण्याचें अवसान अजूनही आणीतच आहे पण त्यापासून कांहीं फायदा होण्याचा संभव नाहीं. टर्कीनें तहाच्या बाबतींत बड्या राजांस उत्तर पाठविलें, त्याचें ह्मणणें कीं, आमच्या तहाच्या अटी कबूल होण्यापूर्वी लढाईची तहकुबी करतां येत नाहीं; थिसली प्रांत टर्कीच्या राज्यांत सामील केला जाईल व त्या शिवाय लढाईच्या खर्चाबद्दल ग्रीसने टर्कीस १० कोट रुपये दिले पाहिजेत, या अटी कबूल होईपर्यंत टर्कीची फौज पुढें चाल करण्याचें काम चालूच ठेवील.

डामोको येथें ग्रीसची २९,००० फौज असून टर्कीची फौज त्यावर चाल करून गेली व झटापटी सुरू झाल्या.

टर्कीची फौज आर्टावर चाल करून जात आहे ही टर्कीची आगळीक आहे असें ग्रीसने बड्या राजांस पत्र पाठविलें.

इजिप्तची एक आगबोट ग्रीसने कैद केली. त्या आगबोटीवर दारू गोळ्यांनी भरलेल्या पेट्या सांपडल्या. या पेट्यांवर फळफळावल भरलेली आहे अशा चिठ्या होत्या. ( शिवाजी फळफळावळीच्या पेट्यांनींच दिल्लीच्या कैदेंतून सुटून गेला—नाना फडणविसाच्या कारकिर्दींत पुण्यास असलेल्या इंग्रज वकिलाकडे मुंबईहून फळफळावळीच्या पेट्या जात असत आणि एका वेळीं तशा कांहीं पेट्या खंडाळ्याच्या दस्तुरी वाऱ्यानें पकडल्या व त्यांत हत्यारें सांपडलीं.)

लढाईच्या तहकुबीच्या शर्ती कांहीं कमी करा अशाबद्दल बड्या राजाच्या वकिलांनी सुलतानाच्या मागें तगादा लावला आहे. सुलतान तसें करण्यास कबूल होण्याचा रंग आहे, पण त्याच्या पदरच्या लष्करी कामदारांचें मत फार जोरावर झालें आहे.

थिसली टर्कीच्या राज्यांत दाखल होऊं देवूं नये असें जर्मनीसह सर्व बड्या राजांचें मत आहे व तसें केल्यास सर्व बालकनी संस्थाने उठतील असें त्यांचें मत आहे.

सुलतानानें आपल्या शर्ती नरम न केल्यास रशिया जरी सभेस विरूद्ध आहे तरी बड्या राजांची बहुधां सभा होईल.

म्रिबोराच्या लढाईंत ग्रीसचे ३३ हपिसरांसह ५९८ लोक मेले.

जें मिळण्यासारखें आहे त्याहून सुलतान जास्त मागत आहे असें ह्मणतात.

ग्रीकच्या जमाखर्चावर सगळ्या युरोपाचा ताबा असावा असें मागणें करण्यास जर्मनी सुलतानाचा उचल करीत आहे.

टर्कीच्या तहाच्या शर्तीचा विचार न करतां ग्रीसचा चुराडा होणें चांगलें नाहीं या मुद्यावर लढाई तहकूब करण्याबद्दल बड्या राजांच्या वकिलांनीं सुलतानास पत्र लिहिण्याचा एक मसुदा तयार केला, पण जर्मनीनें त्यावर सही करण्याचें नाकारलें.

स्वता रशियन बादशहानें सुलतानास विनंती केल्यावरूनच लढाईची तहकुबी करण्याचें ठरलें.

इंग्रजप्रधान लार्ड सालिसबरी ता. १७ रोजीं आपल्या एका व्याख्यानांत सांगतात कीं, ग्रीस व टर्की यांची लढाई जरी तहकूब झाली आणि लढाईच्या खर्चाची रकम टर्कीस देणे ग्रीसला जरी भाग झालें तरी क्रीट बेटांतल्या ख्रिस्ती लोकांस मुसलमान सुलतानाच्या ताब्यांत ठेवण्याचे बडे राजे कधींही कबूल करणार नाहीं. टा. अ.

औरंगाबाद हें शहर सावकारास गहाण देऊन निझाम सरकारांनीं १ कोटीचें कर्ज काढलें.

गोवा राज्यांतील संगम गांवीं राणे लोकांनीं हल्ला करून गांवांतील सावकारास लुटलें व त्यांच्या बायकाही पळवून नेल्या.

ऊन पाण्यांत दगडी तेल, सोडा, साबण मिळवून त्यांत कपडे भिजवावे ह्मणजे डाग वगैरे जाऊन वस्त्रं स्वच्छ होतात.

जंगी कंपनी—विलायतेस २३८ कोटी भांडवलाची एक जंगी रेल्वे कंपनी आहे. या कंपनी एवढी मोठी कंपनी दुसरी जगांत नाहीं ह्मणून सांगतात.

अमेरिकेंत विजेच्या योगानें दुधापासून लोणी काढण्याची युक्ति निघाली आहे तिच्या योगानें १७६२०० शेर दुधाचें लोणी सरासरीं पांच मिनिटांत काढितां येतें.

विंचवाच्या देशावर केरोसिन तेल त्वरित गुण आणणारें आहे असें एक साहेब ह्मणतो ज्या जागेवर विंचू चावला असेल तेथें हें तेल चोळावें ह्मणजे थोड्या वेळांत विष उतरतें.

जर्मनमध्यें ऑटोफुलर नांवाचे चार वर्षांचें मूल आहे ते दोन वर्षांपासून हस्तलिखीत व छापील कागद वाचून दाखवितें. ह्यास गाणें मुळींच सहन होत नाहीं व लिहितांही येत नाहीं.

चीफकानस्टेबलचे जागीं १९ वर्षांचा अपोक्त मनुष्य नेमिला जाऊन त्यानें आरोपसि कबूल करण्यासाठीं विंजेची पेटी लावण्याचा प्रयोग केल्याचे उदाहरण गुजराथेंत घडून आल्यामुळें २९ वर्षांच्या आंतील मनुष्यास चीफकान्स्टेबलचे जागीं नेमूं नये असा ठराव झाल्याचें समजतें.

तारायंत्रांत असा कांहीं एक नवीन शोध काढला आहे कीं, त्यांत गीत, वाद्य वाजवलें असतां किंवा बोललें असतां तें सर्व प्रकार ८०० मैलाच्या अंतरावर स्पष्ट ऐकूं येतात ह्या तारायंत्राच्या नळीशी कान द्यावा लागत नाहीं तर खोलींत बसलेल्या सर्व मंडळीस ऐकतां येतें.

अलीपर येथील तुरुंगांतून कांहीं दिवसांपूर्वी पांच कैदी पळाले. त्यांनीं चरबी, वाळू आणि बळकट रसी यांच्या सहायानें दोन इंच व्यासाचा लोखंडी गज कापून काढून तेथून सुटका करून घेतली, कानसीपेक्षां या रसीचे सहायानें काम फार निमुटपणें आणि सफाईनें होतें जसें तेथील सर्जननें यासंबंधीं प्रचीत पाहिली त्यावरून दिसून येतें. पळून गेलेल्या कैद्यांपैकीं एक इसम सांपडला आहे. इं. प्र.

हिंदुस्थानातल्या २७१०००००० लोकांना लिहिता वाचतां येत नाहीं.

पायानें लिहिणारा !! व गोफण मारणारा !! आलंपूर तालुक्यापैकीं तकसोल मुकामीं जगन्नाथसिंग रजपूत नांवाचा इसम असून तो थोटा आहे. तो पायानें तेलंगू लिहितो पायानें टाळ वाजवितो. गोफण मारतो, व सुरेख पोहतो !! याचें वय २८।३० वर्षांचें आहे.

कोणत्याही ऋतूंत दिवस किती मोठा हें काढणें असल्यास सूर्यास्त किती वाजतां होतो हें पहावें आणि तितक्या वाजण्याच्या दुप्पट करावी. तितके तास दिवस राहणार ह्मणून समजावें आणि सूर्योदय जितके वाजतां होत असेल त्याचीं दुप्पट केल्यास रात्र किती तास असेल ते ठोकळ मानानें कळते. दी० बं०

कायस्थ कॉनफरन्स—ह्या वर्षाचें कायस्थ कानफरन्स गयेस भरणार आहे.

मुसलमानी विधवा—सर्व हिंदुस्थानांत २७ वर्षांचे आंतील ७० हजार मुसलमानी विधवा आहेत, अशी गणती निघाली आहे.

दुष्काळांत मदत—रूस देशानें हिंदुस्थानच्या दुष्काळ फंडाकडे २१००० रुबलस पाठविलें असें कळतें.

तुर्कस्थानच्या सुलतानाजवळ हल्लीं १४ लाख फौज समरांगणी जाण्यास तयार अशी आहे.

विचित्र कर—अर्जेंटिया येथील लोकांपासून तेथील सरकार एक प्रकारचा कर घेत असतें. जीं माणसें वयाच्या २६ पासून ८० वर्षां पर्यंत लग्न करणार नाहींत त्यांजपासून महिन्यांतून दोन वेळा हा नियमित कर घेण्यांत येतो. लग्न केल्या नंतर या करांतून तीं माणसें सुटतात.

चौदाशें मुसलमान आर्य होण्यास तयार:-कान्यकुब्ज देशांतून एक कनोजी गृहस्थ आर्यसमाजाचे परस्करणीस कळवीत आहेत कीं, ह्या प्रांतांत सुमारें १४०० मुसलमान लोक प्रायश्चित्त घेऊन वैदिकधर्मी बनूं इच्छित आहेत.

पितृहत्यारी वैद्य—जपान देशांत एका वैद्याला पकडण्यांत आलें आहे. हा मनुष्य मनुष्याच्या मेंदूचें एक औषध बनवीत असतो व ज्या रोगावर हें मेंदूचें औषध हे वैदराज देत असतात त्याच रोगानें ते स्वतः पीडित झाले तेव्हां त्याजवर औषध करण्याकरितां त्या वैद्यानें आपल्या बापाला मारून त्याच्या मेंदूचें औषध बनविलें त्यावरून त्यास पकडण्यांत आलें असून त्याची चौकशी चालू आहे. ज्ञा० च०

चिन देशांत पुनः प्लेग उत्पन्न होऊन पुष्कळ लोक मरत आहेत.

वेल्बी कामिशनापुढें बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांची साक्ष झाली. त्यांत ते ह्मणाले कीं प्रत्येक इलाख्याच्या उत्पन्नाची व्यवस्था करण्याचें काम त्या इलाख्याच्या अधिकाऱ्यांच्या हातांत स्वतंत्रपणानें राहिलें पाहिजे व वार्षिक बजेटांत कमी जास्ती करण्याबद्दल सूचना आणण्याचा अधिकार लेजिस्लेटिव्ह कौन्सिलास असावा. लार्ड वेल्बी यांच्या प्रश्नास उत्तर देतांना बाबू सुरेंद्रनाथ ह्मणाले कीं, हिंदुस्थानची सुधारणा बऱ्याच अंशीं हिंदुस्थान सरकारानें केली आहे. परंतु आणखी बरीच सुधारणा होणें अवश्य आहे.

वार्सास एक चैनी वेश्येचे घरीं गेले, ते बसून पानसुपारी खात आहेत तों दुसरे शौकी गृहस्थ तेथें आले. बोलण्या चालण्यावरून दोघांमध्यें तंटा होऊन एकानें दुसऱ्याचे पोटांत जांबिया खुपसल्यामुळें तो मरण पावला.

खबुतरांच्या साह्यानें लेखी निरोप पोंचविण्याचें काम जर्मनींत चालू आहे. २०० खबुतरें तैनातीस आहेत. न्या० सु०

---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.